दैनिक
# राष्ट्र सह्याद्री
अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

संपादक : काकासाहेब नवले । RNI No. MAHMAR/2019/82605 । वर्ष ७ वे । पाने ८ । मुल्य रू. ४.०० । अंक २०९ । बुधवार १३ मे २०२६
। पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 । www.rashtrasahyadri.com

## श्रीकृष्ण आणि सहजयोग




'सहजयोग'
भाग ५१

गीतेतसुध्दा कृष्णानें पहिल्यांदा फार छातीठोकपणे, म्हणजे त्यांना भ्यायच काही कारणच नव्हतं, छातीठोकपणे सांगितले आहे कि त्याला तू आतमध्ये जाणुन घे. अर्जुनाला स्पष्ट सांगितले की त्याला (आत्म्याला) जाणलंच पाहिजे. तो जाणल्याशिवाय तो झाल्याशिवाय बाकी सगळं काही व्यर्थ आहे. हेच उत्तम आणि तेच मिळविले पाहिजे.
त्यांनी सांगितलं की तू त्या चैतन्याला आपल्या आतमध्ये जाण, त्या चैतन्यामध्ये जागा हो आणि त्याला अनुभव. हेच सत्य आहे, हेच पुरुषार्थाचं कार्य आहे . पण अर्जुनाला ते पटलं नाही. त्यांनी विचारलं हे काय? तू मला सांगतो कि त्याला तू आतमध्ये जाण आणि इकडे सांगतोस कि युद्धावर जा. म्हणजे हे कसं काय?अर्जुनाचा अर्थ त्याला तरी कळला कि नाही माहीत नाही. पण कृष्णाला एवढं मात्र कळलं कि ह्यांना हे जमायचं नाही. अजूनहि स्थिती नाही. कृष्णांनी सांगितलं होत कि तू त्याला जाण आणि साक्षी हो. मग तू रणांगणात असलास, स्मशानात असलास, घरात असलास, वनात असलास, जनात असलास तरी तिथंच आहे. पण जेव्हा त्यांनी म्हटलं कि असं कसं शक्य आहे? तेव्हा तो म्हणाला बरं दुसरा मार्ग आहे. तो काय? आता ह्याच्यात राजकारण आहे पण त्यातही डिप्लोमसी बघा त्याची किती. त्याला सांगितलं कि, तू कर्म कर आणि कर्माचं फळ तू देवावर ठेव. १७/०९/१९७३ पुणे

अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191
सौजन्य: निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

# नीट पेपरफुटीने देश हादरला

- २२ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी खेळ!
- परीक्षा रद्द, सीबीआय तपास सुरू
- नाशिकमधून एका आरोपीस अटक




**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नवी दिल्ली :** डॉक्टर होण्याचे स्वप्न डोळ्यांत साठवून देशभरातील तब्बल २२ लाख विद्यार्थ्यांनी दिलेली राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा अखेर पेपरफुटीच्या गंभीर प्रकरणामुळे रद्द करण्यात आली आहे. देशाच्या शिक्षण व्यवस्थेवरील विश्वास हादरवणाऱ्या या प्रकारामुळे विद्यार्थी, पालक आणि शैक्षणिक क्षेत्रातून संताप व्यक्त होत आहे. लाखो विद्यार्थी एका-एका गुणासाठी वर्षभर मेहनत घेत असताना शासनाला साधी परीक्षा सुरक्षितपणे घेता न येणे, ही अत्यंत दुर्दैवी बाब असल्याची भावना व्यक्त होत आहे.

एमबीबीएस, बीडीएस, आयुष आणि इतर वैद्यकीय अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी नीट ही देशातील सर्वात महत्त्वाची परीक्षा मानली जाते. दरवर्षी लाखो विद्यार्थी डॉक्टर होण्याच्या स्वप्नासाठी या परीक्षेची तयारी करतात. यंदा ३ मे २०२६ रोजी झालेल्या परीक्षेला देशभरातून २२ लाखांहून अधिक विद्यार्थी बसले होते. त्यात महाराष्ट्रातील जवळपास अडीच लाख विद्यार्थ्यांचा समावेश होता.

तपास यंत्रणांच्या माहितीनुसार, हरियाणात पेपरचे १० सेट तयार करून ते विविध राज्यांत पोहोचवण्यात आले. जयपूरमधील मनीष हा या संपूर्ण रॅकेटचा मुख्य सूत्रधार असल्याचा संशय आहे.

केंद्र सरकारने परीक्षा रद्द करत नव्याने परीक्षा घेण्याची घोषणा केली आहे. विद्यार्थ्यांना नव्याने नोंदणी करण्याची आवश्यकता नसून, जुनी परीक्षा केंद्रे कायम राहतील. तसेच नव्या परीक्षेसाठी कोणतेही अतिरिक्त शुल्क आकारले जाणार नाही, असे स्पष्ट करण्यात आले आहे. या प्रकरणाचा सखोल तपास सीबीआयमार्फत केला जात असून दोषींवर कठोर कारवाईचे आश्वासन देण्यात आले आहे.

लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी या प्रकरणाला तरुणांच्या भविष्यासोबतचा गुन्हा असे संबोधत मोदी सरकारवर जोरदार टीका केली. २२ लाख विद्यार्थ्यांचा विश्वास तुटला आहे. ही परीक्षा आता लिलाव बनली आहे, अशा शब्दांत त्यांनी संताप व्यक्त केला. गेल्या दहा वर्षांत ८९ पेपरफुटी प्रकरणे समोर आल्याचा आरोपही त्यांनी केला. राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार रोहित पवार यांनीही दलालांच्या पैशांच्या खेळात विद्यार्थ्यांच्या आयुष्याची राखरांगोळी होत आहे, अशी टीका करत कठोर कारवाईची मागणी केली.

### ... अशी उघडकीस आली पेपरफुटी..!

परीक्षेच्या तब्बल ४२ तास आधीच प्रश्नपत्रिका सोशल मीडियावर फिरत असल्याचे समोर आले. काही गेस पेपरमधील १३१ प्रश्न जसेच्या तसे मुख्य प्रश्नपत्रिकेत आढळल्याने संशय अधिक गडद झाला. यानंतर विरोधकांनी सरकारवर जोरदार हल्लाबोल केला आणि अखेर राष्ट्रीय परीक्षा यंत्रणेला परीक्षा रद्द करण्याचा निर्णय घ्यावा लागला.

### नाशिक ते राजस्थान; पेपरफुटीची साखळी

या प्रकरणाचा तपास आता सीबीआयकडे सोपवण्यात आला आहे. प्राथमिक तपासात नाशिक, राजस्थान, हरियाणा, बिहार, आंध्र प्रदेश आणि जम्मू-काश्मीरपर्यंत पेपरफुटीचे जाळे पसरल्याचे उघड झाले आहे. नाशिकमधील एका ३० वर्षीय युवकाला अटक करण्यात आली असून त्याने १० लाख रुपयांना प्रश्नपत्रिका विकत घेऊन ती १५ लाखांना विकल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. आरोपीने पोलिसांपासून बचावासाठी हेअरस्टाईलही बदलल्याचे तपासात स्पष्ट झाले.

### विद्यार्थ्यांचा संताप, भविष्य अनिश्चित

नीट परीक्षा रद्द झाल्याने लाखो विद्यार्थ्यांवर मानसिक ताण निर्माण झाला आहे. वर्षभर रात्रंदिवस मेहनत करून परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांना पुन्हा तयारी करावी लागणार असून त्यांच्या भविष्याबाबत अनिश्चितता निर्माण झाली आहे. देशातील शिक्षण व्यवस्थेच्या विश्वासार्हतेवरच या प्रकरणाने मोठे प्रश्नचिन्ह उभे केले आहे.

## राहुरीतील बोगस 'मुन्नाभाई' डॉक्टरवर गुन्हा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** शहरातील 'गॅलेक्सी निसर्ग उपचार केंद्र' येथे बोगस पद्धतीने वैद्यकीय व्यवसाय करणाऱ्या तन्वीर देशमुख यांच्याविरोधात राहुरी पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईमुळे शहरासह तालुक्यात मोठी खळबळ उडाली आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, तन्वीर देशमुख हे महाराष्ट्र कौन्सिल ऑफ इंडियन मेडिसिन किंवा नॅशनल कौन्सिलकडे कोणतेही वैध नोंदणी प्रमाणपत्र नसताना रुग्णांची तपासणी व उपचार करत होते. तसेच मेडिकल प्रॅक्टिशनर्स ॲक्टनुसार उपचार करण्याचा कोणताही अधिकार नसतानाही त्यांनी क्लिनिक सुरू ठेवून रुग्णांवर उपचार केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

याशिवाय विविध चिकित्सा पद्धतींचा वापर करून रुग्णांच्या आरोग्याला धोका निर्माण होईल अशी औषधे दिल्याचाही आरोप आहे. तसेच 'डॉक्टर' ही पदवी बेकायदेशीरपणे वापरणे, बनावट शैक्षणिक कागदपत्रे तयार करून सादर करणे, असे गंभीर प्रकारही समोर आले आहेत.

याप्रकरणी ग्रामीण रुग्णालय राहुरी येथील वैद्यकीय अधिकारी डॉ. गणेश मिसाळ यांनी फिर्याद दिली आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे. या घटनेनंतर तालुक्यातील इतर बोगस डॉक्टरांवरही कारवाई होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे..

## राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीतून भुजबळ, पटेल, तटकरेंना डिच्चू!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या नवीन राष्ट्रीय कार्यकारिणीवरुन मोठा राजकीय गोंधळ निर्माण झाल्याचे चित्र आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाला दिलेल्या कार्यकारणीच्या यादीत प्रफुल पटेल, छगन भुजबळ, सुनील तटकरे यांचे नाव नसल्याचे अनेकांच्या भुवया उंचवल्या असून चर्चांना उधाण आले आहे. तर राष्ट्रीय सेक्रेटरीपदी अविनाश आदिक यांना पुन्हा संधी देताना जय पवार यांची देखील त्याच पदावर वर्णी लावण्यात आली. राष्ट्रवादीच्या कार्यकारणीच्या यादीत सत्तेचे सर्व केंद्र एकाच कुटुंबाभोवती फिरत असल्याचे चित्र या निमित्ताने समोर आले आहे. राष्ट्रवादीकडून केंद्रीय निवडणूक आयोगाला २९ एप्रिल २०२६ रोजी पत्र देण्यात आले होते.



या नव्या यादीत सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अनुभवी नेत्यांना डच्चू दिल्याने खळबळ उडाली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पक्षाचा राष्ट्रीय चेहरा राहिलेले प्रफुल पटेल यांना कार्यकारिणीतून वगळल्याने राजकीय विश्लेषकांनाही धक्का बसला आहे. पटेल यांनी २५ वर्षांहून अधिक काळ पक्षाच्या राष्ट्रीय राजकारणात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. विशेषतः अजित पवार यांनी जेव्हा वेगळी चूल मांडली, तेव्हा पटेल त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे होते. अशा निष्ठावान आणि अनुभवी नेत्याला बाजूला सारल्याने पक्षात 'सर्व काही आलबेल नाही' असे संकेत मिळत आहेत.



केवळ पटेलच नव्हे, तर महाराष्ट्रातील पक्षाचे एकमेव लोकसभा खासदार सुनील तटकरे यांनाही सरचिटणीस पदावरून नाव वगळण्यात आले आहे. यासोबतच छगन भुजबळ, हसन मुश्रीफ, दिलीप वळसे पाटील यांसारख्या दिग्गज नेत्यांची नावेही नवीन यादीतून गायब असल्याने, पक्षाने आपली जुनी फळी पूर्णपणे बाजूला केल्याचे स्पष्ट होत आहे.

नवीन रचनेनुसार, पक्षाची सर्वोच्च पदे पवार कुटुंबात विभागली गेल्याचे दिसून येते. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे, तर त्यांचे पुत्र पार्थ पवार यांच्याकडे राष्ट्रीय सरचिटणीस आणि जय पवार यांच्याकडे राष्ट्रीय सचिव पदाची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. एकाच वेळी कुटुंबातील तीन सदस्यांकडे महत्त्वाची पदे गेल्यामुळे पक्षात घराणेशाही वरचढ ठरत आहे का? **(पान ४ वर)**

### महत्त्वाचे..

## मंदिराची भिंत अंगावर पडल्याने सहा भाविकांचा मृत्यू

सांगली : जत तालुक्यातील मोटेवाडी गावच्या हद्दीत वादळी वाऱ्याने मंदिर परिसरातील शेडची भिंत पडल्याने ६ भाविकांचा मृत्यू झाला आहे, तर काही भाविक गंभीर जखमी असून जखमींना जत मधील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी हलवण्यात आले आहे.

जत तालुक्यातील मोटेवाडी येथे मरगुबाई देवीची यात्रा मंगळवारी भरली होती, भाविकांची मोठी गर्दी होती. वादळी वाऱ्यामुळे व पावसामुळे भाविकांनी शेडच्या भिंतीला आडोसा म्हणून आसरा घेतला पण भिंत चिऱ्याच्या दगडाच्या बांधकामाची होती. वाऱ्याच्या तडाख्याने भिंत कोसळली त्यामध्ये सहा भाविकांचा मृत्यू झाला आहे तर तिघे जण गंभीर जखमी झाले आहे. इतर १५ जण जखमी झाले.

जत प्रशासन आणि पोलिसांची तातडीने धाव घेतली असून जतचे प्रांताधिकारी नष्टे यांची घटनास्थळी भेट, जखमींना तातडीने रुग्णालयात हलवले आहे. मृतांपैकी तीन जण विजापूर तालुक्यातील आणि तीन जण जत तालुक्यातील आहेत. शंकर आबा लोखंडे पाडोझरी, मंगल भाऊसो मोठे पांडोजरी, संजूबाई राम चौधरी पांडोजरी, कोंडीबा गेजगे दरीबडची, तर विजापूरमधील दोन मयत असे एकूण आतापर्यंत सहा मयत झालेत.

## सरकारी अधिकाऱ्यासमोर आरटीआय कार्यकर्त्याची हत्या!

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**मुंबई :** विरार पूर्वेतील शिरगाव परिसरातून एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. गेल्या अनेक वर्षांपासून परिसरातील अवैध खाणींविरोधात कायदेशीर लढा देणाऱ्या आत्माराम पाटील या आरटीआय कार्यकर्त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, ज्या खाणीविरोधात त्यांनी तक्रार केली होती, त्याच खाणीमध्ये त्यांचा मृतदेह फेकून देण्यात आला. मंगळवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास स्थानिक नागरिकांना त्यांचा मृतदेह रक्ताच्या थारोळ्यात आढळून आला. आरोपींनी मोठ्या दगडाने आत्माराम पाटील यांच्या डोक्यावर वार करून त्यांचा जीव घेतल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले आहे. या घटनेमुळे संपूर्ण विरार परिसरात प्रचंड खळबळ उडाली असून अवैध खाण माफियांविरोधात संतापाची लाट उसळली आहे.



या हत्येचा घटनाक्रम अत्यंत अंगावर शहारे आणणारा आहे. मंगळवारी दुपारी वसई तहसीलदार कार्यालयातील सर्कल अधिकारी प्रभाकर पाटील हे एका अन्य अधिकारी आणि चालकासह शिरगाव येथील तक्रारीची पाहणी करण्यासाठी गेले होते. तक्रारीची जागा आणि परिसर दाखवण्यासाठी त्यांनी आत्माराम पाटील यांना त्यांच्या घरातून सोबत घेतले होते. खाणीच्या परिसरात पोहोचताच आधीच तिथे दबा धरून बसलेल्या पाच ते सहा जणांच्या टोळीने सर्कल अधिकारी प्रभाकर पाटील यांच्यावर अचानक हल्ला चढवला. या हल्ल्यात त्यांच्या कानाला दुखापत झाली. जेव्हा आत्माराम पाटील हे सरकारी अधिकाऱ्यांना वाचवण्यासाठी पुढे सरसावले, तेव्हा आरोपींनी त्यांना लक्ष्य केले आणि मोठ्या दगडाने त्यांच्या डोक्यावर प्रहार केला. या भीषण हल्ल्यात आत्माराम पाटील यांचा जागीच मृत्यू झाला. **(पान ४ वर)**

## केंद्राच्या प्रस्तावित नवीन उस नियंत्रण कायद्याला शेतकरी संघटनेचा तीव्र विरोध

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** केंद्र सरकारने विद्यमान उस नियंत्रण आदेश १९६६ रद्द करून नवीन ऊस नियंत्रण आदेश २०२६ लागू करण्याची तयारी सुरू केली असून, या प्रस्तावित कायद्याला शेतकरी संघटनेने तीव्र विरोध दर्शविला आहे. या मसुद्यावर हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून, त्यासाठी २० मे २०२६ पर्यंत मुदत देण्यात आली आहे. या पार्श्वभूमीवर सोमवारी पुणे येथील साखर आयुक्तालयात शेतकरी संघटनेच्या शिष्टमंडळाने साखर आयुक्त डॉ. संजय कोलते यांची भेट घेऊन मसुद्यातील शेतकरीविरोधी तरतुदींवर आक्षेप नोंदविला.



शेतकरी संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने केंद्राच्या नव्या कायद्याचा मसुदा शेतकऱ्यांच्या हितापेक्षा साखर कारखानदारांच्या फायद्याचा असल्याचा आरोप केला. बैठकीत मसुद्यातील विविध कलमांवर सविस्तर चर्चा झाली.

शेतकरी संघटनेने सरकारकडे मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये दोन साखर कारखान्यांमधील प्रस्तावित २५ किलोमीटर अंतराची अट रद्द करण्याची मागणी करण्यात आली. डॉ. सी. रंगराजन समितीच्या शिफारशीनुसार अंतराची कोणतीही सक्ती नसावी, असे संघटनेचे मत आहे. तसेच एफआरपीचा निर्धारित साखर उतारा १०.२५ टक्क्यांऐवजी पूर्वीच्या एसएमपी कायद्यानुसार ८.५ टक्के ठेवावा, अशी मागणी करण्यात आली.

एफआरपी निश्चित करताना साखरेच्या विक्री मूल्याऐवजी प्रत्यक्ष ऊस उत्पादन खर्चाचा विचार करावा, अशीही सूचना संघटनेने केली. ऊस पुरवठ्यानंतर १४ **(पान ४ वर)**

## सोनईत कौतुकी नदी सुशोभीकरण व पुनर्जीवन कामाचा शुभारंभ

### संकल्प दिनानिमित्त ५१ मुलींच्या शैक्षणिक पालकत्व उपक्रमाची घोषणा

**भरत थोरात । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रम राबवत संकल्प दिन साजरा करण्यात आला. मंगळवार, दि. १२ मे २०२६ रोजी त्यांच्या वाढदिवसानिमित्त सोनई येथील कौतुकी नदीच्या सुशोभीकरण व पुनर्जीवन उपक्रमाचा शुभारंभ वेदांताचार्य ह.भ.प. देविदास महाराज म्हस्के तसेच माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या हस्ते करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक यशवंत प्रतिष्ठानचे कार्यकर्ते बाबा अनारसे यांनी केले. माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मार्गदर्शनाखाली यशवंत प्रतिष्ठान मार्फत कौतुकी नदी सुशोभीकरण उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



नेवासा तालुक्यातील सोनई येथे कौतुकी नदी पुनर्जीवन व सुशोभीकरण कार्यक्रमाचा शुभारंभ करताना वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के, माजी मंत्री शंकरराव गडाख, मा. आ. पांडुरंग अभंग व उपस्थित मान्यवर (छाया-सुधीर चव्हाण नेवासा)

यावेळी बोलताना शंकरराव गडाख म्हणाले की ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांच्या वाढदिवसाच्या निमित्त नेवासा तालुक्यात गेल्या अनेक वर्षांपासून विविध सामाजिक उपक्रम राबविले जात आहेत. सामाजिक दायित्वाची जाणीव ठेवून हे उपक्रम राबविले जात असून त्यासाठी समाजाचे मोठे पाठबळ लाभत आहे. दत्तकग्राम, गाव तिथे वाचनालय, संकल्प साध्या विवाहाचा, मरणोत्तर नेत्रदान, वृक्षारोपण व संगोपन यांसह विविध उपक्रम वर्षभर राबविले जातात.

### नदीचे पुनर्जीवन व ५१ मुलींचे दत्तक पालकत्व

**कौतुकी नदी पुनर्जीवन व सुशोभीकरण उपक्रमाची सुरुवात तसेच ५१ मुलींच्या शैक्षणिक दत्तक पालकत्व उपक्रमाचा प्रारंभ ज्येष्ठ साहित्यिक यशवंतराव गडाख यांच्या वाढदिवसानिमित्त करण्यात आला. यावेळी हजारो कार्यकर्त्यांची उपस्थिती होती.**

यशवंतराव गडाख यांनी तालुक्याचे प्रश्न सोडविण्यासाठी तसेच विविध संस्था उभारण्यासाठी मोठे योगदान दिले. त्यांनी दाखविलेल्या मार्गावर समाजहिताचे उपक्रम आपण सातत्याने राबवत आहोत.सोनईसह परिसराची जीवनदायिनी असलेल्या कौतुकी नदीचे २०१२ मध्ये प्रशांत गडाख यांनी यशवंत प्रतिष्ठानच्या माध्यमातून सुशोभीकरण करून नदीचे रुपडे पालटले होते. मात्र वाढते नागरीकरण, नदीत सोडले जाणारे सांडपाणी व कचरा यामुळे नदीच्या प्रवाहात अडथळे निर्माण झाले होते. त्यामुळे पहिल्या टप्प्यात नदीचे पुनर्जीवन आणि दुसऱ्या टप्प्यात सुशोभीकरण करण्यात येणार असल्याची माहिती देत यासाठी यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या वतीने १० लाख रुपयांच्या देणगीची घोषणा करण्यात आली. **(पान ४ वर)**

# भवितव्याचा बाजार

## पेपरफुटीच्या दलदलीत अडकलेली शिक्षणव्यवस्था..!

देशातील तब्बल २२ लाख विद्यार्थ्यांच्या भविष्याशी निगडित असलेली 'नीट' परीक्षा पेपरफुटीमुळे रद्द होणे, ही केवळ एक शैक्षणिक घटना नाही; तर भारतीय शिक्षणव्यवस्था, प्रशासन आणि शासन यंत्रणेच्या विश्वासार्हतेवर बसलेला मोठा आघात आहे. डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहणारी लाखो मुले एका-एका गुणासाठी रात्रंदिवस अभ्यास करतात, अनेक कुटुंबे कर्ज काढतात, पालक आपल्या मुलांच्या शिक्षणासाठी आयुष्याची कमाई खर्च करतात; पण शेवटी त्यांचे भविष्य काही दलाल, भ्रष्ट अधिकारी आणि पेपर माफियांच्या हातात लिलावासाठी ठेवले जाते, ही बाब अत्यंत संतापजनक आणि तितकीच भयावह आहे.

नीट परीक्षेचा पेपर तब्बल ४२ तास आधी सोशल मीडियावर फिरत होता, गेस पेपरमधील प्रश्न जसेच्या तसे मुख्य प्रश्नपत्रिकेत आढळले, काही जणांनी लाखो रुपये घेऊन प्रश्नपत्रिका विकल्या, राज्यांपलीकडे साखळी निर्माण झाली, आणि हे सर्व होत असताना परीक्षा यंत्रणा झोपेत होती का, हा प्रश्न आता देशातील प्रत्येक विद्यार्थ्याच्या मनात आहे. नाशिक ते राजस्थान आणि हरियाणा ते बिहार असा या रॅकेटचा विस्तार असल्याचे प्राथमिक तपासातून समोर येत आहे. म्हणजेच ही एखाद्या छोट्या टोळीची करामत नसून संघटित गुन्हेगारीचे मोठे जाळे असल्याचे स्पष्ट होते.

सर्वात गंभीर बाब म्हणजे ही पहिली घटना नाही. गेल्या काही वर्षांत एमपीएससी, यूपीएससी, टीईटी, पोलीस भरती, आरोग्य विभाग भरती, रेल्वे भरती, एसआरपीएफ भरती अशा अनेक परीक्षांमध्ये पेपरफुटीचे प्रकार उघड झाले आहेत. महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या परीक्षांमध्ये झालेल्या गैरव्यवहारांमुळे हजारो विद्यार्थ्यांचे करिअर अडकल्याच्या घटना अजून ताज्या आहेत. बिहार, राजस्थान, उत्तर प्रदेशसारख्या राज्यांमध्ये तर पेपरफुटी ही जवळपास सिस्टमच बनली आहे. परीक्षा होण्याआधीच प्रश्नपत्रिका विकणे, व्हॉट्सअॅपवर शेअर करणे, बनावट उमेदवार बसवणे, तांत्रिक यंत्रणेत हस्तक्षेप करणे असे प्रकार सातत्याने घडत आहेत.

या सगळ्या घटनांमुळे सर्वात मोठा फटका बसतो तो प्रामाणिक विद्यार्थ्यांना. वर्षभर मेहनत करणारा विद्यार्थी आणि पैशांच्या जोरावर पेपर विकत घेणारा उमेदवार यांच्यात स्पर्धा कशी होणार? ही व्यवस्था गुणवत्तेपेक्षा पैशाला महत्त्व देत असेल, तर देशाच्या भविष्याबाबत भीती निर्माण होणे स्वाभाविक आहे. उद्या अशाच प्रकारे डॉक्टर, अधिकारी, अभियंते किंवा पोलीस भरती होत असतील, तर त्या व्यवस्थेवर नागरिकांनी विश्वास ठेवायचा कसा?




पेपरफुटीचे हे उद्योग इतक्या मोठ्या प्रमाणावर चालतात म्हणजे त्यामागे केवळ काही दलाल नसतात. प्रश्नपत्रिका छपाईपासून ते वितरणापर्यंत अनेक स्तरांवर साखळी कार्यरत असते. परीक्षा घेणाऱ्या संस्थांमधील काही भ्रष्ट घटक, खासगी एजन्सी, तांत्रिक कर्मचारी, कोचिंग क्लासेस आणि आर्थिक गुन्हेगारीचे जाळे यांचा यात सहभाग असण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे केवळ एखाद-दुसऱ्या आरोपीला अटक करून हे प्रकरण संपणार नाही. या संपूर्ण व्यवस्थेचे मूळ उपटावे लागेल.

केंद्र सरकारने नीट परीक्षा रद्द करून सीबीआय चौकशी जाहीर केली, ही स्वागतार्ह बाब असली तरी ती पुरेशी नाही. पेपरफुटी हा आता राष्ट्रीय सुरक्षेशी संबंधित विषय बनला आहे. कारण देशातील तरुणांचा व्यवस्थेवरील विश्वास ढासळणे हे कोणत्याही लोकशाहीसाठी धोकादायक असते. शिक्षण व्यवस्थेवरचा विश्वास तुटला की समाजात नैराश्य, संताप आणि अन्यायाची भावना वाढते.




राजकीय स्तरावरही या विषयावर गंभीर चर्चा होणे आवश्यक आहे. विरोधकांनी सरकारवर टीका करणे स्वाभाविक आहे; मात्र हा विषय केवळ आरोप-प्रत्यारोपांचा राहता कामा नये. कारण सत्ताधारी बदलले तरी पेपरफुटीचे प्रकार थांबलेले नाहीत. त्यामुळे राजकीय इच्छाशक्ती आणि कठोर कायदेशीर यंत्रणा उभारणे ही काळाची गरज आहे.

आज गरज आहे ती परीक्षाव्यवस्था पूर्णपणे पारदर्शक आणि तंत्रज्ञानाधारित करण्याची. प्रश्नपत्रिकांची डिजिटल सुरक्षा, एन्क्रिप्टेड वितरण, स्वतंत्र देखरेख यंत्रणा, दोषींना कठोर शिक्षा आणि जलदगती न्यायप्रक्रिया याशिवाय या रोगावर इलाज होणार नाही. पेपरफुटी करणाऱ्यांना केवळ अटक नव्हे, तर देशद्रोहासारख्या गंभीर गुन्ह्यांत कारवाई करण्याची वेळ आता आली आहे. कारण ते एका व्यक्तीचे नाही, तर संपूर्ण देशाच्या भविष्याचे नुकसान करत आहेत.

भारत आज जगातील सर्वात तरुण देश म्हणून ओळखला जातो. ही तरुणाईच देशाची खरी ताकद आहे. पण तिच्याच स्वप्नांशी असा खेळ सुरू राहिला, तर देशाची गुणवत्ता, प्रशासन आणि सामाजिक विश्वास यांची पायाभरणी कमकुवत होईल. नीट पेपरफुटी ही केवळ एका परीक्षेची दुर्घटना नाही; ती संपूर्ण व्यवस्थेला मिळालेली गंभीर इशारा घंटा आहे. आता तरी शासन, प्रशासन आणि समाजाने जागे होण्याची गरज आहे. नाहीतर उद्या विद्यार्थ्यांचा संताप आणि नैराश्य हीच या व्यवस्थेची सर्वात मोठी शोकांतिका ठरेल.

# सतीश तनपुरे व सहकाऱ्यांचा राहुरी ते वैष्णव देवी पायी प्रवास

राजेंद्र परदेशी । राष्ट्र सह्याद्री



**राहुरी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील राहुरी येथील सुप्रसिद्ध शुभकिर्ती उद्योग समूहाचे उद्योगपती व माता वैष्णोदेवीचे निस्सीम भक्त सतीषकाका तनपुरे यांनी पुन्हा एकदा भक्ती, सेवाभाव आणि जिद्दीचा एक अनोखा आदर्श भक्तांसमोर निर्माण केला आहे. वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी त्यांनी यंदा थेट पायी प्रवास सुरू केला असून, आज त्यांच्या या प्रवासाचा ३९ वा दिवस पूर्ण झाला आहे. सध्या ते राजस्थानमधील भुंदी शहरात पोहोचले असून, त्यांच्या पावलांमागे वैष्णव देवीवर असलेली निस्सीम श्रद्धा आणि सेवाभावाची प्रेरणादायी कहाणी उभी आहे. दररोज तब्बल ३० किलोमीटर अंतर पायी पार करत सतीषकाका तनपुरे हे आपल्या सहकाऱ्यांसह पुढे सरकत आहेत. या पदयात्रेत त्यांच्यासोबत बाळासाहेब कुर्हाट, सुभाष चोपडे आणि गोरख कटारे यांचा समावेश असून, एकूण ५ जणांचा हा देवीवर असलेल्या अढळ भक्तीचा हा प्रवास सुरू आहे. सुमारे ९० दिवसांच्या या यात्रेत ते जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात वैष्णोदेवी कटरा येथे पोहोचण्याचा संकल्प पूर्ण करणार असल्याचा त्यांचा मानस आहे.

### ९० दिवसांत वैष्णव देवी गाठण्याचा मानस! ३८ दिवसांत राजस्थान गाठले

विशेष म्हणजे यापूर्वी सतीषकाका तनपुरे हे गेल्या २० वर्षांपासून हजारो भाविकांना मोफत रेल्वेने वैष्णोदेवीच्या दर्शनासाठी घेऊन जात आहेत. त्यांच्या या सेवेमुळे आतापर्यंत तब्बल ६० ते ७० हजार भाविकांना दर्शनाचा लाभ मिळालेला आहे. या सेवाभावी कार्याच्या २१ व्या वर्षानिमित्त त्यांनी स्वतः पायी वैष्णोदेवीला जाण्याचा निर्धार केला असून, त्यांची ही पदयात्रा सर्वत्र चर्चेचा विषय ठरला आहे.या पदयात्रेदरम्यान सतीषकाका आणि त्यांच्या सहकाऱ्यांना विविध धार्मिक स्थळांचेही दर्शन घडत आहे. नर्मदा नदी, उज्जैन येथील महाकालेश्वर मंदिर, भगवान परशुराम जन्मस्थान तसेच राजस्थानमधील अनेक देवस्थानांना भक्ती भावाने त्यांनी भेट दिली आहे. प्रत्येक ठिकाणी भक्तीचा रंग अधिक गडद होत असून, त्यांची यात्रा ही केवळ पायी चालण्याची नसून आध्यात्मिक साधनेचा प्रवास ठरत आहे.राहुरीसह संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात सतीषकाका तनपुरे यांच्या या पदयात्रेचे कौतुक होत असून, त्यांच्या जिद्दीला आणि सेवाभावाला सर्व स्तरांतून त्यांचे कौतुक केले जात आहे. श्रद्धा, सेवा आणि चिकाटी यांचा संगम असलेली ही यात्रा अनेकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. भक्ती ही केवळ हात जोडून नव्हे तर परमेश्वरावरील असलेले अढळ श्रद्धा असेल तर सर्व काही शक्य होत असते हे त्यांनी या भक्तीमय प्रवासातून दाखवून दिले आहे.

# टाकळीभान येथे चौथे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन २० मे रोजी

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**टाकळीभान :** श्रीरामपूर तालुक्यातील टाकळीभान येथील सामाजिक, सांस्कृतिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्यरत ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्था यांच्या वतीने चौथे राज्यस्तरीय मराठी ग्रामीण साहित्य संमेलन बुधवार, दि. २० मे रोजी आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनात उत्कृष्ट मराठी अध्यापन सेवा व साहित्य क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचा गौरव करण्यात येणार असून महाराष्ट्रातील नामवंत कवी-साहित्यिकांची मैफलही रंगणार आहे. संमेलनाध्यक्ष म्हणून डॉ. सुवर्णा चव्हाण गुंड उपस्थित राहणार आहेत. प्रमुख पाहुणे म्हणून विठ्ठलराव लंघे, हेमंत ओगले तसेच डॉ. वंदनाताई मुरकुटे उपस्थित राहणार आहेत. संमेलनाचे उद्घाटन राजन लाखे यांच्या हस्ते होणार असून स्वागताध्यक्ष म्हणून प्रकाश कुलथे उपस्थित राहतील. ग्रामीण साहित्य : स्थिती व गती या विषयावर परिसंवादाचे आयोजन करण्यात आले असून त्यात विविध साहित्यिक व अभ्यासक सहभागी होणार आहेत. यावेळी गावपण या गावपण पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते करण्यात येणार आहे. तसेच कविसंमेलन, साहित्य मैफल व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संमेलनास साहित्यप्रेमींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष अर्जुन राऊत व उपाध्यक्ष संदीप पटारे यांनी केले आहे.

# कासारा दुमाला येथे सर्व्हिस रस्त्या अभावी नागरिक त्रस्त

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**संगमनेर :** शहरालगतच्या कासारा दुमाला शिवारातील नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्गावर सर्व्हिस रस्ता नसल्यामुळे स्थानिक नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरे जावे लागत असल्याच्या व्यथा परिसरातील नागरिकांनी आमदार खताळ यांच्यासमोर मांडल्या. यानंतर त्यांनी पुणे-नाशिक राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण विभागाच्या प्रोजेक्ट मॅनेजर यांना तातडीने सर्व्हिस रस्ता तयार करण्याच्या सूचना दिल्या आहेत. कासारा दुमाला शिवारातील अकोले रोड चौफुलीच्या पूर्वेकडील भागात सुमारे ३५० लोकसंख्या वास्तव्यास आहे. नाशिक-पुणे राष्ट्रीय महामार्ग बांधकामावेळी वस्तीमधूनच रस्ता गेल्याने वस्ती दोन भागांत विभागली गेली आहे. नियमा नुसार अशा चौफुलीच्या ठिकाणी दोन्ही बाजूंना सर्व्हिस रस्त्याची सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक असते, जेणे करून स्थानिक नागरिकांना सुरक्षित पणे महामार्गावर ये-जा करता येईल. आणि पुणे नाशिक राष्ट्रीय महामार्गाने येणाऱ्या वाहनांना सुद्धा कुठलाही अडथळा होणार नाही याची महामार्ग विभागाने दक्षता घ्यावी अशी मागणी करण्यात आली आहे

पूर्वेकडील बाजूस आजपर्यंत सर्व्हिस रस्ता तयार करण्यात आलेला नाही. याबाबत अनेक वेळा संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठपुरावा करूनही आज करू, उद्या करू अशी आश्वासने देत नागरिकांची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप स्थानिकांनी केला आहे. सध्या या मार्गावर सिमेंट काँक्रीटीकरणाचे काम सुरू असून, काम पूर्ण झाल्यानंतर वाहनांचा वेग आणखी वाढणार असल्याने अपघाताचा धोका अधिक गंभीर बनला आहे. सर्व्हिस रस्ता नसल्यामुळे नागरिकांना थेट महामार्गावर चढावे लागत असून, अनेकदा वाहतूक नियमांचे उल्लंघन करून विरुद्ध दिशेने जावे लागते. त्यामुळे या परिसरात अपघातांचे प्रमाण वाढले असून जीवितहानीच्या घटनाही घडल्या आहेत. शालेय विद्यार्थ्यांना शाळेत जाण्यास, रुग्णांना शहरातील दवाखान्यांमध्ये वेळेत पोहोचण्यास तसेच आपत्कालीन परिस्थितीत पोलीस व इतर यंत्रणांना घटनास्थळी पोहोचण्यास मोठ्या अडचणी निर्माण होत आहेत. या परिसरात वालझाडे वस्ती, भिल्ल वस्ती तसेच सय्यद बाबा दर्गा असून सर्वधर्मीय भाविक आणि नागरिक मोठ्या संख्येने या ठिकाणी ये-जा करतात. त्यामुळे सर्व्हिस रस्ता निर्माण करणे ही केवळ स्थानिकांची मागणी नसून सार्वजनिक सुरक्षेची अत्यंत महत्त्वाची गरज असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.

# शतकाहून जुना लोखंडी पुलाचा वारसा जपत आधुनिक तंत्रज्ञानातून उभारला नवा पूल



प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी :** दौंड-मनमाड रेल्वे मार्गावरील दुहेरीकरणाच्या महत्त्वपूर्ण कामांतर्गत राहुरी रेल्वे स्टेशन परिसरातील मुळा नदीवर अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून नवीन रेल्वे पूल उभारण्यात आला असून तो रेल्वे वाहतुकीसाठी खुला करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, सुमारे शंभर वर्षांपूर्वी इंग्रजकालीन पद्धतीने बांधण्यात आलेल्या ऐतिहासिक लोखंडी पुलाच्या शेजारीच हा नवा पूल उभारण्यात आला आहे. जुन्या पुलाचा ऐतिहासिक वारसा आणि नवीन पुलाची आधुनिक रचना यामध्ये विलक्षण साधर्म्य दिसून येत असल्याने नागरिक व रेल्वेप्रेमींमध्ये या पुलाबाबत विशेष आकर्षण निर्माण झाले आहेम.

दौंड-मनमाड रेल्वे मार्ग हा अहिल्यानगर जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्रासाठी अत्यंत महत्त्वाचा मार्ग मानला जातो. भविष्यात रेल्वे गाड्यांची संख्या वाढणार असल्याने केंद्र सरकारने नगर-मनमाड मार्गाचे दुहेरीकरण हाती घेतले आहे. त्याचाच एक भाग म्हणून राहुरी रेल्वे स्टेशनजवळील मुळा नदीवरील नवीन पूल उभारण्यात आला आहे. यापूर्वी पढेगाव ते राहुरी तसेच वांबोरी ते राहुरी या दरम्यान दुहेरी मार्गावरील चाचण्या यशस्वीरीत्या पूर्ण झाल्यानंतर आता या मार्गावर दुहेरी रेल्वे वाहतूक सुरू झाली आहे.

### आधुनिक तंत्रज्ञानातून साकारला नवा पूल

नवीन पुलाच्या बांधकामात अत्याधुनिक अभियांत्रिकी तंत्रज्ञानाचा वापर करण्यात आला आहे. नदीच्या खोल पात्रात मजबूत काँक्रीट कॉलम उभारून पूल साकारण्यात आला आहे. वाढती रेल्वे वाहतूक, जड मालगाड्या आणि वेगवान रेल्वेसेवा लक्षात घेऊन या पुलाची रचना करण्यात आली आहे. सुरक्षितता, मजबुती आणि दीर्घकालीन टिकाव यांना प्राधान्य देण्यात आले आहे.

विशेष म्हणजे, नवीन पुलाची रचना करताना जुन्या पुलाच्या स्थापत्यशैलीचा प्रभाव जपण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचे दिसून येते. त्यामुळे दोन्ही पुलांमध्ये साधर्म्य जाणवते आणि परिसराला एक वेगळे ऐतिहासिक सौंदर्य प्राप्त झाले आहे. जुन्या पुलाला खालील बाजूने लोखंडी ग्रीलचा आधार देण्यात आलेला होता, तर नवीन पुलामध्ये वरच्या बाजूने मजबूत लोखंडी संरचना उभारण्यात आली आहे. जुन्या पुलात दगडी बांधकामाचा मोठ्या प्रमाणावर वापर करण्यात आला होता, तर नवीन पूल आधुनिक काँक्रीट कॉलम आणि प्रगत तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उभारण्यात आला आहे. दुहेरी रेल्वेमार्गामुळे रेल्वे वाहतुकीचा वेग वाढणार असून गाड्यांच्या वेळापत्रकात सुधारणा होण्याची शक्यता आहे. मालवाहतुकीलाही मोठी मदत होणार आहे. राहुरी, वांबोरी, पढेगाव परिसरातील नागरिकांसाठी ही सुविधा विकासाच्या दृष्टीने महत्त्वाची मानली जात आहे. स्थानिक नागरिकांनी नवीन पुलाच्या कामाबद्दल समाधान व्यक्त केले असून, जुन्या पुलाचा ऐतिहासिक वारसा जपण्याची मागणीही केली आहे. रेल्वे प्रशासनाने दोन्ही पुलांचे संवर्धन आणि सुरक्षितता कायम ठेवण्याचे आश्वासन दिले आहे.

### इंग्रजकालीन पुलाचा ऐतिहासिक वारसा

मुळा नदीवरील जुना लोखंडी पूल हा ब्रिटिशकालीन अभियांत्रिकीचा उत्कृष्ट नमुना मानला जातो. अंदाजे शंभर वर्षांपूर्वी आधुनिक यंत्रसामग्री नसताना केवळ पारंपरिक तंत्रज्ञान, दगडी बांधकाम आणि लोखंडी संरचनेच्या आधारे हा पूल उभारण्यात आला होता. पुलाच्या पायाभरणीत मोठमोठ्या दगडांचा वापर करण्यात आला असून त्याची रेखीव बांधणी आजही भक्कमपणे उभी आहे. काळाच्या ओघात अनेक पावसाळे, पुरस्थिती आणि वाढता रेल्वे ताण सहन करूनही हा पूल अजूनही मजबूत असल्याचे दिसून येते. त्या काळात रेल्वे हेच ग्रामीण भागासाठी मुख्य वाहतुकीचे साधन होते. बस, घोडागाडी आणि बैलगाडी यांच्या जोडीला रेल्वेचा वापर मोठ्या प्रमाणावर होत असे. त्यामुळे या पुलाचे त्या काळात विशेष महत्त्व होते. अनेक पिढ्यांच्या आठवणी या पुलाशी जोडल्या गेल्या आहेत.

# प्रवरा ग्रामीण रुग्णालयात दोघांवर मूत्रपिंड प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वी;

## आई-बहिणीच्या मूत्रपिंड दानातून दोन रुग्णांना नवजीवन

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री



**लोणी :** लोणी ता. राहाता येथील डॉ. विठ्ठलराव विखे पाटील प्रवरा ग्रामीण रुग्णालयाने ग्रामीण भागातील दोन रुग्णांना नवसंजीवनी देत पुन्हा एकदा आरोग्य सेवेत महत्त्वपूर्ण कार्य केले आहे. महाराष्ट्र शासनाच्या सहकार्याने सुरू असलेल्या अवयव प्रत्यारोपण केंद्रात एका आईने आपल्या ३६ वर्षीय मुलाला, तर एका बहिणीने आपल्या ४८ वर्षीय भावाला मूत्रपिंड दान केले. दोन्ही किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पार पडल्या असून रुग्णांना नवजीवन मिळाले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील ३६ वर्षीय तरुण गेल्या दोन वर्षांपासून डायलिसिसवर होता. उपचारासाठी तो लोणी येथील प्रवरा मेडिकल रुग्णालयात दाखल झाला होता. तपासणीनंतर डॉक्टरांनी किडनी प्रत्यारोपण हाच एकमेव पर्याय असल्याचे स्पष्ट केले. त्यानंतर त्याच्या आईने स्वतःचे मूत्रपिंड दान करण्याचा निर्णय घेतला. तसेच अहिल्यानगर जिल्ह्यातील ४८ वर्षीय व्यक्तीस देखील त्यांच्या बहिणीने मूत्रपिंड दान केले. या महत्त्वपूर्ण शस्त्रक्रियेसाठी रुग्णालय प्रशासनातील अधिष्ठाता डॉ. सतीश महाजन, रुग्णालय प्रशासन संचालक डॉ. योगेंद्र सिंह, वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुरेश जगदाळे, डॉ. एन. एस. पवार, डॉ. जोरवेकर, डॉ. तुषार भवर, डॉ. संजय चौधरी, डॉ. अमोल भालेराव, डॉ. मयूर गंगवाल, डॉ. ऋषिकेश वाघोलीकर, डॉ. काजल दरंडले, डॉ. रोहन रघुवंशी, डॉ. सूरज बांगर, डॉ. भाग्यश्री पुराणिक तसेच इतर तज्ज्ञ डॉक्टरांचे मोलाचे सहकार्य लाभले. अवयव प्रत्यारोपण शस्त्रक्रियेत डॉ. विपिन विभुते, डॉ. राहुल तांबे, डॉ. मनीषप्रसाद पाठक यांच्या नेतृत्वाखालील तज्ज्ञ टीमने ही शस्त्रक्रिया यशस्वीरीत्या पूर्ण केली. तसेच अवयव प्रत्यारोपण समन्वयक ज्ञानेश्वर गाडेकर यांनी महत्त्वपूर्ण समन्वय साधला. रुग्णालयातील अत्याधुनिक वैद्यकीय उपकरणे, सुसज्ज ऑपरेशन थिएटर, अनुभवी डॉक्टरांची टीम, रुग्णांचे नातेवाईक आणि प्रशासन यांच्या संयुक्त परिश्रमामुळे हे यश संपादन करता आले. लोणी येथील प्रवरा ग्रामीण रुग्णालयात महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना आणि आयुष्मान भारत योजनेअंतर्गत किडनी प्रत्यारोपण शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करण्यात येत असल्याची माहिती रुग्णालय प्रशासनाने दिली आहे. गरजू रुग्णांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन करण्यात आले असून अधिक माहितीसाठी ९९७५३०९७०५ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# कोपरगाव शहराच्या हद्दवाढ भागासाठी स्वतंत्र वीज वाहिनी टाका : आ. आशुतोष काळे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**कोळपेवाडी :** कोपरगाव शहराच्या हद्दवाढ झालेल्या भागातील नागरीकांना अनियमितपणे वीजपुरवठा होत असल्यामुळे घरगुती वीज ग्राहकांना व छोट्या मोठ्या व्यावसायिकांच्या अडचणी वाढल्या आहेत. त्यासाठी कोपरगाव शहराच्या हद्दवाढ झालेल्या भागासाठी कोपरगाव सबस्टेशनमधून स्वतंत्र वीज वाहिनी टाका अशा सूचना आमदार आशुतोष काळे यांनी महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना दिलेल्या पत्रात केल्या आहेत. दिलेल्या पत्रात आमदार आशुतोष काळे यांनी असे म्हटले आहे की, कोपरगाव शहराचा दिवसेंदिवस विस्तार वाढत चालला असून कोपरगाव शहराच्या सभोवताली अनेक नवीन उपनगरे वसली आहेत. कोपरगाव शहराच्या या उपनगरांपैकी माधवनगर, सानपवस्ती, देवकर प्लॉट आणि गवारे वस्ती या परिसराचा समावेश जरी नगरपालिकेत झाला असला तरी या भागाला अद्यापही ग्रामीण भागातून वीज पुरवठा केला जात आहे.त्यामुळे अनेक वेळा या उपनगरातील नागरीकांना अनियमितपणे वीजपुरवठा होत असतो.

सध्या उष्णता मोठ्या प्रमाणात वाढली असून वीज गेल्यानंतर उष्णतेचा त्रास अधिकच वाढतो. अशावेळी शेजारच्या उपनगरात किंवा कोपरगाव शहरात वीज असते परंतु आम्हाला मात्र अंधारात राहावे लागते त्याचा परिणाम छोट्या मोठ्या व्यावसायिकांच्या व्यवसायावर होवून त्यांचे आर्थिक नुकसान होत आहे. कोपरगाव नगरपरिषदेच्या हद्दवाढ झालेल्या माधवनगर, सानपवस्ती, देवकर प्लॉट आणि गवारे वस्तीमधील नागरिकांना नगरपालिकेच्या इतर सर्व नागरी सुविधा मिळत आहेत. मात्र वीज वितरणाची व्यवस्था अद्यापही ग्रामीण फिडरवरच अवलंबून असल्याने या भागातील रहिवाशांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे. माधवनगर, सानपवस्ती, देवकर प्लॉट आणि गवारे वस्तीमधील नागरिकांना येणाऱ्या अडचणींची गंभीर दखल घेवून आमदार आशुतोष काळे यांनी या हद्दवाढ झालेल्या भागाला शहराच्या सबस्टेशनला निरंतर वीज योजने अंतर्गत जोडण्यासाठी स्वतंत्र फिडर अर्थात वीज वाहिनी टाकण्याच्या सूचना महावितरणच्या कार्यकारी अभियंत्यांना दिल्या आहेत.



# महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या विरोधात माळवदे यांची उच्च न्यायालयात याचिका

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा :** राज्यभरातील महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाची कामे पूर्ण करण्यास झालेला विलंब,निकृष्ट दर्जाची कामे, प्रशासन व ठेकेदारांचा भ्रष्टाचार या संदर्भात राज्य सरकार विरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांच्या वतीने मुंबई उच्चन्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल करण्यात आली.सदर याचिका औरंगाबाद खंडपिठातील न्यायाधीश अजित कडेथणकर व विभा कंकनवाडी येथे दाखल करून घेतली आहे.

> पाणी पुरवठ्याच्या लाखो कोटींच्या योजना सरकारच्या नाकर्तेपणामुळे, निधीअभावी आज बंद पडून आहे. प्रशासणाची व ठेकेदारांची भूमिका ही संशयास्पद आहे.पाण्याचा प्रश्न हा जनतेच्या जीविताचा प्रश्न असून यासाठी लढा देणार व जनतेला न्याय मिळवून देणार - संभाजी माळवदे

राज्यभरात पाणी पुरवठ्याची लाखो कोटींची कामे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाअंतर्गत सुरु आहे. यात दहा ते पंधरा गावे मिळून एक योजना अशी कामे सुरु असून यामध्ये हजारो लिटरच्या पाणी साठवण टाक्या, पाणी फिल्टर प्लांट, पाण्याच्या सोअर्स पासून साठवण टाक्यापर्यंत पाईपलाईन टाकणे, गावात अंतर्गत पाईप लाईन टाकणे, अशा कामांचा समावेश आहे. राज्यभरात लाखो करोड रुपयांच्या बजेटची कामे असणाऱ्या या योजना पूर्णत्वास जाण्यास तयार नाही.

जवळ जवळ सर्वच योजनाचा पूर्णत्वाचा कालावधी हा उलटून गेलेला आहे सर्वच योजनाना मुदतवाढ दिलेला कालावधी देखील संपलेला आहे. बऱ्याच ठिकाणी पाणी टाक्याचे काम अपूर्ण आहे, फिल्टर प्लांटचे काम अपूर्ण आहे तर गावातील अंतर्गत पाईप लाईन टाकण्याच्या कामास अजून सुरुवात झालीच नाही. तर काही ठिकाणी टाक्यांची निकृष्ट कामे केल्याने योजना सुरु होण्याआधी टाक्या पडण्याची भीती निर्माण झाली आहे.

कामाच्या पूर्णत्वाचा कालावधी संपल्यावर ठेकेदारास दंड आकारणी करणे गरजेचे असताना ठेकेदारकडून दंड आकारणी न करता ठेकेदारांना प्रशासनानी पाठीशी घालत प्रशासन व ठेकेदार यांनी मिळून मोठा भ्रष्टाचार यामध्ये केला आहे.

याविरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी मजीप्राचे कार्यकारी अभियंता तसेच प्रशासनाकडे पाठपुरावा केला. आंदोलने केली परंतु महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या कामात सुधारणा झाली नाही. अहिल्यानगर विभागात सत्तावण योजनापैकी बोटावर मोजण्या इतक्या योजनाची च कामे सुरु आहेत. राज्यभरात हीच परिस्थिती आहे. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाच्या या ढिसाळ कारभाराच्या विरोधात काँग्रेसचे संभाजी माळवदे यांनी राज्य सरकार विरोधात औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली याचिकाकर्ते संभाजी माळवदे यांच्या वतीने खंडपिठातील वरिष्ठ वकील अॅड.युनूस पठाण हे काम बघत आहे.लवकरच याबाबत पुढील सुनावणी होणार आहे.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विरोधातील ही याचिका ही संपूर्ण राज्यासाठी दिशादर्शक ठरणार आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

द • ख • ल

## दहावीच्या परीक्षेत डी.पॉल स्टेट बोर्ड हायस्कूलची उत्तुंग भरारी



**श्रीरामपूर** : येथील विन्सेन्शन मिशन सर्विस सोसायटी संचलित डी. पॉल इंग्लिश मिडीयम हायस्कूलचा महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा मंडळामार्फत माहे फेब्रू - मार्चमध्ये घेण्यात आलेल्या एसएससी बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकाल लागला परीक्षेत प्रथम क्रमांक शार्वी गोडगे हिने (९५.६०टक्के)मिळवून पटकावला,तर द्वितीय क्रमांक साई दिनेश कुऱ्हे(९५.२०टक्के), तृतीय क्रमांक प्रणाली प्रकाश ताके(९१.२०टक्के),चतुर्थ क्रमांक सृष्टी महेश मरकडे(९१.००टक्के), पाचवा क्रमांक आयुषी शाम ढोकचौळे (९०.४०टक्के), सहावा क्रमांक कार्तिक भागचंद औताडे (९०.२०टक्के), तर विभागून सातवा क्रमांक श्रावणी अनिल ओव्हळ व मृणाल सतीश पैठणे यांनी प्रत्येकी (९०.००टक्के) गुण मिळवत पटकावला. या शैक्षणिक वर्षी विद्यालयातील एकूण ४८ विद्यार्थ्यांनी दहावीची परीक्षा दिली. त्यापैकी ३३ विद्यार्थ्यांनी विशेष प्राविण्य मिळवले. तसेच१४ विद्यार्थी प्रथम श्रेणीत, तर १ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत उत्तीर्ण झाला. या विद्यार्थ्यांना वर्गशिक्षिका सुनयना भालेराव,रिटा ओबेराय,रंजना क्षीरसागर,रेणुका राऊत, हरविंदरसिंग सिद्धू ,शंकर बाहुले,दिपक अहिरे,अपील आल्हाट तसेच सर्वच शिक्षकांचे मार्गदर्शन लाभले.

## शनी देवगाव येथे शनैश्वर जयंती निमित्त सप्ताहाचे आयोजन



**माळवाडगांव** : गोदाकाठावरील वैजापूर तालुक्यातील श्रीक्षेत्र शनी देवगांव येथील शनैश्वर देवस्थान येथे शनैश्वर जयंती निमित्ताने गुरूवार दि.१४ मे पासून त्रिदीनी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. सालाबादप्रमाणे यावर्षीही शनैश्वर जयंती निमित्ताने देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष महंत रामगिरी महाराज यांच्या अध्यक्षतेखाली हरिशरण महाराज,संदिपान महाराज,योगेंद्र गिरी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली.शनैश्वर देवस्थान,ग्रामस्थ व पंचक्रोशीतील गावोगावच्या भाविकांच्या सहकार्याने त्रिदिनी हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे.दररोज सायंकाळी ५ ते ६ हरिपाठ, सायंकाळी ६ ते ८ किर्तन, किर्तनानंतर महाआरती व महाप्रसाद होईल. गुरूवार दि.१४ रोजी सायंकाळी ६ ते ८ स्वामी विश्वनाथ गिरी महाराज चोरवाघलगांव , शुक्रवार दि.१५ रोजी सायंकाळी ६ ते ८ स्वामी अर्जुनगिरी महाराज,शिंगी यांचें सुश्राव्य किर्तन होणार आहे. शनिवार दि.१६ वैशाख अमावस्या शनैश्वर जयंती दिवशी सायंकाळी ५ ते ७ या वेळेत महंत रामगिरी महाराज यांच्या काल्याचे किर्तनाने या त्रिदीनी उत्सव सोहळ्याची सांगता होईल.

# जोर्वे परिसरातील शेतीपंपांचा वीज प्रश्न मार्गी

## ८ तास अखंडित पुरवठ्याचे आश्वासन



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**झरेकाठी** : संगमनेर तालुक्यातील जोर्वे व परिसरातील शेतीपंपांच्या खंडित वीज पुरवठ्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला असून, राज्याचे जलसंपदा मंत्री तथा अहिल्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्तक्षेपानंतर महावितरणने शेतकऱ्यांना दररोज ८ तास अखंडित वीज पुरवठ्याचे आश्वासन दिले आहे. गेल्या काही दिवसांपासून जोर्वे परिसरातील शेतकरी शेतीपंपाच्या अनियमित व खंडित वीज पुरवठ्यामुळे मोठ्या अडचणीत सापडले होते. पिकांना वेळेवर पाणी देता येत नसल्याने उभ्या पिकांचे नुकसान होण्याची भीती निर्माण झाली होती. यामुळे शेतकऱ्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली होती. या गंभीर प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी भाजप मंडळ अध्यक्ष गोकुळ दिघे यांनी पुढाकार घेत पालकमंत्री डॉ. विखे पाटील यांची भेट घेतली.

त्यांनी शेतकऱ्यांच्या अडचणींचे निवेदन सादर करून वीज पुरवठा तातडीने सुरळीत करण्याची मागणी केली. या निवेदनाची तत्काळ दखल घेत पालकमंत्री विखे पाटील यांनी संगमनेर महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना स्पष्ट आदेश दिले. जोर्वे परिसरात प्रत्यक्ष भेट देऊन शेतकऱ्यांशी चर्चा करावी आणि वीज प्रश्न तातडीने सोडवावा, अशा सूचना त्यांनी दिल्या.

यानंतर महावितरणचे कार्यकारी अभियंता वट्टमवार यांनी जोर्वे परिसरात शेतकरी व स्थानिक पदाधिकाऱ्यांसोबत बैठक घेतली. या बैठकीस राहुल दिघे, बाळासाहेब शिंदे, विलासराव मोरे, गणपत शिंदे, कैलास गुंजाळ, मदन देशमुख, संतोष भुजबळ यांच्यासह अनेक शेतकरी उपस्थित होते. बैठकीत शेतकऱ्यांनी तांत्रिक अडचणी, खंडित वीज पुरवठा आणि देखभालीच्या कामांमुळे होणारा त्रास याबाबत सविस्तर मांडणी केली.

बैठकीनंतर महावितरणकडून काही महत्त्वाचे निर्णय जाहीर करण्यात आले. त्यानुसार शेतीपंपांसाठी दररोज सलग ८ तास अखंडित वीज दिली जाईल. या वेळेत कोणतेही परमिट, शटडाऊन किंवा देखभालीची कामे केली जाणार नाहीत. तसेच थ्री-फेज वीज सुरू असताना संबंधित लाईनमन गावात हजर राहील, जेणेकरून तांत्रिक बिघाड झाल्यास तात्काळ दुरुस्ती करता येईल. महावितरणच्या या निर्णयामुळे जोर्वे परिसरातील शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले आहे. शेतकऱ्यांची जुनी मागणी पूर्ण करून प्रश्न मार्गी लावल्याबद्दल पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांचे परिसरातील शेतकरी व पदाधिकाऱ्यांनी आभार मानले.

## हिंदू धर्मातील समाज घटकांना खंबीर पाठींबा : ना. विखे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**



**शिर्डी** : हिंदुत्वासाठी समर्पित भावनेन कार्य करणार्या महंताबद्दल केले गेलेले शब्दप्रयोग निषेधार्ह असून, अहील्यानगरचे भूमीपुत्र आचार्य गोविंददेव गिरीजी महाराज,महंत भास्करगिरी महाराज आणि महंत रामगिरी महाराज यांच्या पाठीशी हिंदू धर्मातील समाज घटक खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. हिंदू धर्म आणि वारकरी सांप्रदायासाठी कार्य करणार्या महंताबद्दल केल्या गेलेल्या उल्लेखाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे यांनी श्रीक्षेत्र देवगड यैथे महंत भास्करगिरी महाराज आणि सरलाबेट येथे जावून महंत रामगिरी महाराज यांची भेट घेतली.

मागील काही दिवसांपासून राज्यात वारकरी संप्रादाय आणि हिंदू धर्मासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तींबद्दल अवमानकारक लिखाण आणि शब्दप्रयोग करून वारकरी संप्रादायात फूट पाडण्याचा जाणीवपुर्वक प्रयत्न केला जात आहे.मात्र अनेक वर्षांची परंपरा असलेला वारकरी संप्रादाय कोणाच्या शब्दप्रयोगाने विचलित होणारा नाही.उलट हिंदुत्वासाठी संत परंपरेचा वारसा घेवून वारकरी सांप्रदाय एकसंघपणे अधिक जोमाने काम करेल आणि समाजालाही अध्यात्माने बांधून ठेवेल असा विश्वास मंत्री विखे यांनी भेटी दरम्यान व्यक्त केला.याप्रसंगी आ.विठ्ठलराव लंघे,नगराध्यक्ष डॉ करणसिंह घुले भाजपाचे जिल्हाध्यक्ष नितीन दिनकर यांच्यासह पदाधिकारी आणि वारकरी सांप्रदायातील कार्यकर्ते उपस्थित होते.

आहिल्यानगरचे भूमीपुत्र आचार्य गोविंददेवगिरी महाराज ह.भ.प.भास्करगिरी महाराज ह.भ.प.रामगिरी महाराजांबद्दल केलेल्या शब्द प्रयोगाचा तीव्र शब्दात निषेध करून मंत्री विखे पाटील म्हणाले की,देव देश आणि धर्मासाठी जीवन समर्पित करणार्या व्यक्तींबद्दल आपण काय बोलतो याचे भानही काहीना राहीलेले नाही. वारकरी कधीच निधर्मी होऊ शकत नाही.वारकरी परंपरेला धर्माचे अधिष्ठान आहे. सांप्रदायाच्या ताकतीमुळे समाज उभा आहे.कोणाच्या मतामुळे हे अधिष्ठान कदापि दूर होवू शकणार नाही. प्रत्येक गोष्टीकडे वोट बॅंक म्हणून पाहणारे मात्र लव्ह जिहादपासून ते कार्पोरेट जिहाद पर्यतच्या एकाही घटनेवर शब्दही बोलत नाही. परंतू हिंदूत्वासाठी आशा घटनांवर परखडपणे भूमिका मांडणाऱ्या महंताप्रती अवमानकारक शब्दप्रयोग करून सामाजिक तेढ निर्माण करण्याचे प्रयत्न निंदनीय असल्याचे मंत्री विखे म्हणाले.

## भोंदू अशोक बाबाची पोलीस कोठडी तीन दिवसांनी वाढली

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तंत्र-मंत्र, उतारे आणि जडीबुटीच्या माध्यमातून अंधश्रद्धेचा आधार घेत एका महिलेकडून लाखो रुपये उकळल्याप्रकरणी अटक करण्यात आलेल्या भोंदू बाबा अशोक आढाव याच्या पोलीस कोठडीत न्यायालयाने आणखी तीन दिवसांची वाढ केली आहे. तपासादरम्यान या प्रकरणात आणखी धक्कादायक बाबी समोर येण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तालुका पोलीस ठाण्यात एका महिलेने दिलेल्या फिर्यादीनुसार, अशोक आढाव याने तंत्र-मंत्राच्या साह्याने उतारे काढून जडीबुटी खाण्यास देत तिचा विश्वास संपादन केला. त्यानंतर विविध कारणे सांगत दक्षिणा आणि धार्मिक विधींच्या नावाखाली ऑनलाईन पद्धतीने तब्बल १५ ते १६ लाख रुपये उकळल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच सोन्याच्या वस्तूंची मागणी करत शरीरसुखाचीही मागणी केल्याचा गंभीर आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणात गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आढाव याला अटक करून न्यायालयात हजर केले होते. त्याची प्राथमिक पोलीस कोठडी संपल्यानंतर सोमवारी पुन्हा न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळी तंत्र-मंत्राच्या माध्यमातून फसवणुकीचा प्रकार गंभीर स्वरूपाचा असल्याचे सांगत अधिक चौकशीसाठी पोलीस कोठडी वाढविण्याची मागणी सरकारी पक्षाने केली. न्यायालयाने ती मान्य करत आढाव याला आणखी तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली. दरम्यान, चौकशीदरम्यान अशाच प्रकारे इतर महिलांची किंवा नागरिकांची फसवणूक झाली आहे का, याचाही तपास सुरू असून या प्रकरणाचा विस्तार होण्याची शक्यता पोलिसांनी व्यक्त केली आहे. तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक अरुण धनवडे पुढील तपास करत आहेत.

## अमृतवाहिनी सहकारी बँकेस उत्कृष्ट डिजिटल व्यवस्थापन पुरस्कार




**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : तालुक्यातील शेतकरी व नागरिकांच्या आर्थिक प्रगतीस हातभार लावणाऱ्या अमृतवाहिनी सहकारी बँकच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे. पुणे येथे आयोजित ऑल इंडिया सहकारी बँक संमेलन २०२६ मध्ये बँकेस उत्कृष्ट डिजिटल व्यवस्थापन पुरस्कार प्रदान करून गौरविण्यात आले. ट्रस्ट इन्फो मीडिया यांच्या वतीने आयोजित या संमेलनात विविध सहकारी बँकांच्या कामगिरीचा गौरव करण्यात आला. यावेळी महाराष्ट्राचे ज्येष्ठ नेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यरत असलेल्या अमृतवाहिनी बँकेच्या डिजिटल सेवांचा विशेष सन्मान करण्यात आला.

पुरस्कार स्वीकारताना बँकेचे चेअरमन सुधाकर जोशी, उपाध्यक्ष ड. नानासाहेब शिंदे, मुख्य कार्यकारी अधिकारी सुशील गुजराथी व आयटी विभागाचे अधिकारी उपस्थित होते. बँकेने ग्राहकांसाठी यूपीआय पेमेंट, एटीएम, आयएमपीएस, मोबाईल बँकिंग यांसारख्या अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. ग्राहकांना जलद, सुरक्षित व सुलभ सेवा देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून महिन्याला ५० कोटी रुपयांहून अधिक डिजिटल व्यवहार बँकेमार्फत होत आहेत.

पुरस्कारानंतर बोलताना चेअरमन सुधाकर जोशी यांनी सांगितले की, नुकत्याच संपलेल्या आर्थिक वर्षात बँकेने १२०० कोटी रुपयांहून अधिक व्यवसाय केला असून ११ कोटी १७ लाख रुपयांचा नफा मिळविला आहे. तसेच बँकेचा नेट एनपीए शून्य टक्के राखण्यात यश आले आहे. या यशाबद्दल डॉ. सुधीर तांबे, सत्यजित तांबे यांच्यासह विविध मान्यवरांनी बँकेचे अभिनंदन केले.

## कुकाणा येथे सुसज्ज बस स्थानक उभारण्यासाठी प्रयत्न करणार : आ. लंघे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




कुकाणा : ग्रामपंचायत नूतन कार्यालय व नागरी सुविधा केंद्राचे भूमिपूजन करताना आमदार विठ्ठलराव लंघे व मान्यवर ( **छाया : सुनिल पंडित** )

**कुकाणा** : नेवासा तालुक्यातील कुकाणा हे गाव मोठ्या बाजारपेठेचे गाव असून या गावाशी परिसरातील अनेक गावांचा संपर्क असल्याने येथे नेहमीच नागरिकांची मोठी वर्दळ असते त्यामुळे नागरि सुविधांचा मोठा आभाव निर्माण होतो म्हणून याठिकाणी जागा उपलब्ध करून सुसज्ज असे बस स्थानक उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे प्रतिपादन नेवासा विधानसभा मतदार संघाचे आमदार विठ्ठलराव लंघे यांनी केले.

कुकाणा (ता. नेवासा ) येथील ग्रामपंचायत कार्यालय व नागरी सुविधा केंद्राचे ४५ लाख रुपये निधी नूतन इमारतीचे भूमीपूजन सोहळया प्रसंगी ते बोलत होते. आमदार विठ्ठलराव लंघे यांच्या हस्ते करण्यात आले.

यामुळे प्रमुख अतिथी म्हणून माजी आमदार पांडुरंग अंभग, ज्ञानेश्वर कारखान्याचे ज्येष्ठ संचालक ड. देसाई देशमुख, गटविकास अधिकारी संजय लखवाल, राष्ट्रवादीचे युवा नेते अब्दुलभाई शेख, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अंकुशराव काळे, ज्ञानेश्वरचे संचालक काशिनाथ नवले नेवासाचे नगराध्यक्ष डॉ करण घुले, सरपंच लताताई अंभग, उपसरपंच शुभांगी कचरे, मंडल अधिकारी तृप्ती साळवे, ग्रामपंचायत सदस्या हकीनाबी शेख, अशोक चौधरी, बबनराव पिसोटे , दत्तात्रय खाटीक, शिवसेनेचे भाऊसाहेब वाघ,अभिजीत लुणिया, माजी सरपंच एकनाथ कावरे, दौलतराव देशमुख, माजी उपसरपंच भाऊसाहेब फोलाणे, विलासराव देशमुख, डॉ. बाळासाहेब कोलते,आदि मान्य वर व्यासपीठावर उपस्थित होते.

कार्याक्रमाचे प्रास्ताविक अमोल अंभग यांनी केले. तर प्रमुख अतिथीचे स्वागत सरपंच लताताई अभंग यांनी केले. आमदार विठ्ठलराव लंघे म्हणाले की स्वर्गीय आमदार वकीलराव लंघे यांनी दिलेली शिकवण व संस्कार या प्रमाणेच निवडणुक झाल्यानंतर राजकारणा पेक्षा समाज कारणालाच जास्त महत्व देत तालुक्यात गेल्या दीड वर्षात विकासकाम करत आहे. तसेच कुकाणा येथे सुसज्ज बस स्थानक, पोलिस ठाणे इमारतीचा प्रश्न याच बरोबर बेलापूर - परळी रेल्वे मार्गासाठी विशेष प्रयत्न करणार असल्याचे ही सांगितले.

माजी आमदार पांडुरंग अंभग,ज्येष्ठ संचालक ॲड. देसाई देशमुख, काशिनाथ नवले यांचे ही भाषणे झाली.यावेळी ग्रामविकास अधिकारी बाळासाहेब आगळे, ॲड. गणेश निकम, किशोर भंडारी, सुभाष चौधरी, रज्जाक इनामदार, सुनिल गोर्डे, मच्छिंद्र भोसले यांच्या सह ग्रामपंचायत सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. सोमनाथ कचरे यांनी आभार मानले.

## श्री साई प्रतिष्ठानच्या उत्सवात अध्यात्म अन् समाजप्रबोधन : महंत उद्धव महाराज मंडलिक

### देवळाली प्रवरातील श्रीराम कथेची काल्याचे कीर्तनाने सांगता

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : कथा, कीर्तन, प्रवचन व व्याख्यान या माध्यमांतून समाजप्रबोधनाची आज नितांत गरज असून श्री साई प्रतिष्ठान संतांच्या विचारांचा वारसा जपत समाजात संस्कार व जनजागृतीचे कार्य करत असल्याचे प्रतिपादन महंत उद्धव महाराज मंडलिक यांनी केले.

देवळाली प्रवरा येथील श्री साई प्रतिष्ठान व शहरवासीयांच्यावतीने वार्षिक श्री साई उत्सव तपपूर्ती व श्री साई मंदिराच्या तृतीय वर्धापन दिनानिमित्त विदर्भरत्न रामराव महाराज ढोक यांच्या सुश्राव्य वाणीतून बाजार तळ परिसरात भव्य श्रीराम कथा पार पडली.

काल सायंकाळी महंत उद्धव महाराज मंडलिक यांच्या काल्याच्या किर्तनाने उत्सवाची सांगता झाली प्रसंगी ते बोलत होते. पुढे बोलताना महंत उद्धव महाराज म्हणाले की, आजच्या बदलत्या सामाजिक परिस्थितीत युवकांमध्ये संस्कार, नैतिकता व अध्यात्मिक मूल्ये रुजविण्याची गरज निर्माण झाली असून, अशा धार्मिक उपक्रमांतून समाजात सकारात्मक विचारांची जपणूक होत असल्याचे त्यांनी नमूद केले.

श्री साई प्रतिष्ठान संतांच्या विचारांचा वारसा जपत समाजात संस्कार, जनजागृती आणि अध्यात्मिक वातावरण निर्माण करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करत असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले. धार्मिक कार्यक्रमांमुळे समाजात एकात्मता, बंधुभाव आणि सद्भावना वाढीस लागते, असेही ते म्हणाले. यावेळी मोठ्या संख्येने भाविक उपस्थित होते. महाप्रसाद वाटपाने सोहळ्याची सांगता झाली. हजारो भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

## पुणतांबा शिव रस्त्याच्या खडीकरणाचे काम अखेर पूर्ण

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणतांबा** : परिसरातील जळगाव - पुणतांबा ह्या शिव रस्त्याच्या खडीकरणाचा एक टप्पा नुकताच पूर्ण झाला आहे. खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्या निधीतून अंदाजे १० लाख रुपये खर्चाचे हे खडीकरणाचे काम पूर्ण करण्यात आले.

जळगाव - पुणतांबा रोडचे जळगावच्या बाजूने अंदाजे तीन किमीटर लांबीच्या रस्त्याच्या डांबरीकरणाचे काम तीन महिन्यापूर्वी पूर्ण झाले हया रसत्यापैकी अंदाजे ३०० मीटर रस्त्याचे काम अपूर्ण होते हे काम व जळगाव - पुणतांबा शिव रस त्याचे अंदाजे ३०० मीटर र सत्याचे खडीकरणाचे काम त्यात पूर्ण करण्यात आहे. जळगाव - पुणतांबा शिव रस त्याची लांबी अंदाजे पावणेतीन किमीटर आहे त्यापैकी अवधे३०० मीटर रस्त्याचे खडीकरण झाले. ६० वर्षानंतर या रस्त्यावर खडी पडली व थोडे का होईना काम झाल्याबद्दल ग्रामस्थाचेमध्ये समाधानाचे वातावरण पसरले आहे.

# २५ ऐतिहासिक किल्ल्यांची अश्वस्वारी मोहीम

## नगराध्यक्ष सत्यजीत कदम व सुपुत्र ध्रुवराज कदमांचा सहभाग



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : पुणे येथील दिग्विजय प्रतिष्ठान हॉर्स रायडिंग अकॅडमी यांच्या वतीने छत्रपती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या स्वराज्यातील २५ ऐतिहासिक किल्ल्यांना भेट देत पवित्र जलसंकलन आणि शिवचरित्र प्रसार अभियानाचे आयोजन करण्यात आले होते.

या भव्य आणि प्रेरणादायी मोहिमेत देवळाली प्रवरा येथील नगराध्यक्ष सत्यजीत कदम व त्यांचे सुपुत्र ध्रुवराज कदम यांनी उत्साहाने सहभाग नोंदवत लक्ष वेधून घेतले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या इतिहासातील पराक्रम, स्वराज्याची संकल्पना आणि राष्ट्रप्रेमाची प्रेरणा युवकांपर्यंत पोहोचावी या उद्देशाने हे शिवचरित्र प्रसार अभियान राबविण्यात आले. विशेष म्हणजे ही संपूर्ण मोहीम पारंपरिक अश्वस्वारीद्वारे पार पडली.

घोड्यावर स्वार होत सहभागी शिवप्रेमींनी डोंगर-दऱ्या, घाटमाथे आणि दुर्गम भाग पार करत तब्बल २५ ऐतिहासिक किल्ल्यांची मोहीम यशस्वीरित्या पूर्ण केली. या अश्वस्वारी मोहिमेदरम्यान विविध ऐतिहासिक किल्ल्यांवर जाऊन स्वराज्याच्या इतिहासाचे स्मरण करण्यात आले. तसेच मोहिमेच्या मार्गावरी सर्व किल्ल्याममधून जलसंकलन करण्यात आले. पारंपरिक वेशभूषा, भगवे ध्वज आणि घोडेस्वारांच्या शिस्तबद्ध ताफ्यामुळे या मोहिमेला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वैभव प्राप्त झाले.

नगराध्यक्ष सत्यजीत कदम यांनी स्वतः अश्वस्वारी करत मोहिमेत सक्रिय सहभाग घेतला. त्यांच्या सोबत सुपुत्र ध्रुवराज कदम यांनीही उत्साहाने घोडेस्वारी करत शिवचरित्र प्रसाराचा संदेश दिला. वडील आणि मुलाने एकत्र सहभागी होत स्वराज्याच्या इतिहासाबद्दल असलेली निष्ठा आणि संस्कार जपल्याचे चित्र या मोहिमेत पाहायला मिळाले. शिवनेरी किल्ल्यावरून या मोहिमेस प्रारंभ होऊन प्रत्येक किल्ल्यावरून जलसंकलन करण्यात येऊन रायगडावर छत्रपती महाराज समाधीस्थळी जल अर्पण करण्यात आले.

**जाहीर नोटीस**

प्रो.फी जमा रु.
प्रो
ने.ता.२९/६/२०२६

तंजीला सलीम शेख,
ॲडव्होकेट, श्रीरामपुर,
ता. १२/५/२०२६

श्रीरामपुर येथील ३ रे सह मे, सिव्हील जज्ज साहेब ज्यु.डी. यांचे कोर्टात
वा.चौ.अ.क्रमांक ३१/२०२६
नि. ६

१. कचरु मारुती लांडे, वय-७७ वर्षे धंदा-शेती,
२. प्रयागाबाई कचरु लांडे, वय-६३ वर्षे धंदा-घरकाम, दोघेही रा.लांडे वस्ती नायगांव ता. श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर-**अर्जदार**

विरुध्द

कोणीही नाही-**सा.वाले**

अर्ज- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ कलम ८ अन्वये वारस दाखला मिळणेसाठी

ज्याअर्थी अर्जदार नंबर १ व २ हे कै. जनाबाई कचरु लांडे यांचे आई वडील आहेत. कै. जनाबाई कचरु लांडे हीस अर्जदार नंबर १ व २ हे कायदेशिर वारस आहेत.

कै. जनाबाई कचरु लांडे हीचे लग्न झालेले नसुन ती हयात असतांना तीचे नांवे बँक ऑफ महाराष्ट्र शाखा अहमदनगर चा खाते नं. ६०३८६६४८५६८ उघडलेले आहे. सदर खात्यावर रक्कम रुपये २,४९,७०४/- अक्षरी रक्कम रुपये दोन लाख एकोणपन्नास हजार सातशे चार मात्र अशी रक्कम एफ डी स्वरुपात जमा आहे. सदर रकमेची पावती नं.०२८०५११ दि.२१/६/२०२१ रोजी सुरु केलेली आहे. सदर पावतीची जमा रक्कम दि.१७/६/२०२१ ते दि.१७/६/२०३१ पर्यंत म्हणजे १० वर्षाकरीता डिपॉझिट केलेली होती. परंतु अर्जदार क्रमांक १ व २ यांची मुलगी कै. जनाबाई कचरु लांडे हीचे दि.४/३/२०२६ रोजी आजारपणामुळे दुःखद निधन झालेले आहे त्यामुळे सदरील रक्कम व त्यावरील होणारे व्याज अर्जदार न. १ व २ यांना प्रत्येकी समान हिस्याप्रमाणे वारसदार म्हणजेच अर्जदार नं. १ व २ या नात्याने मिळणे गरजेचे आहे म्हणुन अर्जदार क्रमांक १ व २ हे मयत जनाबाई कचरु लांडे चे कायदेशिर वारस आहेत असा मे. कोर्टाचा दाखला मिळावा म्हणुन सदरचा अर्ज आहे.

त्याअर्थी सदर अर्जाचे अनुषंगाने कोणाची हरकत असल्यास त्यांनी सदर जाहीर नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसांचे आत स्वतः अगर माहितगार वकील साहेबांमार्फत योग्य त्या पुराव्यानिशी या मे. कोर्टात हजर होवुन आपली हरकत नोंदवावी, अन्यथा अर्जदारांचा लागलीच पुरावा घेण्यात येवुन त्यांचे मागणीप्रमाणे दाखला देणेबाबत आदेश पारीत केला जाईल.

आजरोजी १२/५/२०२६ शिक्क्यानिशी दिले असे.
माझे सहीनिशी व मे. कोर्टाचे

**कामगिरी क्लार्क,**
**३ रे दिवाणी न्यायालय, क स्तर,**
**श्रीरामपुर**

शिक्का

**सहायक अधिक्षक,**
**सह दिवाणी न्यायालय,**
**क, स्तर, श्रीरामपुर**

**जाहीर नोटीस**

निशाणी नंबर
दिनांक : १२/०५/२०२६
नेमलेली तारीख : ११/०६/२०२६
दिवाणी चौकशी अर्ज नं. २१/२०२६

ॲड. डी. आर.धिर्डे
नेवासा कोर्ट,
मो नं. ८८३०३३१६४२

नेवासा येथील मे. जिल्हा व सत्र न्यायाधिश साहेब,
यांचे न्यायालयात

**अर्जदार**-१. मंदा कैलास कोकणे वय ४३, धंदा शेती
२. समिक्षा कैलास कोकणे वय १७, धंदा शिक्षण अर्जदार नं.२ चे अ.पा.क.म्हणून अर्जदार नं.१ जनक आई मंदा कैलास कोकणे दोघे रा. नेवासा बु ता. नेवासा जि. अ.नगर

**सामनेवाले**-कुणीही नाही

वरील अर्जदार यांनी या न्यायालया मध्ये अज्ञान अर्जदार नं.२ यांचे नावावरील मौजे नेवासा बु ता. नेवासा येथील गट नंबर ८६८ पैकी १. हे ०० आर या अज्ञानाचे नावावरील जमिन विक्रीस परवानगी मिळणेसाठी अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी सदरील वादासंबंधी कुणाचेही काही एक म्हणणे किवा कुणाची काही एक हरकत असेल तर या जाहीर नोटीस प्रसिध्द तारखेपासून दि.११/०६/२०२६ रोजी पर्यंत किंवा ३० दिवसाचे आत या न्यायालयात स्वतः अगर वकिलांमार्फत सर्व कागदपत्रानिशी उपस्थित रहावे अन्यथा उपस्थित राहण्यास कसुर केल्यास सदरील अर्जाची सुनावणी होवून योग्य तो हुकूम केला जाईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२/०५/२०२६ रोजी माझी सही निशी व न्यायालयाच्या शिक्यानिशी नोटीस दिली असे. नेवासा

वरिष्ठ लिपीक

शिक्का

**हुकूमावरुन**
**अधिक्षक**
**जिल्हा न्यायालय, नेवासा**

## पान १ वरुन

### सोनईत कौतुकी नदी सुशोभीकरण व पुनर्जीवन कामाचा शुभारंभ

तसेच सोनई गावासाठी नियमित कचरा संकलन व्हावे यासाठी नवीन घंटागाडी उपलब्ध करून दिली जाणार असल्याचेही शंकरराव गडाख यांनी सांगितले. कौतुकी ही फक्त नदी नसून ती आपली माता आहे, अशी भावना ठेवून सर्वांनी या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन त्यांनी केले. सोनई गावातील तरुण, ज्येष्ठ नागरिक तसेच व्यापाऱ्यांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घ्यावा, असेही त्यांनी नमूद केले.

यावेळी यशवंत प्रतिष्ठानने आजपर्यंत तालुक्यातील ११५ मुलींचे शैक्षणिक दत्तक पालकत्व स्वीकारून त्यांना उच्च शिक्षणासाठी मदत केल्याची माहिती देण्यात आली. तसेच संकल्प दिनानिमित्त गरजू कुटुंबातील आणखी ५१ मुलींचे शैक्षणिक पालकत्व स्वीकारण्यात येणार असल्याची घोषणा शंकरराव गडाख यांनी केली.

यावेळी झालेल्या कार्यक्रमास मोठ्या संख्येने ज्येष्ठ कार्यकर्ते, तरुण तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी श्री क्षेत्र ज्ञानेश्वर देवस्थानचे ह.भ.प. वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के यांनी नदीचे पुनर्जीवन आणि निसर्गसंवर्धन हे समाजासाठी अत्यंत महत्त्वाचे कार्य असल्याचे सांगितले. वाढदिवसानिमित्त सामाजिक भान जपणारे कार्यक्रम समाजासाठी प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले.ते पुढे म्हणाले की, नेवासा तालुका भाग्यवान आहे. तालुक्याला यशवंतराव गडाख यांच्यासारखे दूरदृष्टीचे नेतृत्व लाभले. त्यांचे नेतृत्व राज्याला दिशादर्शक आहे. संत-महंतांचा समाजासाठी काम करणाऱ्या नेतृत्वाला नेहमीच आशीर्वाद असतो. कौतुकी नदीचे रुपडे पालटल्याने सोनई गावाच्या वैभवात भर पडणार आहे.मुलींच्या शिक्षणासाठी यशवंत सामाजिक प्रतिष्ठानच्या माध्यमातून घेतलेला पुढाकार कौतुकास्पद असल्याचे सांगत गडाख परिवार जनतेवर प्रेम करणारा परिवार असल्याचेही त्यांनी नमूद केले.

यावेळी उपस्थित सर्वांच्या वतीने यशवंतराव गडाख यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. भर उन्हात हजारोंच्या संख्येने उपस्थित असलेले कार्यकर्ते हे प्रेमाचे प्रतीक असल्याचा उल्लेखही करण्यात आला.याप्रसंगी मा. आ. पांडुरंग अभंग, कारभारी जावळे, प्रकाश शेटे, नागेश आघाव, डॉ. रामनाथ बडे, गफूर बागवान आदींनी मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमास विश्वासराव गडाख, सुनीलराव गडाख, अशोकराव गायकवाड, तुकाराम शेंडे, जबाजी फाटके, कॉ. बाबा आरगडे, नानासाहेब तुवर, रावसाहेब कांगुणे, नंदकुमार पाटील, यशवंत प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष उदयन गडाख, नानाभाऊ नवथर, भगवानराव गंगावणे, दत्तात्रय काळे, अजित मुरकुटे, रंगनाथ रौंदळ, काशिनाथ नवले, तुकाराम मिसाळ, नानासाहेब रेपाळे, दादासाहेब शेळके, काकासाहेब शिंदे, वसंतराव देशमुख,बाळासाहेब पाटील, अशोकराव मिसाळ, हरिभाऊ थोरे, शिवाजी पाठक, दौलत देशमुख, दत्तात्रय खाटीक, मदनराव डोळे, बाळासाहेब नवले, बाप्पूसाहेब शेटे, संजय जंगले, सतीश फुलसौंदर, आण्णासाहेब केदार, पांडुरंग निपुंगे, दादासाहेब दरंदले,रामकीसन कांगुणे, ॲड. गोकुळ भताने, ॲड. आण्णा आंबाडे, प्रा. बाळासाहेब घावटे, ज्ञाना बोरुडे, योगेश होंडे, अशोकराव येळवंडे, सुहास गोंटे, संजय लोखंडे,इकबाल शेख,शिवाजी शेरकर,सचिन चोरडिया, कैलास दरंदले, कैलास जाधव, बाबासाहेब कंक यांच्यासह नेवासा नगरपंचायतीचे नगरसेवक, मुळा कारखाना संचालक मंडळ, बाजार समिती संचालक मंडळ तसेच तालुक्यातील विविध गावांचे सरपंच, उपसरपंच, सदस्य, चेअरमन, व्हाइस चेअरमन, संचालक मंडळ, तरुण व ज्येष्ठ कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

याप्रसंगी उपस्थितांना स्नेहभोजन देण्यात आले. तसेच कौतुकी सुशोभीकरण उपक्रमासाठी नंदकुमार पाटील, ॲड. आण्णासाहेब आंबाडे व इस्माईल शेख यांनी देणगी जाहीर केली.

# कायगाव येथील हॉटेल जय भवानीवर छापा

## २३ जुगाऱ्यावर गुन्हा, १४ लाखांपेक्षा जास्त मुद्देमाल जप्त

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर** : गंगापूर पोलीस ठाणे हद्दीतील कायगाव येथे स्थानिक गुन्हे शाखेने मोठी कारवाई करत 'हॉटेल जय भवानी' येथे सुरू असलेल्या जुगार अडड्यावर छापा टाकून २२ जुगाऱ्यांना ताब्यात घेत एकूण १४ लाख ३३ हजार ६७० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत यांना ११ मे रोजी गोपनीय माहिती मिळाल्यावरुन गंगापूर तालुक्यातील नवीन कायगाव येथील हॉटेल जय भवानी येथे काही इसम पैशाच्या हार जीतवर जुगार खेळत आहेत. या माहितीची तातडीने दखल घेत पोलीस अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड यांनी सदर ठिकाणी छापा मारण्याच्या सूचना दिल्या.त्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने नियोजनबद्ध पद्धतीने हॉटेल जय भवानी येथे अचानक छापा टाकला. या कारवाईत २२ इसम स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी अवैध रित्या जुगार खेळताना रंगेहाथ मिळून आले. तसेच जुगार खेळण्यासाठी जागा उपलब्ध करून देणारा हॉटेल चालक




दीपक आसाराम बोरुडे याच्यासह एकूण २३ जणांविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. जुगार खेळणारे ताब्यात राहुल वाघमारे (रा. माळीचिंचोळा), सागर कदम (रा. प्रवरा संगम), संतोष घुसवकर (रा. सोनई), बाबासाहेब खाजेकर (रा. गंगापूर),गोपीनाथ विटेकर (रा. हंडी निमगाव),राहुल पंडीत (रा. घोडेगाव), अविनाश मिसाळ (रा. अंमळनेर),गोरख हिवाळे (रा. भिवधानोरा), जगन्नाथ दुशिंग (रा. वाळूज), ज्ञानेश्वर औताडे (रा. बाभुळखेडा), नितीन गायकवाड (रा. प्रवरा संगम), अकबर शेख (रा. कायगाव), राम काळे (रा. नेवासा फाटा), विश्वास चंद्रनारायण (रा. नेवासा), ज्ञानेश्वर माने (रा. जामगाव),गणेश ठोंबरे (रा. जामगाव), दत्तात्रय मगरे (रा. नेवासा), सिताराम म्हस्के (रा. बंगलापुर), विष्णू लोहगळे (रा. भिवधानोरा), महेश ढवळे (रा. नेवासा), छबु वाघाडीकर (रा. भेंडा), नितीन जगताप (रा. नेवासा) आणि दीपक बोरुडे (रा. नवीन कायगाव).

या कारवाई दरम्यान पोलिसांनी रोख रक्कम आणि जुगाराचे साहित्य असा एकूण १४,३३,६७० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलीस अधीक्षक विनयकुमार राठोड, अपर पोलीस अधीक्षक अन्नपूर्णा सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली; परिविक्षाधीन पोलीस उपअधीक्षक आरती पवार, विनय सोनवणे, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत, सपोनि पवन इंगळे, पोलीस अंमलदार भागीनाथ वाघ, विष्णू गायकवाड, शिवानंद बनगे, अनिल काळे या पथकाने सदरची कारवाई केली आहे.

# खिर्डी येथील अखंड हरिनाम सप्ताहाची काल्याच्या किर्तनाने सांगता

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा :** श्रीरामपूर तालुक्यातील खिर्डी येथील हनुमान मंदिर प्रांगणात सुरू असलेल्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळयाची तीर्थक्षेत्र नेवासा येथील संत ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे प्रमुख महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांच्या काल्याच्या किर्तनाने काल्याची दहीहंडी फोडून मंगळवारी दि.१२ मे रोजी भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली.सप्ताह सोहळयाचे हे ३१ वे वर्ष होते.



जीवनात मनात भाव धरून एकदा तरी ग्रंथराज ज्ञानेश्वरीचे वाचन करा असे आवाहन वेदांताचार्य देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री यांनी यावेळी बोलतांना केले.

खिर्डी गावचे ग्रामदैवत श्री हनुमंतराय आणि श्री विठ्ठल रुख्मिणी यांच्या साक्षीने व ब्रम्हलीन प.पू. गुरुवर्य महंत नारायणगिरीजी महाराज, वै.ह.भ.प.बन्सी महाराज तांबे ह.भ.प. रामकृष्ण महाराज काळे (गुरुजी) यांच्या प्रेरणेने ह.भ.प. शांतीब्रम्ह महंत श्री भास्करगिरीजी महाराज, ह.भ.प. वेदांताचार्य देविदास महाराज म्हस्के शास्त्री, स्वामी प्रकाशानंदगिरीजी महाराज यांच्या शुभाशिर्वादाने व खिर्डी ग्रामस्थ मंडळीच्या सहकार्याने सदर सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी बोलतांना देविदास महाराज म्हस्के शास्त्री म्हणाले की उपासनेने मनुष्याच्या चित्तात थैर्य प्राप्त होते त्यामुळे परमार्थाची प्राप्ती होते,चांगले कर्म निष्काम भावनेने केल्यास खऱ्या अर्थाने चित्ताची शुद्धी होते असा संदेश देत त्यांनी जीवनात मनुष्याने मनात भाव धरून ज्ञानेश्वरीचे वाचन करावे जीवनाची फलश्रुती झाल्याशिवाय राहणार नाही,भगवंताबद्दल असलेली निष्ठा,श्रध्दा भक्ती,भाव जपण्याचा प्रयत्न करा,जीवनात ज्ञानेश्वरीचे वाचन करा,महिन्याच्या प्रत्येक वद्य वारीला दर्शनासाठी येत चला असे आवाहन त्यांनी यावेळी बोलतांना केले.

यावेळी झालेल्या काल्याच्या किर्तन प्रसंगी काल्याची दहीहंडी फोडण्यात आली.अखंड हरिनाम सप्ताहात योगदान देणाऱ्या दात्यांचा सोहळा कमिटीच्या वतीने सन्मान करण्यात आला.या प्रसंगी संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे विश्वस्त गायनाचार्य ज्ञानेश्वर माऊली शिंदे,ह.भ.प.योगेश महाराज होन यांच्यासह सोहळा कमिटीचे सदस्य तसेच गुजरवाडी, वांगी,कोपरे,जोगेश्वरी आखाडा,निंभारी ,पाचेगाव,तिळापूर,कारेगाव,घोगरगाव, टाकळीभान पंचक्रोशीतील भजनी मंडळ व पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

## निधन वार्ता

### मंदोदरी वाघ




**श्रीरामपूर** - रेव्हेन्यू कॉलनी, वॉर्ड नं. १ येथील श्रीमती मंदोदरी भगवान वाघ यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात भाऊ, बहिण, दोन मुलं, दोन मुली, सुना, जावई, नातवंड, पतवंड असा मोठा परिवार आहे. परमेश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

### दत्तात्रय शिंदे




**माळवाडगांव** : श्रीरामपूर तालुक्यातील माळवाडगांव येथील प्रगतशील शेतकरी दत्तात्रय परसराम शिंदे (वय ८७) यांचे वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुले दोन मुली सुना नातवंडे असा परिवार असून प्रगतशील शेतकरी दादासाहेब शिंदे व साई किराणा फर्मचे रविंद्र शिंदे यांचे ते वडील होत.

### सुगंधाबाई देविकर



**सोनई** : म्हसे येथील रहिवासी गं.भा.सुगंधाबाई बळवंत देविकर (वय ९५) यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात तीन मुली, पुतणे, सूनबाई, नातवंडे असा मोठा परिवार आहे त्या वैभव देविकर यांच्या आजी तसेच पत्रकार व घोडेगाव येथील निवेदक दादा पाटील दरंदले यांच्या त्या आजी होत.

### अशोक पवार



**वडाळा महादेव** : श्रीरामपूर तालुक्यातील निपाणी वडगाव येथील अशोक बाबासाहेब पवार यांचे अल्पशा आजाराने निधन झाले आहे मृत्यू समयी त्यांचे ६५ वर्ष वय होते त्यांच्या पश्चात पत्नी, मुली चार बंधू दोन पुतणे सुना नातवंडे जावई असा मोठा परिवार आहे. येथील ग्रामपंचायत माजी सरपंच रवींद्र पवार राजेंद्र पवार यांचे ते बंधू तर सुरेखा काळे, कांचन काळे, निलीमा सापते, उज्वला सापते यांचे ते वडील होत.

### मंजाबापू थोरात



**श्रीरामपूर** :तालुक्यातील उक्कलगाव येथील प्रगतीशील शेतकरी तसेच उक्कलगाव सोसायटीचे माजी चेअरमन मंजाबापू माधव थोरात (वय- ८०) यांचे निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, एक भाऊ, दोन मुले, दोन मुली, सुना, पुतणे, नातवंडे असा मोठा परिवार असून, उक्कलगाव सोसायटीचे संचालक आनंदराव माधव थोरात यांचे ते ज्येष्ठ बंधू तर बाळासाहेब व भारत मंजाबापू थोरात यांचे वडिल होत.

### राष्ट्रवादीच्या कार्यकारिणीतून भुजबळ, पटेल, तटकरेंना डिच्चू!

अशी चर्चा आता उघडपणे सुरू झाली आहे. जुन्या आणि जाणत्या कार्यकर्त्यांमध्ये यामुळे तीव्र असंतोष निर्माण झाला असून, भविष्यातील नेतृत्वाच्या दिशेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. धनंजय शर्मा, राणा रणवीर सिंग, डॉ. रमण प्रीत सिंग आणि डॉ. अभिषेक बोके यांचीदेखील वर्णी राष्ट्रवादीच्या राष्ट्रीय कार्यकारणीवर लावण्यात आली आहे. केंद्रीय निवडणूक आयोगाकडे सोपवण्यात आलेल्या कार्यकारणीच्या यादीवरून राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटासह राज्याच्या राजकारणातही खळबळ उडाली आहे.

### सरकारी अधिकाऱ्यासमोर आरटीआय कार्यकर्त्याची हत्या!

विरार पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आत्माराम पाटील हे गेल्या पाच वर्षांपासून या बेकायदेशीर खाणीच्या व्यवसायाला कडाडून विरोध करत होते. खाणीत केल्या जाणाऱ्या डायनामाईट स्फोटांमुळे परिसरातील घरांना तडे जात होते आणि मोठ्या प्रमाणात होणाऱ्या प्रदूषणामुळे ग्रामस्थांचे आरोग्य धोक्यात आले होते. आत्माराम यांचे पुतणे जयेश पाटील यांनी पोलिसांना सांगितले की, यापूर्वीही खाण मालक महेश पाटील याच्याकडून आत्माराम यांच्यावर हल्ला झाला होता. तसेच हत्येच्या आदल्या दिवशी म्हणजेच सोमवारी रात्री महेश पाटीलचा मुलगा मयूर याने आत्माराम यांना फोन करून जीवे मारण्याची धमकी दिली होती. यावरून ही हत्या पूर्वनियोजित कटानुसार करण्यात आल्याचा संशय बळावला आहे.

या प्रकरणी विरार पोलिसांनी तात्काळ कारवाई करत मुख्य आरोपी आणि खाण मालक महेश पाटील याच्या विरोधात हत्येचा गुन्हा दाखल केला आहे. सरकारी कामात अडथळा आणणे, अधिकाऱ्यावर हल्ला करणे आणि हत्येचा कट रचणे अशा विविध कलमान्वये हा गुन्हा नोंदवण्यात आला आहे. हत्येसाठी वापरलेले दगड आणि इतर पुरावे पोलिसांनी घटनास्थळावरून जप्त केले आहेत.

### केंद्राच्या प्रस्तावित नवीन उस नियंत्रण कायद्याला शेतकरी संघटनेचा तीव्र विरोध

दिवसांच्या आत बिल न देणाऱ्या साखर कारखान्यांच्या संचालक मंडळावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा अधिकार शेतकऱ्यांना द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

ऊस उत्पादकांना कोणत्याही कार्यक्षेत्र, झोनबंदी किंवा अंतराच्या बंधनाशिवाय इच्छित कारखान्याला ऊस देण्याचे स्वातंत्र्य असावे, असेही संघटनेने स्पष्ट केले. सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर झोनबंदी यापूर्वीच संपुष्टात आली असल्याने नव्या कायद्यात अप्रत्यक्ष झोनबंदी लागू करू नये, अशी भूमिका मांडण्यात आली.

शेतकऱ्यांना साखरेव्यतिरिक्त इथेनॉल व इतर उपपदार्थांच्या उत्पन्नात हिस्सा मिळण्यासाठी पूर्वी वगळलेली कलम ५(अ) पुन्हा लागू करावी, अशी मागणी संघटनेने केली. एक मे.टन साखरेमागे ६०० लिटर इथेनॉलचे समीकरण चुकीचे असून, त्याऐवजी नॅशनल शुगर इन्स्टिट्यूटच्या अहवालानुसार प्रति टन उसापासून मिळणाऱ्या इथेनॉल उत्पादनाचा आधार घ्यावा, असे संघटनेने नमूद केले.

बैठकीनंतर पत्रकार परिषदेत बोलताना रघुनाथदादा पाटील यांनी सत्ताधारी आणि विरोधी पक्षांकडे साखर कारखाने असल्याने दोन्ही बाजूंनी शेतकरीविरोधी भूमिकेत एकमत असल्याचा आरोप केला. नवीन कायद्यात कारखानदारांच्या बाजूने तरतुदी केल्यास राज्यभर तीव्र आंदोलन उभे करण्यात येईल, असा इशाराही त्यांनी दिला.

या बैठकीस शेतकरी संघटनेचे कार्याध्यक्ष कालिदास आपेट, शिवाजीनाना नांदखिले, बाळासाहेब पटारे यांच्यासह अनेक पदाधिकारी उपस्थित होते. तसेच साखर आयुक्तालयातील विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारीही बैठकीस उपस्थित होते.

### मनमाडचे नगराध्यक्ष आहीरे यांचे राहाता शहरात स्वागत

**शिर्डी :** केंद्रीय राज्यमंत्री ना. रामदास आठवले हे शिर्डी दौऱ्यावर येत असून पूर्व तयारी साठी मनमाड शहराचे नगराध्यक्ष राजाभाऊ आहिरे यांनी नियोजनाच्या तयारीची पाहणी केली. देशाचे केंद्रिय मंत्री ना. रामदास आठवले हे दि १४ मे रोजी आहिल्यानगर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. शिर्डी येथे त्यांचे दुपारी आगमण होत असून दुपारी शासकीय विश्रामगृहावर पत्रकार परिषद आयोजीत केली आहे . त्यानंतर कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित करण्यात आला आहे . त्यानंतर ते राहुरी तालुक्यातील कनगर येथे भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे अनावरण त्यांचे हस्ते होणार असून पालक मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे . या कार्यक्रमाचे यजमान नव नियुक्त आमदार अक्षय कर्डीले राहणार आहे .

**Change of name**

I have change my old name
**SANDIP MACHHINDRA HINGE**
(old passport no.N3287307)
**SANDIP MACHINDRA HINGE**
(Aadhar Number 788077727574)
From Vide Affidavit Before Notary Public Sangamner
Place: Sangamner
Date 12/05/2026

# स्कोडाकडून कोडियाकची नवीन श्रेणी सादर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**नाशिक,** : स्कोडा ऑटो इंडियाने आलिशान एसयूव्ही कोडियाकची नवीन श्रेणी बाजारात सादर केली आहे. कंपनीने नव्या कोडियाकमध्ये अधिक आधुनिक फीचर्स, स्पोर्टी लूक आणि प्रगत तंत्रज्ञान दिले आहे. नवीन कोडियाक आता लाऊंज, स्पोर्टलाइन आणि सिलेक्शन एल अँड के अशा तीन प्रकारात उपलब्ध असेल. स्पोर्टलाइन व्हेरियंटमध्ये अडास, ३६० अंश डिग्री कॅमेरा आणि पार्किंग असिस्टसारखी आधुनिक फीचर्स आहेत. लाउंज व्हेरियंटमध्ये मोठी बूट स्पेस, पॅनोरॅमिक सनरूफ आणि तीन-झोन क्लायमेट कंट्रोलसारख्या सुविधा मिळतात. पेट्रोल इंजिन देण्यात आले असून ते १५० या एसयूव्हीमध्ये २.० टीएसआय किलोवॅट ऊर्जा आणि ३२० एनएम टॉर्क निर्माण करते. यासोबत सात-स्पीड डीएसजी ऑटोमॅटिक गिअरबॉक्स आणि फोर बाय फोर सिस्टीम स्टैंडर्डची सुविधा आहे. कोडियाकच्या नव्या श्रेणीची प्रारंभिक किंमत ३६,९९,००० रुपये (एक्स शो रूम) पासून सुरू या निमित्ताने बोलताना, आशीष गुप्ता, ब्रँड संचालक, स्कोडा ऑटो इंडिया म्हणाले, २०२५ हे आमच्यासाठी आतापर्यंतचे सर्वात यशस्वी वर्ष ठरल्यानंतर आणि २०२६ च्या पहिल्या तिमाहीत विक्रमी कामगिरी नोंदवल्यानंतर, आम्ही आमच्या फ्लॅगशिप कोडियाकला आणखी आकर्षक बनवण्यासाठी त्यात अपडेट्स करत आहोत. आता प्रत्येक लक्झरी ४४ अपेक्षेसाठी एक कोडियाक उपलब्ध आहे, मग ती अधिक सुलभता असो, स्पोर्टीनेस असो किंवा प्रीमियम परिष्कृतता असो. या नव्या वैशिष्ट्यांमुळे आधीच प्रभावी असलेले हे मॉडेल अधिक मजबूत बनले आहे आणि अर्थपूर्ण व योग्य वेळी करण्यात येणाऱ्या उत्पादन सुधारणांवरील आमचा भर अधोरेखित होतो. भारतात आणि जागतिक स्तरावर कोडियाकने स्कोडासाठी एक महत्त्वाचा स्तंभ म्हणून स्थान निर्माण केले आहे आणि आज ती खऱ्या अर्थाने 'लक्झरी, अॅज इट शुड बी'चे प्रतिनिधित्व करते.




MAHARASHTRA
MEDIA SERVICES & PUBLIC RELATIONS PVT.LTD.
20 YEARS CELEBRATION


**विश्वासार्ह आणि वैशिष्ट्यपूर्ण**


**२०२६ कोडियाकमध्ये विश्वासार्ह २.० टीएसआय इंजिन कायम ठेवण्यात आले आहे. हे इंजिन १५० किलोवॅट पॉवर आणि ३२० न्यूटन मीटर टॉर्क निर्माण करते. सात-स्पीड डीएसजी ऑटोमॅटिक ट्रान्समिशनद्वरे ही शक्ती चारही चाकांपर्यंत पोहोचवली जाते. एमक्यूबी ३७ प्लॅटफॉर्मवर आधारित कोडियाकचे उत्पादन छत्रपती संभाजीनगर येथील स्कोडा ऑटो इंडिया च्या उत्पादन केंद्रात केले जाते. या अपडेटमध्ये अभिनव मल्टी-फंक्शन स्मार्ट डायल्स कायम ठेवण्यात आले आहेत. टच-संवेदनशील रोटरी कंट्रोलर्स आणि इंटिग्रेटेड डिस्प्लेसह सज्ज असलेले हे स्मार्ट डायल्स एचव्हीएसी, सीट व्हेंटिलेशन, ऑडिओ सेटिंग्ज आणि ड्राइव्ह मोड्सचे सहज आणि सुटसुटीत नियंत्रण प्रदान करतात.**


# राधाबाई काळे कन्या विद्यामंदिराचा एसएससी परीक्षेचा निकाल ९०.३४ टक्के

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** प्रतिनिधी-रयत शिक्षण संस्थेच्या कोपरगाव तालुक्यातील सुरेगाव-कोळपेवाडी येथील राधाबाई काळे कन्या विद्यामंदिराने एसएससी परीक्षेच्या उज्ज्वल यशाची परंपरा यंदाही अखंडित राखली आहे. १० विद्यार्थिनींनी ९०% पेक्षा जास्त गुण मिळविले असून विद्यालयाचा एकूण निकाल ९०.३४ टक्के लागला आहे. विद्यालयाच्या एकूण १७६ विद्यार्थिनी परीक्षेला बसल्या होत्या त्यापैकी १५९ विद्यार्थिनी उत्तीर्ण झाल्या असून गुणवंत विद्यार्थिनींमध्ये कु.पठाण माहीन नसीर हिने ९७ % मिळवून विद्यालयात प्रथम येण्याचा बहुमान पटकावला. कु.गोरे वैष्णवी राजाभाऊ हिने ९५.८०% मिळवून द्वितीय क्रमांक, तर कु. मुटकुळे धनश्री संभाजी हिने ९५.२०% मिळवून तृतीय क्रमांक मिळविला आहे. सर्व गुणवंत विद्यार्थिनींचे व त्यांना मार्गदर्शन करणाऱ्या शिक्षकांचे माजी आमदार अशोकराव काळे, रयत शिक्षण संस्थेचे उत्तर विभागीय अध्यक्ष आमदार आशुतोष काळे, स्थानिक स्कूल कमिटीच्या अध्यक्षा सौ.पुष्पाताई काळे, जिल्हा बँकेच्या माजी संचालिका सौ.चैतालीताई काळे, मुख्याध्यापिका सौ.सुशीला थोरात, उपमुख्याध्यापिका नीता केदार, पर्यवेक्षक किरण चांदगुडे यांनी अभिनंदन केले आहे.








# महात्मा फुले कृषि विद्यापीठात बियाणे उत्पादन आढावा बैठक संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : महात्मा फुले कृषी विद्यापीठ येथे बियाणे उत्पादन आढावा व खरीप हंगामासाठी बियाणे नियोजन बैठक कुलगुरू डॉ. विलास खर्चे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाली. यावेळी बिजोत्पादन हे विद्यापीठाचे महत्त्वाचे उद्दिष्ट असल्याचे त्यांनी सांगितले. यंदा विद्यापीठाने विविध पिकांचे ८४५६ क्विंटल बियाणे उत्पादन केले असून पुढील वर्षासाठी ८६३७ क्विंटल उत्पादनाचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध पिकांच्या




सुधारित व सत्यप्रत बियाण्यांचा मोठ्या प्रमाणात लाभ होणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले. बैठकीस संशोधन संचालक डॉ. प्रशांत बोडके, विस्तार शिक्षण संचालक डॉ. गोरक्ष ससाने, अधिष्ठाता (कृषी) डॉ. साताप्पा खरबडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते. बैठकीत अल निनोचा खरीप हंगामावर होणारा परिणाम, तीळ, मूग, उडीद, सोयाबीन, भात, तूर उत्पादन तंत्रज्ञान तसेच भाजीपाला बियाणे, फळपिकांची रोपे, जैविक खते, सूक्ष्म अन्नद्रव्ये व गांडूळ खत निर्मिती यावर सादरीकरण करण्यात आले. यावेळी बियाणे विभागाच्या लोगोचे अनावरण करण्यात आले. तसेच यंदा सेवानिवृत्त होणाऱ्या विविध अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन डॉ. डी डी गायकवाड यांनी केले.

द•ख•ल

## निरंकारी मिशनच्या वतीने बाबा हरदेवसिंहजी यांच्या स्मृतीत आज 'समर्पण दिवस' कार्यक्रम



**अहिल्यानगर :** मानवतेच्या कल्याणासाठी एखाद्या महान आत्म्याचे संपूर्ण जीवन समर्पित झाले की, त्या व्यक्तिमत्त्वाच्या स्मृती या केवळ इतिहासापुरत्या मर्यादित राहत नाहीत, तर त्या युगानुयुगे जनमानसाला प्रेरणा देणारा दिव्य स्रोत ठरतात. मानवता, प्रेम, विनम्रता आणि आध्यात्मिक जागृतीचे अद्वितीय प्रतीक असलेल्या युगदृष्टा बाबा हरदेवसिंहजी यांच्या पावन स्मृतीस समर्पित 'समर्पण दिवस' चा सत्संग कार्यक्रम बुधवार(दि.१३) रोजी संत निरंकारी मिशनच्या वतीने देश-विदेशात साजरा केला जाईल. मुख्य कार्यक्रम आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज तथा निरंकारी राजपिताजी यांच्या पावन सान्निध्यात संपन्न होईल. त्यानंतर उपस्थित श्रद्धाळूंना सतगुरु माताजींचे आशीर्वचन श्रवण करण्याची संधी लाभणार आहे. निरंकारी मिशनच्या अहिल्यानगर शाखेच्या वतीने सुद्धा आज सायं. ७ ते ९ या वेळेत संत निरंकारी सत्संग भवन, मिस्कीनरोड येथे सत्संग-प्रवचनांचा कार्यक्रम आयोजित केला असल्याचे झोनल इन्चार्ज हरीश खुबचंदानी यांनी सांगितले. त्यांनी पुढे सांगितले की,'समर्पण दिवस' हा केवळ श्रद्धांजली अर्पण करण्याचा दिवस नसून, मानवतेला प्रेम, सेवा, विनम्रता आणि समर्पणाच्या मार्गावर चालण्याची प्रेरणा देणाऱ्या त्या दिव्य जीवनदर्शनाला आत्मसात करण्याचा एक पावन पर्व आहे. हा दिवस प्रत्येकाच्या अंतःकरणात ही जाणीव जागृत करतो की, महान आत्मा आपल्या कर्मातून, विचारांतून आणि आदर्शांतून सदैव जिवंत राहतात तसेच युगानुयुगे मानवतेचा मार्ग प्रकाशमान करीत राहतात. तरी भाविकांनी सत्संग -प्रवचन कार्यक्रमाचा अवश्य लाभ घ्यावा असे आव्हान मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

## जिल्हा रुग्णालयाच्या संनियंत्रण व सल्लागार समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती



**अहिल्यानगर :** जिल्हा रुग्णालय, अहिल्यानगर येथे रुग्णांना अधिक दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी तसेच रुग्णालयातील विविध समस्या व अडचणी तातडीने सोडविण्यास मदत व्हावी या उद्देशाने संनियंत्रण व सल्लागार समिती गठीत करण्यात आली आहे .या समितीवर अशासकीय सदस्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाच्या शासन निर्णयानुसार तसेच पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री यांच्या मंजूर टिपणीनुसार ही नियुक्ती करण्यात आली असल्याची माहिती जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय डी. घोगरे यांनी दिली. या समितीवर नगरसेवक दत्तात्रय गाडळकर, सामाजिक कार्यकर्त्या सविता मोरे, सामाजिक ॲड. लक्ष्मण पोकळे व राजेश सुरेशलाल परदेशी यांची अशासकीय सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. समितीच्या माध्यमातून रुग्णालयातील विविध प्रशासकीय व आरोग्यविषयक बाबींवर समन्वय साधून नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. जिल्हा रुग्णालयात विविध विभागांतील अधिकारी समितीमध्ये सहभागी असल्यामुळे किरकोळ अडचणी त्वरित मार्गी लावणे शक्य होणार आहे .रुग्णसेवेचा दर्जा उंचावण्यासाठी समिती महत्त्वपूर्ण भूमिका बजावणार असल्याचे पत्रात नमूद केले आहे.

## महाराणा प्रतापससिंह जयंती साजरी

**अहिल्यानगर :** राष्ट्रगौरव, स्वाभिमान आणि मातृभूमीप्रेमाचे प्रतीक असलेले वीरशिरोमणी महाराणा प्रतापसिंह यांची ४८६ वी जयंती अहिल्यानगरमध्ये 'राजपूत समाज सेवा संस्था'च्या वतीने भव्य उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून आ. संग्राम जगताप उपस्थित होते. अहिल्यानगरमधील राजपूत समाज या जयंती सोहळ्यानिमित्त एकत्र आले होते. प्रारंभी महाराणा प्रतापसिंह यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष इंजिनिअर रोहनसिंह परदेशी यांनी उपस्थितांचे स्वागत केले. यावेळी आ. संग्राम जगताप म्हणाले की, महाराणा प्रताप यांचे जीवन हे शौर्य, स्वाभिमान आणि राष्ट्रनिष्ठेचे सर्वोच्च उदाहरण आहे. त्यांच्या विचारातून युवकांनी समाज आणि राष्ट्रहितासाठी कार्य करावे. अशा महापुरुषांच्या जयंती उत्सवांमुळे इतिहास जिवंत राहतो आणि नव्या पिढीला दिशा मिळत असल्याचे त्यांनी सांगितले. या जयंती सोहळ्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष महेंद्रसिंह चौहान,सचिव मोहनसिंह ठाकूर, खजिनदार विशालसिंह परदेशी, तसेच सदस्य किसनसिंह परदेशी, चेतनसिंह परदेशी, अमितसिंह परदेशी, कुंदन परदेशी, यशसिंह ठाकूर, भाऊ परदेशी, अमोल ठाकूर, हर्षल परदेशी, किशोरसिंह परदेशी, संग्रामसिंह परदेशी, किशोरसिंह राजपूत, प्रतापसिंह परदेशी, ईश्वरसिंह परदेशी, परीक्षितसिंह ठाकूर, सचिन परदेशी, अमित चंदेले, प्रसाद परदेशी यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशेष योगदान दिले.

## त्रिमूर्ती शैक्षणिक संकुल परीक्षेचा निकाल १०० %

**अमरापुर :** त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान संचलित त्रिमूर्ती शैक्षणिक व क्रीडा संकुल शेवगाव येथील त्रिमूर्ती पब्लिक स्कूल चा इयत्ता दहावी बोर्डाचा १००% निकाल लागला असून निकालाची उज्वल यशाची परंपरा कायम राखली आहे. अशी माहिती प्राचार्य शिवाजीराव काटे यांनी दिली. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे आयोजित फेब्रुवारी/मार्च २०२६ इयत्ता दहावी बोर्ड परीक्षेचा ऑनलाईन निकाल नुकताच जाहीर झाला आहे. त्यामध्ये संकुलातील त्रिमूर्ती पब्लिक स्कूल शेवगावचा निकाल शंभर टक्के लागलेला आहे. गुणवंत विद्यार्थी खालील प्रमाणे प्रथम क्रमांक - कु. अनुजा तांबारे ९५.६०% , द्वितीय क्रमांक - कु. वैष्णवी बोडखे व कु. श्रुती राजपूत ९४.८०% , तृतीय क्रमांक- कु. श्रावणी काशीद ९३.८०%, चतुर्थ क्रमांक- दिपराज काकडे ९२.४०% ,पाचवा क्रमांक - कु. मयुरी खोसे ९१.६०% , सहावा क्रमांक- कु. प्रांजल आघाव ९१.४०%, सातवा क्रमांक- कु. पायल चोपडे ९०.६०%, आठवा क्रमांक - कार्तिक पाडळे ९०% , नववा क्रमांक - बरसा बिस्वास ८९.६०% , दहावा क्रमांक - दीपक कोकाटे ८९% सह एकूण ९६ विद्यार्थ्यांपैकी ५५ विद्यार्थी विशेष प्राविण्य मध्ये उत्तीर्ण झाले तर २७ विद्यार्थी प्रथम श्रेणीत , १३ विद्यार्थी द्वितीय श्रेणीत तर ०१ विद्यार्थी पास श्रेणीत उत्तीर्ण होऊन घवघवीत यश संपादन केले. तसेच त्रिमूर्ती माध्यमिक विद्यालय सेमी विभागाचा निकाल १००% लागला असून गुणवंत विद्यार्थी प्रथम क्रमांक - सोहम राऊत ८४.८०% , द्वितीय क्रमांक - कु. वैष्णवी बोडखे ८४.२०%, तृतीय क्रमांक - कु. काव्या तिखे ८३.६०% , चतुर्थ क्रमांक - कु. कोमल गोफणे ८२.२०% , पाचवा क्रमांक - सुरज गोर्डे ८१.६०%, सहावा क्रमांक, संजय केसभट ८०.४०% सातवा क्रमांक - कुणाल रासकर व कु. आलिशा छोटू पठाण ७९.६०%, आठवा क्रमांक - रितेश पाटील ७८.७% घवघवीत यश संपादन केले आहे.

# शिक्षकांच्या प्रलंबित प्रश्नासांठी थेट सुनावणी

### शिक्षक आ. किशोर दराडे यांची अहिल्यानगरमध्ये शुक्रवारी बैठक

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक तसेच शिक्षकेतर कर्मचारी यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत नाशिक विभागाचे शिक्षक आमदार किशोर दराडे यांच्या उपस्थितीत विशेष बैठक आयोजित करण्यात आले आहे. ही बैठक शुक्रवार दि. १५ मे रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत नवीन जिल्हाधिकारी कार्यालयातील शासकीय विश्रामगृह येथे पार पडणार असल्याची माहिती त्यांचे स्वीय सहाय्यक हरीष मुंढे व वैभव सांगळे यांनी दिली.

या बैठकीस माध्यमिक शिक्षणाधिकारी, वेतन अधीक्षक तसेच लेखाधिकारी शिक्षण विभाग उपस्थित राहणार असून, शिक्षण विभागाशी संबंधित प्रलंबित कामांबाबत थेट चर्चा केली जाणार आहे. जिल्ह्यातील ज्या मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची विविध प्रकरणे प्रलंबित असतील त्यांनी आवश्यक कागदपत्रांसह बैठकीस उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

तसेच संबंधितांनी आपल्या समस्या, तक्रारी अथवा प्रश्न बैठकीपूर्वी व्हॉट्सपद्वारे पाठवावेत, असेही सांगण्यात आले आहे. स्वीय सहाय्यक हरीष मुंढे यांच्या व्हॉट्सप क्रमांक ७५८८०१४००५ आणि ८२७५५२२५२६ वर प्रश्न पाठविण्याचे सांगण्यात आले आहे. अहिल्यानगर जिल्ह्यातील मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर संघटनांच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी या बैठकीस उपस्थित राहून विविध प्रश्न मांडावेत, असे आमदार दराडे यांच्या वतीने स्पष्ट करण्यात आले आहे. या बैठकीमुळे शिक्षण विभागातील रखडलेली प्रकरणे, वेतन, सेवा विषयक अडचणी तसेच प्रशासकीय प्रश्न मार्गी लावण्याचे काम केले जाणार आहे.

# खोटी माहिती डायल ११२

### पोलिसांनी दाखल केला गुन्हा

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री




**अहिल्यानगर :** शासकीय यंत्रणेचा विनाकारण वापर करून पोलिसांची दिशाभूल करणे एका तरुणाला चांगलेच महागात पडले आहे. कोठला परिसरात राहणाऱ्या एका व्यक्तीने आपल्या वहिनीने मारहाण केल्याची खोटी माहिती 'डायल ११२' या मदत क्रमांकावर दिली. मात्र, तपासात अशी कोणतीही घटना घडली नसल्याचे समोर आल्याने तोफखाना पोलीस स्टेशनमध्ये संबंधित तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, तोफखाना पोलीस स्टेशनचे पोलीस कॉन्स्टेबल रवींद्र तुकाराम घुंगासे हे रात्रीच्या वेळी 'डायल ११२' च्या कर्तव्यावर होते. यादरम्यान मध्यरात्री पावणे एक वाजेच्या सुमारास आरोपी अमीर सलीम शेख (रा. कोठला, अहिल्यानगर) याने पोलीस नियंत्रण कक्षाला फोन केला. आपल्या वहिनीने आपल्याला मारहाण केली असून तातडीने मदतीची गरज असल्याचे त्याने सांगितले. माहिती मिळताच पोलीस तातडीने घटनास्थळी पोहोचले.

प्रत्यक्षात त्या ठिकाणी चौकशी केली असता, मारहाणीची कोणतीही घटना घडली नसल्याचे निष्पन्न झाले. केवळ पोलिसांना त्रास देण्याच्या उद्देशाने ही खोटी तक्रार करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. सरकारी कर्मचाऱ्यांच्या कामात व्यत्यय आणून खोटी माहिती दिल्याप्रकरणी रवींद्र घुंगासे यांच्या फिर्यादीवरून अमीर शेख याच्यावर भारतीय न्याय संहितेनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक जगदीश भांबळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पुढील तपास करत आहेत. नागरिकांनी आपत्कालीन क्रमांकाचा गैरवापर करू नये, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

## एमआरपी प्रणालीतील त्रुटींविरोधात अखिल भारतीय ग्राहक पंचायतीचे आंदोलन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अमरापुर :** ग्राहकांच्या संरक्षणासाठी लागू करण्यात आलेली एमआरपी (कमाल किरकोळ किंमत) प्रणाली आज अनेक ठिकाणी ग्राहकांच्या शोषणाचे साधन बनत असल्याचा आरोप करत अखिल भारतीय ग्राहक पंचायतीच्या वतीने सरकारकडे कायदेशीर दुरुस्तीची मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात विविध स्तरांवर जनजागृती मोहीम राबविण्यात येत असून, २५ मे २०२६ रोजी दिल्ली येथील जंतर-मंतर येथे राष्ट्रीय स्तरावरील जनआंदोलन आयोजित करण्यात येणार असल्याची माहिती पदाधिकाऱ्यांनी दिली.

पूर्वी वस्तूंवर 'किरकोळ किंमत + स्थानिक कर अतिरिक्त' अशी किंमत नमूद केली जात

### कायद्यात तातडीने दुरुस्तीची मागणी

होती. विविध राज्यांमध्ये स्थानिक करांमध्ये असलेल्या फरकामुळे ग्राहकांना वेगवेगळ्या किमती मोजाव्या लागत होत्या. ही तफावत दूर करण्यासाठी वस्तूंवर एमआरपी छापणे बंधनकारक करण्यात आले. मात्र, कालांतराने या व्यवस्थेचा मूळ हेतू बाजूला पडला असून, अनेक उत्पादन कंपन्या मनमानीपणे अवाजवी एमआरपी छापत असल्याचा आरोप ग्राहक पंचायतीने केला आहे.

विशेषतः औषधे, सौंदर्य प्रसाधने आणि दैनंदिन वापराच्या वस्तूंवर उत्पादन खर्चाच्या कित्येक पटींनी जास्त एमआरपी आकारली जात असल्याने ग्राहकांची आर्थिक फसवणूक होत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

# शहराच्या नव्या पाणी योजनेसाठी कर्जाला काँग्रेसचा विरोध : दीप चव्हाण

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अहिल्यानगर महानगरपालिकेने नव्या पाणीपुरवठा योजनेसाठी ३७५ कोटी रुपये आणि भुयारी गटार योजनेसाठी ४५० कोटी रुपयांचे कर्ज जागतिक बँकेकडून घेण्याच्या हालचाली सुरू केल्याच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचे शहर जिल्हाध्यक्ष दीप चव्हाण यांनी तीव्र विरोध दर्शविला आहे.

महापालिकेने यापूर्वी ११६ कोटीची फेज२ योजना २०१० मध्ये सुरू केली होती. ती अपूर्ण असून त्यातून थेंब भर पाणी देखील नगरकरांना मिळाले नाही. त्यानंतर २०१६ ला फेज २ पूर्ण करण्यासाठी१३४ कोटीची अमृत योजना मंजूर केली. म्हणजे तब्बल २५० कोटी खर्चून गेल्या १६ वर्षात नगरकर तहानलेलेच आहेत.

मुळा धरणापासून नगर पर्यंत फेज २ मध्ये नव्याने पाइपलाइन टाकण्यात आली. नंतर अमृत योजनेत पुन्हा लाईन टाकण्यात आली. म्हणजे तीन-तीन पाईपलाईन टाकण्यात आल्या. मात्र नगरकरांना दिवसाआड तर उपनगर वासियांना ३ दिवसाआड आणि काही भागात तर टँकरने पाणी पुरवठा होतो आहे.

उपनगरांमध्ये भुयारी गटार व्यवस्था नसल्यामुळे नागरिकांना स्वतःच्या खर्चाने सक्षन टँकरद्वारे मैला व्यवस्थापन करावे लागत असल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे भुयारी गटार योजना आवश्यक असली तरी नियोजनशून्य पद्धतीने कर्ज घेऊन शहराला आर्थिक संकटात ढकलू नये, असे मत त्यांनी व्यक्त केले.

महापालिकेकडे विविध योजनांमध्ये स्वनिधी हिस्सा भरण्यासाठीही पैसे नसताना कोट्यवधी रुपयांचे कर्ज उचलण्यामागे नेमके काय उद्दिष्ट आहे, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. अगोदरच पाणी पट्टीत ९०० रुपयांची वाढ झाली. चालू बिलात २०० वाढवले. म्हणजे २६०० रुपये पाणीपट्टी होऊन देखील भविष्यात हे कर्ज फेडण्यासाठी घरपट्टी, पाणीपट्टी आणि इतर कर वाढवून त्याचा भार नगरकरांवर टाकला जाईल, अशी भीती त्यांनी व्यक्त केली.

महासभेत नगरसेवकांनी या प्रस्तावाला मान्यता देऊ नये तसेच जागतिक बँकेकडून कर्ज घेण्याचा निर्णय महापालिकेने तात्काळ मागे घ्यावा, अशी मागणी दीप चव्हाण यांनी निवेदनाद्वारे केली आहे.

## जिल्हा वाचनालयाची वसंत व्याख्यानमालेला प्रारंभ









प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** अहिल्यानगर जिल्हा वाचनालयाच्या वतीने गुरुवार दि.१४ मे ते रविवार दि.१७ मे या कालावधीत वसंत व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. या व्याखानमालेत योगेश सोमण,अनघा तांबोळी,शरद तांदळे,वंदना बोकील- कुलकर्णी विविध विषयावर मार्गदर्शन करणार असल्याची माहिती वाचनालयाचे अध्यक्ष प्रा.शिरीष मोडक व प्रमुख कार्यवाह विक्रम राठोड यांनी दिली.

ही व्याख्यानमाला रोज सायंकाळी ६ वा. नेता सुभाष चौक, चितळे रोड,वरील वाचनालयाच्या लोकमान्य टिळक सभागृहात होईल. व्याख्यानमालेचे उद्घाटन गुरुवार दि. १४ मे रोजी सायं ६ वा. निरीक्षक जिल्हा ग्रंथालय अधिकारी रामदास शिंदे यांच्या हस्ते होणार आहे.

या नंतर प्रसिद्ध अभिनेते योगेश सोमण,(अध्यक्ष,महाराष्ट्र साहित्य परिषद,पुणे) माझ्या भूमिकांनी मला काय दिले? या विषयांवर पहिले पुष्प गुंफतील. अभंग तुकाराम, उरी,दृश्यम-२,आनंदी गोपाळ या चित्रपटात तसेच विविध मालिका मध्ये त्यांनी भूमिका साकारल्या आहेत. स्नेह संस्थेच्या माध्यमातून गेली २५ वर्ष ते विविध सांस्कृतिक उपक्रम राबवित आहेत. शुक्रवार दिनांक १५ मे रोजी अनघा तांबोळी,(कवयित्री,मुंबई) यांचा केवल प्रयोगी हा कथा, विनोद, किस्से, कवितांवर आधारित कार्यक्रम होईल. या विषयांवर त्या दुसरे पुष्प गुंफतील. शनिवार १६ मे रोजी सुप्रसिद्ध लेखक शरद तांदळे हे वाचन- व्यक्तिमत्वाची जडणघडण या विषायावर तिसरे पुष्प गुंफतील. १७ मे रोजी प्रसिद्ध लेखिका डॉ.वंदना बोकील- कुलकर्णी ख्यातनाम लेखिका अरुणा ढेरे यांच्या सीतेची गोष्ट अभिवाचन करीत व्याखानमालेचे चौथे व अखेरचे पुष्प गुंफतील. वाचनालयाच्या वसंत व्याखानमालेस रसिकांनी उपस्थित राहाण्याचे आवाहन उपाध्यक्ष अनंत देसाई व दिलीप पांढरे, सहकार्यवाह डॉ. राजा ठाकूर, खजिनदार तनवीर खान, संयोजक किरण आगरवाल, शिल्पा रसाळ, प्रा. ज्योती कुलकर्णी, सदस्य, निमंत्रित सदस्य यांनी केले आहे.

# महिलांवरील अत्याचार रोखण्यासाठी

### महिलांनी संघटित व्हावे : मोहिते

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**अहिल्यानगर :** अलीकडील काळात महिलांवर तसेच अल्पवयीन मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांमध्ये वाढ होत असल्याने समाजातील अशा विकृत प्रवृत्तींना रोखण्यासाठी महिलांनी संघटित होऊन पुढाकार घेणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन भारतीय जनता पक्षाचे जिल्हाध्यक्ष अनिल मोहिते यांनी केले. भाजपा ओबीसी महिला मोर्चाच्या पदाधिकारी व नगरसेविका मयुरी जाधव यांच्या जनसंपर्क कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी महापौर ज्योती गाडे यांनी नगरसेविका मयुरी जाधव यांच्या कार्याचे कौतुक केले.

उपमहापौर ॲड. धनंजय जाधव म्हणाले की, गेल्या पन्नास वर्षांपासून त्यांच्या कुटुंबाला तोफखाना परिसरातील प्रभाग क्रमांक १० मधील नागरिकांची, विशेषतः पद्मशाली समाजाची सेवा करण्याची संधी मिळाली आहे. त्यांच्या कार्याला आपण कायम सहकार्य करणार आहोत.

महिला मोर्चाच्या जिल्हाध्यक्षा प्रिया जानवे आणि भाजपाच्या प्रभारी कालिंदी केसकर यांनी स्वाती सिरसुल यांच्या सामाजिक व राजकीय पार्श्वभूमीचा उल्लेख करत त्यांच्या कार्याचे कौतुक केले.

या वेळी ज्योती दांडगे, श्वेता झोंड, रेणुका करंदीकर, अमृता जाधव, सुरेखा जंगम, भारती शेवते, पद्मा रजपूत, अर्चना बनकर, रजनी भंडारी, अंजली भोसले, रेखा मैड, विद्या शिंदे, राणी बदाने, पोर्णिमा संदुपटला , उज्वला भांगे, स्वाती पावले, कविता जाधव, ज्योती बिजा, रेणुका गाली, सोनाली चौरे, सुनिता कुरापट्टी, ॲड. रुद्रेश अंबाडे, गणेश विद्ये, संजय गायकवाड, सुरज जाधव, सारंग पंधाडे, संदीप जाधव, अजय ढोणे, ॲड. राजू गाली, अड. यश पंधाडे , सुशांत जाधव, यांच्यासह अनेक पदाधिकारी, नगरसेवक आणि नगरसेविका मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विशेष म्हणजे पुणे येथून कार्यक्रमासाठी भाजपा पुणे शहर उपाध्यक्ष महेश चलमल, महाराष्ट्र राज्य वधू-वर सूचक मंडळ आणि पुणे प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय रच्चेवार तसेच भवानी पेठ पद्मशाली पंच कमिटीचे सहसचिव विलास मध्येल हे विशेष उपस्थित होते.

# मुलांसाठी 'संगणक साक्षर रथ' उभारण्याची मागणी

### कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतचे समाज कल्याण अधिकारी यांना निवेदन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** झोपडपट्टी भागातील तसेच कचरा वेचक, हातमजूर आणि वंचित घटकातील मुलांना आधुनिक डिजिटल शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी संगणक साक्षर रथ हा अभिनव फिरता संगणक शिक्षण प्रकल्प राबविण्याचा मानस कागद, काच, पत्रा कष्टकरी पंचायतच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. या प्रकल्पासाठी आर्थिक तसेच प्रशासकीय सहकार्य मिळावे, अशी मागणी संघटनेचे जिल्हा समन्वयक विकास उडाणशिवे यांनी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या समाज कल्याण अधिकाऱ्यांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

अहिल्यानगर शहरात सुमारे २२ झोपडपट्ट्या असून शहराच्या एकूण लोकसंख्येपैकी तब्बल ५० % अधिक लोकसंख्या झोपडपट्टी भागात वास्तव्यास आहे. या वस्त्यांमध्ये कचरा गोळा करणारे कामगार, बांधकाम मजूर, हातमजुरी करणारे, स्थलांतरित कामगार तसेच सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासवर्गीय नागरिक मोठ्या प्रमाणात राहतात. अशा परिस्थितीत या कुटुंबांतील मुलांना दर्जेदार शिक्षणासोबत डिजिटल सुविधा उपलब्ध होत नसल्याने ते आधुनिक शिक्षणाच्या मुख्य प्रवाहापासून दूर राहत आहेत.

आजच्या कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), इंटरनेट आणि ऑनलाईन शिक्षणाच्या युगात संगणक ज्ञान अत्यावश्यक



बनले आहे. शासनाच्या विविध योजना, शिष्यवृत्ती, रोजगाराच्या संधी आणि अनेक शासकीय सेवा डिजिटल माध्यमावर आधारित झाल्या आहेत. मात्र, गरीब आणि वंचित समाजातील मुलांना संगणक, इंटरनेट व डिजिटल साधनांचा परिचय नसल्यामुळे त्यांना या सुविधांचा लाभ घेणे कठीण होत आहे. यामुळे डिजिटल दरी अधिक वाढत असल्याची चिंता संघटनेने व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर संगणक साक्षर रथ हा प्रकल्प राबविण्यात येणार असून, एका मोठ्या बसचे रूपांतर संगणक प्रयोगशाळेमध्ये करण्यात येणार आहे. ही बस शहरातील झोपडपट्ट्या, कचरा वेचक वस्त्या, मजूर वस्ती आणि इतर वंचित भागांमध्ये फिरून मुलांना मोफत डिजिटल शिक्षण देणार आहे. या रथामध्ये १० ते १५ संगणक, इंटरनेट सुविधा, प्रोजेक्टर, डिजिटल शिक्षण साहित्य तसेच प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध असतील. विद्यार्थ्यांना संगणकाचे प्राथमिक ज्ञान, इंटरनेट वापर, ऑनलाईन शिक्षण, ई-मेल तयार करणे, ऑनलाईन फॉर्म भरणे, मराठी व इंग्रजी टायपिंग, डिजिटल व्यवहार, सायबर सुरक्षा तसेच कौशल्य विकासाचे मार्गदर्शन दिले जाणार आहे.

हा प्रकल्प केवळ संगणक शिक्षणापुरता मर्यादित नसून सामाजिक परिवर्तन, डिजिटल समता आणि वंचित मुलांना सक्षम नागरिक बनविण्याचा व्यापक उपक्रम असल्याचे संघटनेने स्पष्ट केले आहे. भविष्यातील AI आणि डिजिटल युगात गरीब व मागासवर्गीय समाजातील मुलांनी मागे राहू नये, यासाठी हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, सामाजिक न्याय विभागामार्फत या प्रकल्पाला विशेष आर्थिक मदत द्यावी, आवश्यक अनुदान मंजूर करावे, विशेष सामाजिक अभियान म्हणून मान्यता द्यावी तसेच अनुसूचित जाती, मागासवर्गीय व वंचित घटकांतील विद्यार्थ्यांसाठी हा प्रकल्प प्राधान्याने राबविण्यास सहकार्य करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. विभागाकडून सकारात्मक सहकार्य मिळाल्यास हजारो गरीब आणि वंचित मुलांपर्यंत डिजिटल शिक्षण पोहोचविण्याचे मोठे सामाजिक कार्य घडू शकते, असा विश्वास संघटनेने व्यक्त केला आहे.

द·ख·ल

## पुरंदरात खरीप नियोजनाला वेग
### सासवडमध्ये तालुकास्तरीय सभा संपन्न

**सासवड :** येणाऱ्या खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर पुरंदर तालुक्यात शेती नियोजनाला वेग आला असून सासवड येथे तालुकास्तरीय खरीप हंगाम नियोजन सभा संपन्न झाली. पंचायत समिती सभागृहात झालेल्या या बैठकीस पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघाचे आमदार विजय शिवतारे अध्यक्षस्थानी उपस्थित होते. कृषी विभागाच्या पुढाकारातून सभेचे आयोजन करण्यात आले होते.

खरीप हंगामासाठी बियाणे, खते, पीक नियोजन तसेच शेतकऱ्यांना आवश्यक सुविधा वेळेत उपलब्ध करून देण्याबाबत बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात आली. बदलत्या हवामानाचा तसेच मागील काही वर्षांतील पावसाच्या स्थितीचा विचार करून यंदाच्या खरीप हंगामासाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला. सभेत बियाणे व खत पुरवठा, संभाव्य टंचाई टाळण्यासाठीचे नियोजन, आधुनिक शेती तंत्रज्ञानाबाबत मार्गदर्शन, पीक विमा योजना आणि बँक कर्जासंदर्भातील अडचणींवर चर्चा करण्यात आली. कृषी विभागाकडून खरीप हंगामाचा प्राथमिक आराखडाही सादर करण्यात आला. बाजरी, मूग, उडीद तसेच इतर कडधान्यांच्या संभाव्य पेरणी क्षेत्राचा आढावा यावेळी घेण्यात आला. कृषी विभाग, तालुका कृषी अधिकारी श्रीधर चव्हाण यांनी खरीप हंगामासाठी करण्यात आलेल्या तयारीची माहिती दिली. शेतकऱ्यांना वेळेत सुविधा उपलब्ध करून देणे हा प्रशासनाचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. बैठकीस विविध विभागांचे अधिकारी, शेतकरी संघटनांचे प्रतिनिधी आणि सेवा सोसायट्यांचे पदाधिकारी उपस्थित होते. तसेच बनावट बियाणे व खतांच्या काळाबाजारावर नियंत्रण ठेवण्यासाठी उपाययोजना करण्याबाबतही चर्चा करण्यात आली.

## पिंपळे गुरव येथे उद्या पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**पुणे :** जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, पुणे तथा प्रतिभा महिला प्रतिष्ठान, पिंपळे गुरव यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार १४ मे २०२६ रोजी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. हा रोजगार मेळावा न्यू मिलेनियम इंग्लिश मिडीयम स्कूल, समर्थ नगर, एस.बी.आय. बँकेसमोर, नवी सांगवी, पुणे येथे होणार असून उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती (थरश्र्ज्ञ-ळप-खपींशऑंळशु) घेण्यात येणार आहेत. मेळाव्यात टाटा मोटर्स पॅसेंजर व्हेईकल लि., कमिन्स इंडिया लि., फोर्स मोटर्स लि., हुंदाई मोटर्स इंडिया लि. यांसह पुणे जिल्ह्यातील विविध नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. एसएससी, एचएससी, आयटीआय, डिप्लोमा, ग्रॅज्युएट तसेच पोस्ट ग्रॅज्युएट पात्रताधारक उमेदवारांसाठी विविध रिक्त पदांवर भरती करण्यात येणार आहे. इच्छुक उमेदवारांनी रिक्त पदांच्या माहितीसाठी व ऑनलाइन अर्जासाठी ु.ॲक्षसरॲ.ारहीुूरा.सीं.ळप महा स्वयंरोजगार संकेतस्थळाला भेट द्यावी. तसेच मेळाव्यास उपस्थित राहताना शैक्षणिक कागदपत्रांच्या छायांकित प्रती, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो व ठर्शीीश च्या किमान १० प्रती सोबत आणाव्यात. अधिक माहितीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, ४८१ रास्ता पेठ, पुणे येथे संपर्क साधावा किंवा दूरध्वनी क्रमांक ०२०-२६१३३६०६ वर संपर्क करावा, असे आवाहन सहायक आयुक्त श्री. सु.रा. वराडे यांनी केले आहे.

## प्रा. विजय गुळवे यांना आदर्श संस्थापक अध्यक्ष राज्यस्तरीय पुरस्कार

**आळंदी :** उरुळी कांचन येथे आयोजित राज्यस्तरीय पुरस्कार सोहळ्यात ज्ञानगंगा इंग्लिश मीडियम स्कूल अँड ज्युनियर कॉलेजचे संस्थापक अध्यक्ष प्रा.विजय रामचंद्र गुळवे यांना आदर्श संस्थापक अध्यक्ष पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.



अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद संचलित कलागोविंद शिक्षण प्रसारक मंडळ व पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्य संस्थेच्या वतीने हा सोहळा पार पडला. हा पुरस्कार राष्ट्रपती पोलीस पदक मानकरी तसेच अभिनेते व गीतकार सिताराम नरके आणि महात्मा गांधी सर्वोदय संघाचे उपाध्यक्ष के.डी.बापू कांचन यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजक व निमंत्रक म्हणून अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे जिल्हाध्यक्ष तथा पोलीस मित्र संघ महाराष्ट्र राज्याचे संस्थापक अध्यक्ष प्रा.सुरेश वाळेकर यांनी काम पाहिले. शैक्षणिक, सामाजिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याची दखल घेत प्रा. गुळवे यांना हा सन्मान देण्यात आला. त्यांच्या नेतृत्वाखाली संस्थेने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम राबवत शैक्षणिक क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. पुरस्कार स्वीकारल्यानंतर प्रा. विजय गुळवे यांनी या यशाचे श्रेय संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, कुटुंबीय, मित्रपरिवार आणि हितचिंतकांना दिले.

## भोरच्या पश्चिम पट्ट्यात पाणीटंचाईची धग

**भोर :** भोरच्या तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील भोर-महाड रस्त्यावरील वारवंड परिसरातील विहिरींनी तळ गाठल्याने भीषण पाणीटंचाई निर्माण झाली आहे. वारवंड ग्रामस्थांनी दहा दिवसांपूर्वीच पंचायत समितीकडे टँकरची मागणी केली होती; मात्र अद्याप प्रशासनाकडून टँकर सुरू न झाल्याने नागरिकांना पदरमोड करून खासगी टँकरद्वारे तहान भागवावी लागत आहे. रायरी जवळील धारांबे, परहर, वारवंड, शिळीब, शिरवली, हिमाची माळवाडी या गावांनी तसेच पुणे-सातारा महामार्ग लगतच्या ४ गावांनी असे एकूण ९ गावे व एका वाडीने टँकर मागणीचे प्रस्ताव पंचायत समितीकडे सादर केले होते. हे प्रस्ताव मंजुरीसाठी तहसीलदारांकडे पाठवण्यात आले होते. त्यापैकी पुणे-सातारा महामार्गालगतच्या ४ गावांना टँकर मंजूर झाले असून तिथे पुरवठा सुरू आहे. मात्र, दुर्गम भागातील वारवंडसह ५ गावे आणि एका वाडीचा प्रस्ताव अजूनही मंजुरीच्या प्रतीक्षेत आहे. निरा देवघर धरणातील पाणीसाठा घटल्याने धरणाच्या फुगवठ्यातील विहिरी कोरड्या पडल्या आहेत, त्याचा सर्वाधिक फटका वारवंड गावाला बसला आहे. उन्हाळ्याची तीव्रता जसजशी वाढत आहे, तसतशी टंचाईची दाहकता अधिक गडद होत आहे.

# सासवडमध्ये 'पुरंदर ॲग्रो एक्स्पो'च्या मंडपाचे पूजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** पुरंदर तालुक्यातील शेतकऱ्यांना जागतिक बाजारपेठ आणि आधुनिक तंत्रज्ञानाची दारे खुली करून देण्यासाठी शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या 'पुरंदर ॲग्रो एक्स्पो' या कृषी व पशु प्रदर्शनाच्या तयारीला वेग आला आहे. सासवड येथील श्री शिवाजी इंग्लिश मिडियम स्कूलच्या परिसरात २२ ते २५ मे दरम्यान हे भव्य प्रदर्शन भरणार असून, याच्या मंडपाचे विधिवत पूजन मंगळवारी माजी आमदार संजय जगताप आणि ग्रामीण संस्थेच्या अध्यक्षा राजवर्धिनी जगताप यांच्या हस्ते संपन्न झाले. कोरोनाच्या संकटकाळानंतर प्रदीर्घ विश्रांतीनंतर हे प्रदर्शन पुन्हा एकदा मोठ्या स्वरूपात आयोजित केले जात असल्याने शेतकऱ्यांमध्ये मोठा उत्साह पाहायला मिळत आहे. शेतीमध्ये सध्या वाढत असलेला उत्पादन खर्च कमी करणे आणि एकरी उत्पादकता वाढवणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) आणि अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करून कमी खर्चात भरघोस उत्पादन कसे घ्यावे, याचे थेट मार्गदर्शन अनुभवी तज्ज्ञांकडून शेतकऱ्यांना दिले जाणार आहे. विशेषतः ग्रामीण भागातील मजूर टंचाईवर मात करण्यासाठी उपयुक्त ठरणारी आधुनिक कृषी यंत्रे, हरितगृह तंत्रज्ञान, मशरूम उत्पादन आणि कोल्ड स्टोअरेज क्षेत्रातील नामवंत कंपन्या आपली उत्पादने आणि तंत्रज्ञान या प्रदर्शनात सादर करणार आहेत. शरद कृषी व पर्यावरण विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून पुरंदर तालुक्यात झालेल्या व्यापक जलसंधारणाच्या कामांमुळे भूजल पातळीत लक्षणीय वाढ झाली आहे. या उपलब्ध पाण्याचा उपसा न करता त्याचा योग्य आणि काटकसरीने वापर करण्यासाठी शेतकऱ्यांना सेंद्रिय शेती आणि ठिबक सिंचनाचे विशेष प्रशिक्षण या एक्स्पोमध्ये दिले जाणार आहे. त्याचबरोबर पशूंचे आहार व रोग यांविषयी मार्गदर्शन, तसेच पशुपालन, कुक्कुटपालन आणि प्रक्रिया उद्योगातील नवनवीन संधींची माहिती देऊन तरुणांना शेतीपूरक व्यवसायांकडे आकर्षित करण्याचा संयोजकांचा मानस आहे.



सासवड येथील श्री शिवाजी इंग्लिश मीडियम स्कूलच्या मैदानावर 'पुरंदर ॲग्रो एक्स्पो'च्या मंडपाचे पूजन करताना माजी आमदार संजय जगताप, राजवर्धिनी जगताप आणि उपस्थित मान्यवर.

या चार दिवसीय प्रदर्शनात राष्ट्रीय आणि बहुराष्ट्रीय कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून सुधारित बी-बियाणे, खते आणि कीटकनाशकांबाबत सविस्तर मार्गदर्शन करतील. ग्रामीण भागातील आर्थिक सक्षमीकरणासाठी शेतकरी बचत गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांच्या स्थापनेसाठी तज्ज्ञांचा विशेष सल्ला दिला जाणार आहे. याप्रसंगी उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, माजी उपनगराध्यक्ष यशवंतकाका जगताप, पाणी पुरवठा सभापती ज्ञानेश्वर गिरमे, नगरसेवक सोपान रणपिसे, संतोष गिरमे, सेवानिवृत्त कृषी अधिकारी संभाजी गरूड, रवींद्रपंत जगताप, पुरंदर नागरीचे सरव्यवस्थापक अनिल उरवणे, सतीश शिंदे, प्रताप गरूड, सुनील जगताप, ॲड. सौरभ वढणे, तुषार जगताप, संतोष गायकवाड, दीपक जगताप, विनोद राठोड, कैलास जगताप, गणेश सरनाईक आदी उपस्थित होते. तालुक्यातील शेतकऱ्यांनी या संधीचा लाभ घेऊन आपले शेतीविषयक ज्ञान अद्ययावत करावे, असे आवाहन संयोजकांनी केले आहे.

# द. मा. मिरासदार पुरस्कार सारंग मांडके, सारंग भोईरकर यांना जाहीर

### जन्मशताब्दीनिमित्त वर्षभर साहित्यिक-सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** सुप्रसिद्ध साहित्यिक द.मा. मिरासदार यांच्या जन्मशताब्दीनिमित्त द.मा.मिरासदार प्रतिष्ठानतर्फे विविध साहित्यिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येणार असून, यंदाचा द.मा.मिरासदार पुरस्कार युवा कलाकार सारंग मांडके आणि सारंग भोईरकर यांना जाहीर करण्यात आला आहे. छत्रपती शिवाजी महाराज यांचे प्रेरणादायी चरित्र कथन आणि स्वरचित काव्याच्या माध्यमातून युवा पिढीपर्यंत इतिहास पोहोचविणाऱ्या या दोन्ही कलाकारांचा पुरस्काराने सन्मान केला जाणार आहे. प्रतिष्ठानचे अध्यक्ष रवींद्र मंकणी आणि सचिव सुनेत्रा मंकणी यांनी सोमवारी आयोजित पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. यावेळी संस्थेचे विश्वस्त हरिभाऊ मिरासदार आणि प्रसाद मिरासदार उपस्थित होते. पुरस्कार वितरण सोहळा शनिवार, दि. १६ मे



२०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता पुण्यातील सर परशुराम महाविद्यालय येथील लेडी रमाबाई सभागृहात होणार आहे. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात येणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी केंद्रीय मंत्री प्रकाश जावडेकर असतील. भाजपचे राज्य सरचिटणीस राजेश पांडे, महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. इतिहासतज्ज्ञ राजा दीक्षित हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहतील.

द.मा.मिरासदार पुरस्काराचे हे तिसरे वर्ष असून मानपत्र, सन्मानचिन्ह आणि रोख २१ हजार रुपये असे पुरस्काराचे स्वरूप आहे. द. मा. मिरासदार हे कथालेखक, चित्रपटकथा व संवाद लेखक, कथाकथनकार आणि लोकप्रिय प्राध्यापक म्हणून ओळखले जात होते. सामाजिक, साहित्यिक आणि सांस्कृतिक क्षेत्रातील त्यांच्या बहुआयामी योगदानाचा गौरव करण्यासाठी त्यांच्या कार्याशी संबंधित क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींना हा पुरस्कार दिला जातो. जन्मशताब्दी वर्षानिमित्त राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि प्रेरणादायी उपक्रम राबविण्यात येणार असल्याची माहितीही प्रतिष्ठानच्या वतीने देण्यात आली.

# दिवे परिसरात फिरती पशुवैद्यकीय सेवा महिनाभरापासून बंद

### उष्णतेमुळे जनावरे आजारी; पशुपालकांकडून सेवा तातडीने सुरू करण्याची मागणी

**निलेश झेंडे | राष्ट्र सह्याद्री**

**दिवे, पुरंदर :** सध्या सुरू असलेल्या अती कडक उष्णतेचा फटका दिवे परिसरातील जनावरांच्या आरोग्यावर मोठ्या प्रमाणात बसत असून जनावरे वारंवार आजारी पडण्याचे प्रमाण वाढले आहे. अशा गंभीर परिस्थितीत शासनाची फिरती पशुवैद्यकीय सेवा गेल्या एक महिन्यापासून बंद असल्याने पशुपालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे. शासनाच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या फिरत्या पशुवैद्यकीय सेवेअंतर्गत १९६२ या टोल फ्री क्रमांकावर संपर्क साधल्यानंतर अवघ्या दहा रुपयांत जनावरांवर उपचार केले जात होते. या सेवेचा लाभ दिवे परिसरातील अनेक पशुपालक घेत होते. विशेषतः दुग्ध व्यवसाय करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी ही सेवा अत्यंत उपयुक्त ठरत होती. या परिसरात कार्यरत असलेले पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. यशवंत पाटील यांनी अत्यंत तत्पर आणि उत्कृष्ट सेवा देत अनेक जनावरांचे उपचार केले होते. त्यामुळे पशुपालकांमध्ये या सेवेबद्दल विश्वास निर्माण झाला होता. मात्र गेल्या महिनाभरापासून ही सेवा अचानक बंद पडल्याने पशुपालकांना खासगी डॉक्टरांकडे जावे लागत असून उपचारासाठी मोठा खर्च सहन करावा लागत आहे. सध्या वाढत्या तापमानामुळे जनावरांमध्ये ताप येणे, चारा कमी



खाणे, दूध उत्पादन घटणे, अशक्तपणा तसेच विविध संसर्गजन्य आजार वाढत असल्याचे चित्र आहे. अनेक शेतकरी शेतीसोबत दुग्ध व्यवसाय करत असल्याने जनावरांचे आरोग्य बिघडल्यास आर्थिक फटका बसत आहे. फिरती पशुवैद्यकीय सेवा बंद असल्याने दिवे परिसरातील पशुपालकांची विशेष गैरसोय होत आहे. वेळेवर उपचार न मिळाल्यास जनावरांच्या जीवितालाही धोका निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. त्यामुळे शासनाने तातडीने दखल घेऊन १९६२ ही फिरती पशुवैद्यकीय सेवा पूर्ववत सुरू करावी, अशी मागणी परिसरातील पशुपालकांकडून करण्यात येत आहे..

## 'नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना तातडीने मदत द्या'

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**पुणे :** जुन्नर तालुक्यातील पिंपळगाव जोग परिसरात कालवा फुटल्याने शेतकऱ्यांच्या शेतीचे मोठे नुकसान झाल्याची गंभीर बाब उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या निदर्शनास आली आहे. याबाबत त्यांनी जलसंपदा विभागाच्या मुख्य अभियंत्यांना निवेदनाद्वारे तातडीने कार्यवाही करण्याची सूचना दिली आहे. दिनांक १२ मे २०२६ रोजी झालेल्या या घटनेमुळे कालव्याचे पाणी शेतजमिनीत घुसल्याने पिके, सुपीक माती, शेतबांध तसेच सिंचन व्यवस्थेचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याची माहिती युवासेना तालुकाप्रमुख विकास राऊत आणि स्थानिक शेतकऱ्यांनी डॉ. गोऱ्हे यांना दिली. या पार्श्वभूमीवर डॉ. नीलम गोऱ्हे यांनी महसूल व जलसंपदा विभागामार्फत तातडीने पंचनामे करण्याचे निर्देश दिले असून नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना शासन नियमांनुसार त्वरीत नुकसानभरपाई देण्यात यावी, अशी सूचना केली आहे. तसेच भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी संबंधित कालव्याची तांत्रिक तपासणी करून आवश्यक दुरुस्ती व मजबुतीकरणाची कामे तातडीने हाती घेण्यात यावीत. कालव्याचे स्ट्रक्चरल ऑडिट करून कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. सदर प्रकरणात करण्यात आलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल आपल्या कार्यालयास सादर करावा, अशी सूचनाही डॉ. गोऱ्हे यांनी संबंधित विभागाला केली आहे.

# शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्यासाठी अर्ज प्रक्रिया सुरू

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ मधील तरतुदीनुसार व दिनांक २५ मार्च २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार राज्यातील गरीब व गरजू कुटुंबांच्या निवासस्थानाचा प्रश्न निकाली काढण्यासाठी शासकीय जमिनीवरील निवासी अतिक्रमणे नियमित करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ मधील कलम ४० व ५१ तसेच महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनींची विल्हेवाट करणे) नियम, १९७१ मधील नियम ४३, ४३(अ) व ५२ अंतर्गत विशिष्ट अटी व शर्तींनुसार दिनांक ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वी झालेली व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी स्वरूपाची अतिक्रमणे नियमित करण्यात येणार आहेत. अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्रता दिनांक ०१ जानेवारी २०११ रोजी किंवा त्यापूर्वीची व सध्या अस्तित्वात असलेली केवळ निवासी प्रयोजनासाठीची अतिक्रमणेच नियमित करण्यासाठी पात्र राहतील. तसेच संबंधित वस्ती किंवा परिसरातील नागरिकांच्या दैनंदिन गरजांसाठी असलेली किराणा दुकान, मेडिकल, दळणाची चक्की, छोटेखानी दवाखाना आदी स्वरूपाची अतिक्रमणे, अतिक्रमणधारकाच्या निवासस्थानास जोडलेली असल्यास अपवादात्मक परिस्थितीत नियमानुसार विचारात घेतली जाणार आहेत. अतिक्रमण दिनांक ०१ जानेवारी २०११ पूर्वीचे असल्याचा पुरावा म्हणून मतदार यादीतील नाव, वीज बिल, मालमत्ता कर पावती, निवासी पुराव्यासाठीचे इतर शासकीय दस्तऐवज (शिधापत्रिका वगळून), ग्रामपंचायतमधील आठ-अ उतारा, अतिक्रमण सर्वेक्षण नोंदवही, झोपडपट्टी घोषणेची अधिसूचना आदी पुरावे ग्राह्य धरले जातील. उपग्रह छायाचित्र देखील महत्त्वाचा पुरावा म्हणून मान्य करण्यात येणार आहे. याशिवाय, चालू वास्तव्यासंदर्भातील मागील एका वर्षातील शासकीय पुरावा सादर करणे आवश्यक राहील. असे उपविभागीय अधिकारी श्री. उत्तम दिघे यांनी स्पष्ट केले आहे. सदर अतिक्रमण हे केवळ स्व-राहण्यासाठी (निवासी हेतूसाठी) केलेले असावे. व्यावसायिक वापरासाठीची अतिक्रमणे नियमित करण्यासाठी पात्र ठरणार नाहीत. पात्र व्यक्तींनी (संस्था नव्हे) अतिक्रमण नियमित करण्यासाठी दिनांक ३० डिसेंबर २०२६ पर्यंत अर्ज सादर करावेत. ग्रामीण भागातील नागरिकांनी संबंधित गटविकास अधिकारी, पंचायत समिती यांच्याकडे अर्ज करावेत, तर नगरपालिका व नगरपंचायत हद्दीतील नागरिकांनी संबंधित मुख्याधिकारी यांच्याकडे अर्ज सादर करावेत. निर्धारित मुदतीत अर्ज करणाऱ्या पात्र व्यक्तींना त्यांचे अतिक्रमण नियमित होईपर्यंत संरक्षण मिळणार आहे. मात्र, निर्धारित मुदतीनंतर अर्ज न करणाऱ्या अथवा अपात्र व्यक्ती/संस्थांची अतिक्रमणे निष्कासित करण्याची कार्यवाही करण्यात येणार असल्याचे उपविभागीय अधिकारी दिघे यांनी सांगितले आहे.

# चिमुकलीच्या घटनेचा सासवड शहरात निषेध

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**माळशिरस :** एक मे रोजी भोर तालुक्यातील नसरापुर येथील चिमुकलीच्या अत्याचाराचा निषेध जिल्ह्यात सर्वत्र करण्यात येत असुन आज (मंगळवारी) सासवड तसेच परिसरातील समस्त सासवडकर नागरिकांनी पिडित बालिकेला श्रद्धांजली अर्पण करून या घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला. येथील शिवतीर्थ चौकात विविध संघटना, ग्रामस्थ एकत्र येत सर्वांनी तीव्र निषेध नोंदवला स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठानच्या वतीने यावेळी सासवड पोलिसांना एक निवेदन देऊन आरोपोला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी केली. स्व एकनाथ काका जगताप प्रतिष्ठान , सासवड शहर भाजप , कलासिद्धी नृत्यालय, ,पुरंदर करिअर अकॅडमी, चॅम्पियन मार्शल आर्ट अँड स्पोर्ट्स अकॅडमी , सासवड नगरपालिका, शहर पत्रकार संघ, माजी सैनिक प्रतिष्ठान जिजामाता फळ व भाजीपाला विक्रेता संघ. श्री शिव प्रतिष्ठान यांसह अनेक नागरिक, विद्यार्थी, छोटी मुले याप्रसंगी उपस्थित होती. या घटनेतील आरोपीला फाशीची शिक्षा देण्यात यावी अशा



स्वरूपातील निवेदन यावेळी पोलिसाना देण्यात आले. हेमंत ताकवले, स्वानंद लोमटे, संतोष जगताप, नगरसेवक माऊली गिरमे यांचे हर्षदा शेंडकर, डॉली पंडोल, प्राची सकपाळ, ज्ञानेश्वरी आखाडे किरण पुरंदरे आदींनी यावेळी आपली मनोगते व्यक्त केली. पोलिस उपनिरीक्षक अशोक जाधव यांनी या वेळी निवेदन स्वीकारले. आनंदभय्या जगाताप, सुनील जगताप , हरून बागवान धनश्री लोमटे, धनंजय जगताप, आरिफ अत्तार, अंकुर शिवरकर, सुधीर गुरव, गणेश मुळीक, जीवन कड, निखिल दिवसे, हेमंत शिंदे, प्रदीप वाघोले, सनीनाना जगताप, अमित पवार यांसह अनेज सासवडकर नागरिक या वेळी उपस्थित होते

# बारामतीतील सेंट्रल पार्कला अजितदादा पवार यांचे नाव देण्याची मागणी; नगरपरिषदेकडे निवेदन सादर

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**बारामती :** बारामती शहरातील प्रभाग क्रमांक १४ येथे उभारण्यात येत असलेल्या भव्य आणि अत्याधुनिक सेंट्रल पार्कला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बारामतीच्या विकासाचे शिल्पकार म्हणून ओळख असलेले आदरणीय अजितदादा पवार यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी बारामती नगरपरिषदेचे स्थानिक नगरसेवक तथा स्वच्छता, वैद्यक व सार्वजनिक आरोग्य समितीचे सभापती नवनाथ सदाशिव बल्लाळ यांनी केली आहे. यासंदर्भातील अधिकृत निवेदन नगराध्यक्ष सचिन सातव यांना सादर करण्यात आले आहे. सदर निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, बारामती शहराचा झपाट्याने होत असलेला विकास, नागरिकांसाठी निर्माण करण्यात येणाऱ्या आधुनिक सुविधा तसेच शहराच्या भविष्यातील नियोजनामध्ये उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे मोठे योगदान आहे. त्यांच्या दूरदृष्टीतून आणि संकल्पनेतून प्रभाग क्रमांक १४ येथे जागतिक दर्जाचे सेंट्रल पार्क विकसित करण्यात येत आहे.



बारामती प्रशासकीय भवनालगत असलेल्या सुमारे १० एकर जागेमध्ये हे सेंट्रल पार्क उभारले जात असून, या ठिकाणी नागरिकांसाठी आधुनिक सुविधा, हिरवळ, ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र व्यवस्था, चालण्यासाठी ट्रॅक, मुलांसाठी खेळण्याची साधने तसेच पर्यावरणपूरक रचना करण्यात येत असल्याची माहिती निवेदनात देण्यात आली आहे. बारामती शहराच्या आगामी ५० वर्षांचा विचार करून हे उद्यान विकसित करण्यात येत असून, शहराच्या सौंदर्यात भर घालणारा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प ठरणार असल्याचेही निवेदनात म्हटले आहे. त्यामुळे बारामतीच्या विकासामध्ये मोलाचे योगदान देणाऱ्या अजितदादा पवार यांच्या नावाने या सेंट्रल पार्कचे नामकरण करण्यात यावे, अशी भावना नागरिकांमध्ये असल्याचे नवनाथ बल्लाळ यांनी नमूद केले आहे.

तसेच हा विषय बारामती नगरपरिषदेच्या सर्वसाधारण सभेमध्ये मांडून पुढील आवश्यक कार्यवाही करण्यात यावी, अशी विनंतीही निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. या निवेदनाची प्रत महाराष्ट्र राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनाही पाठविण्यात आली आहे.

# हिरडस मावळच्या डोंगररांगांत काळी मैना बहरली !

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**हिरडस मावळ, भोर :-** भोर तालुक्याच्या डोंगररांगात यंदा करवंदाच्या जाळ्यांना मोठ्या प्रमाणावर बहर आला असून काळ्यामैनेने जाळ्या फुलल्या आहेत. दरम्यान हिरव्यागार वनराईत रानफुले आणि औषधी वनस्पतीमुळे परिसराचे निसर्गसौंदर्य खुलून दिसत आहे. करवंदांमुळे भोर तालुक्याच्या ग्रामीण भागातील पश्चिम पट्ट्यातील विक्रेत्यांना उन्हाळ्याच्या दिवसात हाताला काम मिळत असते. दैनंदिन खर्चासह वर्षभराची कमाई करवंद विक्रीतून करीत असतात. दरवर्षी मोठ्या प्रमाणावर फळ असते. मात्र यंदा अवकाळी २४ पावसामुळे करवंदीच्या झाडांची फुले बहुतांश प्रमाणात झडून गेल्याने जाळ्यांना फळधारणा कमी प्रमाणात असल्याचे चित्र आहे. पुढील पंधरा दिवसात डोंगरचा रानमेवा बाजारात विक्रीसाठी येणार आहे. मात्र यंदा उत्पन्नात मोठी घट होणार असल्याने आदिवासी बांधवांचे दरवर्षीप्रमाणे मिळणारे आर्थिक उत्पन्न घटणार असल्याचे स्थानिकांकडून सांगण्यात आले. मागील वर्षी दहा किलोच्या पाटीला सातशे रुपये बाजारभाव मिळत होता. यंदा महागाई वाढल्याने बाजारभाव वाढवून मिळणार असला तरी करवंदांचे उत्पन्न कमी मिळणार असल्याने साहजिकच विक्रेत्यांना तोटा सहन करावा लागणार आहे. विक्रीतून वर्षभराचा शाळा खर्च भागतो : तालुक्यात महत्त्वाचे भात पीक असले तरी जेमतेम शेतीमुळे भाताचे उत्पन्न कमी मिळते. उन्हाळ्यात येणाऱ्या डोंगररांगांमधील करवंदाच्या जाळ्यांमधील करवंदांमुळे काहीशा प्रमाणात हाताला कामधंदा मिळतो. उन्हाळ्यात दिवस-दिवस डोंगर मध्ये फिरून करवंदे तोडून शहरातील बाजारपेठेत विक्री करून वर्षभराचा शाळा खर्च जेमतेम चालतो असे तालुक्याच्या पश्चिम पट्ट्यातील हिर्डोशीतील काळी मैना विक्रेते अमृता धामुणसे, अनुष्का धामुणसे, कीर्ती तामकर यांनी सांगितले.



# भग्न दगडांपासून अखंड श्रद्धेपर्यंत सोमनाथची गाथा

सोमनाथ मंदिर हे भारताच्या सांस्कृतिक इतिहासातील, श्रद्धेतील आणि पुनर्जागरणातील सर्वात तेजस्वी प्रतीक मानले जाते. समुद्रकिनारी उभे असलेले हे मंदिर केवळ धार्मिक स्थळ नसून भारतीय सभ्यतेच्या जिद्दीचे, स्वाभिमानाचे आणि अखंड पुनर्निर्माणाच्या शक्तीचे जिवंत उदाहरण आहे. अनेक आक्रमणे, विध्वंस आणि संकटे सहन करूनही पुन्हा पुन्हा उभे राहणारे सोमनाथ हे भारताच्या चिरंतन आत्म्याचे प्रतीक ठरले आहे.

स्वातंत्र्यानंतर १३ नोव्हेंबर १९४७ रोजी तत्कालीन उपपंतप्रधान व गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांनी सोमनाथच्या भग्नावशेषांना भेट दिली. मंदिराची पडझड पाहून त्यांनी पुनर्निर्माणाची प्रतिज्ञा केली. हा क्षण भारतीय स्वाभिमानाच्या पुनर्प्राप्तीचा आणि सांस्कृतिक पुनर्जागरणाचा मानला जातो. पुढे लोकसहभागातून मंदिर उभारण्याचा निर्णय घेण्यात आला. अखेर ११ मे १९५१ रोजी डॉ. राजेंद्र प्रसाद यांच्या हस्ते नव्या मंदिराची प्राणप्रतिष्ठा झाली.

सोमनाथचा इतिहास अत्यंत प्राचीन आहे. प्रभास पाटण परिसरात इ.स.पू. ३००० पासून मानवी वस्ती होती, असे पुरातत्त्वीय पुरावे सांगतात. येथे पूर्व-हडप्पा संस्कृतीचे अवशेष, मातीची भांडी, दगडी नांगर आणि सागरी व्यापाराचे पुरावे सापडले आहेत. यावरून हा प्रदेश प्राचीन काळी व्यापार, शेती आणि संस्कृतीचे केंद्र होता, हे स्पष्ट होते. महाभारतातही प्रभास क्षेत्राचा उल्लेख भगवान श्रीकृष्ण यांच्या देहत्याग स्थळ म्हणून आढळतो.

भागवत पुराणानुसार, चंद्रदेवाला दक्ष प्रजापतीने दिलेल्या शापातून मुक्त होण्यासाठी त्यांनी येथे भगवान भगवान शिव यांची कठोर आराधना केली. त्यामुळे या स्थानाला सोमनाथ म्हणजे चंद्राचा अधिपती असे नाव प्राप्त झाले. त्यामुळे हे क्षेत्र बाराही ज्योतिर्लिंगांपैकी पहिले ज्योतिर्लिंग मानले जाते. इतिहासात सोमनाथ मंदिर अनेकदा उभारले गेले आणि अनेकदा उद्ध्वस्तही झाले. इ.स. १०२६ मध्ये महमूद गझनी याने मंदिरावर हल्ला करून संपत्ती लुटली आणि शिवलिंगाचा विध्वंस केला. त्यानंतरही श्रद्धेची ज्योत विझली नाही. पुढे सोलंकी राजा कुमारपाल, चुडासमा राजे आणि स्थानिक शासकांनी मंदिर पुन्हा उभारले. नंतरच्या काळातही विविध आक्रमकांनी मंदिराचे नुकसान केले. मात्र प्रत्येक वेळी समाजाने मंदिर नव्या रूपात उभे केले.१८व्या शतकात पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर यांनी आपल्या वैयक्तिक निधीतून सोमनाथाजवळ नवीन मंदिर उभारले. या मंदिराने पुढील अनेक वर्षे श्रद्धेचे केंद्र म्हणून भूमिका बजावली. स्वातंत्र्यानंतर के. एम. मुन्शी यांनी पुनर्निर्माण मोहिमेत महत्त्वाची भूमिका बजावली. लोकवर्गणीतून उभे राहिलेले हे मंदिर राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक बनले. आज सोमनाथ मंदिर हे केवळ पर्यटनस्थळ किंवा तीर्थक्षेत्र नाही, तर भारतीय संस्कृतीच्या अमरत्वाची साक्ष देणारे स्मारक आहे. त्याचा संदेश स्पष्ट आहेविध्वंस होऊ शकतो, पण श्रद्धा, संस्कृती आणि आत्मविश्वास कधीही नष्ट होत नाही. सोमनाथ आजही समुद्रकिनारी उभे राहून प्रत्येक पिढीला सांगतेआम्ही पुन्हा उभारतो, आम्ही टिकून राहतो.

**ब्रिजेश सिंह, प्रधान सचिव तथा महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय**

दखल

## भोयरे पठार विद्यालयाचा दहावीचा निकाल १०० टक्के

**सुपा :** पारनेर तालुक्यातील भोयरे पठार येथील विद्यालयाने इयत्ता दहावीच्या बोर्ड परीक्षेत यंदाही १०० टक्के निकालाची उज्ज्वल परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट गुणवत्तेचे प्रदर्शन करत गावाचे व विद्यालयाचे नाव उंचावले आहे. यामध्ये ९ चि. तेजस पप्पू पगडे - ८४.६०%, ९ चि. कृष्णा संपत झरेकर - ८०.६०%, ९ चि. मिनीनाथ भाऊसाहेब टकले - ८०.२०%, ९ कु. अन्वेशा राजेश बोरकर - ८०.००%, ९ कु. भारती संजय पानमंद - ७९.८०% यांचा समावेश आहे. या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे विद्यालयाचे मुख्याध्यापक कार्ले सर, सर्व शिक्षकवृंद तसेच पालकांकडून मन:पूर्वक अभिनंदन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या यशामागे शिक्षकांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन, पालकांचे सहकार्य आणि विद्यार्थ्यांची अथक मेहनत हे महत्त्वाचे घटक असल्याचे यावेळी सांगण्यात आले. याप्रसंगी भोयरे पठार गावचे उपसरपंच राजेश बोरकर यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. विद्यार्थ्यांनी यशाची ही परंपरा कायम ठेवून भविष्यात आणखी नवे विक्रम प्रस्थापित करावेत. शिक्षक, पालक आणि विद्यार्थी यांच्या संयुक्त प्रयत्नातून गावातील शिक्षणाचा दर्जा अधिक उंचावेल, असे मत त्यांनी व्यक्त केले.

## श्रीगोंद्यात छ. संभाजी महाराज जयंती चे भव्य नियोजन



**श्रीगोंदा :** छत्रपती संभाजी महाराज यांची ३६९ वी जयंती श्रीगोंदा शहरात दि. १४ व १५ मे रोजी उत्साहपूर्ण वातावरणात आणि विनावर्गणी लोकसहभागातून मोठ्या जल्लोषात साजरी करण्यात येणार आहे. छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्सव समिती, श्रीगोंदा यांच्या वतीने या उत्सवाचे भव्य नियोजन करण्यात आले असून सामाजिक, सांस्कृतिक आणि जनजागृतीपर विविध उपक्रमांची आखणी करण्यात आली आहे. छत्रपती संभाजी महाराज चौक येथे होणाऱ्या या उत्सवानिमित्त मॅरेथॉन, सायकल स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, संगीत खुर्ची तसेच विविध सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. युवकांमध्ये प्रेरणा जागवण्यासाठी आणि छत्रपती संभाजी महाराजांचे शौर्य, त्याग व राष्ट्रनिष्ठ विचार समाजापर्यंत पोहोचवण्यासाठी रक्तदान शिबिर, गुणवंत विद्यार्थी सत्कार, 'शंभू शौर्य' व्याख्यान आणि शाहिरी पोवाडा यांसारखे विशेष कार्यक्रमही रंगणार आहेत. उत्सवाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे छत्रपती संभाजी महाराज यांच्या जीवनचरित्रावरील पुस्तकांच्या तब्बल ११०० प्रतींचे मोफत वितरण करण्यात येणार आहे. संपूर्ण उत्सव 'विनावर्गणी आणि लोकसहभाग' या संकल्पनेतून होत असल्याने तालुक्यात विशेष उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.समितीने सामाजिक बांधिलकी जपत श्रीगोंद्यातील नागरिक संदीप बजरंग घोडके यांच्या किडनी प्रत्यारोपणासाठी आर्थिक मदत करून समाजाभिमुखतेचाही आदर्श ठेवला आहे.

## पंढरपुरात रविवारपासून तपपूर्ती वर्ष व पंचदिनी सप्ताह - झिरपे महाराज

**हातगाव :** शेवगाव तालुक्यातील कोळगाव येथील ह भ प चंद्रकांत महाराज झिरपे यांच्या संकल्पनेतून येत्या रविवार ( दि.१७) पासून ते गुरुवार ( दि.२१) पर्यंत श्री. क्षेत्र पंढरपुर येथे तपपूर्ती वर्ष व



पंचदिनी अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा आयोजित करण्यात आला आहे . अशी माहिती झिरपे महाराज यांनी दिली आहे. पंढरपूर येथील जगन्नाथ महाराज देशमुख मठ , झेंडे गल्ली, घर न ३२ या ठिकाणी सदरचा कार्यक्रम पार पडणार असून या सप्ताह काळात दररोज पहाटे ४ ते ६ काकडा भजन,६ ते ७ विष्णू सहस्त्रनाम ,७ ते ११ ज्ञानेश्वरी पारायण व नंतर नाष्टा त्यानंतर भोजन व विश्रांती ,दुपारी २ ते ४ रामायण सायंकाळी ४ ते ५ हरिपाठ,सायंकाळी ६ ते ८ हरीकीर्तन व नंतर भोजन आणि त्यानंतर हरिजागर या प्रमाणे दैनदिन कार्यक्रम पार पडणार आहे. याच काळात ह भ प दत्तात्रय महाराज पवार ( पंढरपूर) ह भ प चैतन्य महाराज कुलट ( अनतरवलीकर) ह भ प जगन्नाथ महाराज देशमुख (पंढरपूर) ह भ प विलास महाराज माळकरी ( भीमगिरी बाबा संस्थान , पाथरवाला) या महाराजांची कीर्तनसेवा पार पडणार आहे .गुरुवार ( दि.२१) रोजी सकाळी ९ ते ११ या वेळात ह भ प चंद्रकांत महाराज झिरपे यांचे सुश्राव्य काल्याचे किर्तन होऊन त्यानंतर महाप्रसादाचा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्याचे हे १२ वे वर्ष असून ज्ञानेश्वरी पारायणाचे नेतृत्व ह भ प चैतन्य महाराज कुलट हे करणार आहे .रामायणाचार्य म्हणून ह भ प गोरक्ष महाराज ढाकणे हे आपली भूमिका बजावणार आहेत.

## रयतच्या कौन्सिल सदस्यपदी बाबासाहेब भोस यांच्या निवडीचे स्वागत



**लिंपणगाव :** नुकत्याच पार पडलेल्या रयत शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी पद्मविभूषण श्री शरदचंद्रजी पवार साहेब यांची निवड झाली .त्याचप्रमाणे श्रीगोंद्याचे सुपुत्र व जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष बाबासाहेब भोस यांची कौन्सिल वर बिनविरोध निवड झाली. त्यानिमित्ताने अहिल्यानगर जिल्ह्याचे राष्ट्रवादीचे जिल्हा उपाध्यक्ष शामराव नागवडे यांनी त्यांचे शाल, फेटा ,श्रीफळ , देऊन हार्दिक अभिनंदन केले. या छोटेखानी समारंभामध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुक्यातील पदाधिकारी बहुसंख्येने उपस्थित होते. पवार साहेब यांच्या संपूर्ण राजकीय कारकीर्दीवर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न अनेक उपस्थितांनी केला. शाहू ,फुले ,आंबेडकर, आणि त्यानंतर यशवंतराव चव्हाण ,वसंतदादा पाटील, अशा अनेक दिग्गज नेत्यांचा वारसा शरदचंद्र पवार साहेब आज चालवीत आहेत. सध्याचा पुरोगामी महाराष्ट्र घडवण्यामध्ये पवार साहेबांची अत्यंत मोठी आणि भरीव कामगिरी असल्याचे जिल्हा उपाध्यक्ष शामराव नागवडे यांनी सांगितले. बाबासाहेब भोस हे अतिशय संघर्षातून घडलेले व्यक्तिमत्व असून आजही श्रीगोंद्याच्या राजकारणामध्ये त्यांचा भरीव असा वाटा आहे. उद्याच्या राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्षासाठी तन-मन धनाने काम करण्याची जिद्द त्यांनी कार्यकर्त्यासमोर व्यक्त केली.

# नगराध्यक्षा घुलेंवरील अविश्वास आदेशास स्थगिती

## कर्जतमध्ये कायदा व सुव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर पोलीस संचलन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**कर्जत :** कर्जत नगरपंचायतीच्या नगराध्यक्षा रोहिणी सचिन घुले यांच्यावर बुधवारी अविश्वास ठराव मागणीवर जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार विशेष सभा बोलाविण्यात आली होती. मात्र तत्पुर्वीच नगराध्यक्षा घुले आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांनी जिल्हाधिकारी यांच्या विशेष सभेवर स्थगिती घेतल्याने उद्याची विशेष सभा रद्द करण्याची नोटीस अहिल्यानगर नगरविकास विभागाचे सह आयुक्त डॉ प्रदिप पठारे यांनी काढली. विधान परिषदेचे सभापती राम शिंदे आणि कर्जतचे घुले बंधूच्या सत्ता संघर्षास काही काळ ब्रेक लागला हे निश्चित.

७ मे रोजी कर्जत नगरपंचायतीच्या गटनेता बदलानंतर १३ नगरसेवकांनी विद्यमान नगराध्यक्षा रोहिणी घुले यांच्यावर देखील अविश्वास मागणी प्रस्ताव दाखल केला होता. सदरच्या प्रस्तावावर जिल्हाधिकारी यांनी कर्जतच्या प्रांताधिकारी नितीन पाटील यांची पीठासीन अधिकारी म्हणून नियुक्ती करीत बुधवार, दि १३ रोजी नगराध्यक्षा घुले यांच्या अविश्वास मागणी प्रस्तावावर विशेष सभा आयोजित करण्याचे निर्देश दिले होते. गटनेत्यानंतर नगराध्यक्षा देखील बदलले जातील का ? यावर स्थानिक नेत्यांमध्ये पैंजा झडत असताना मंगळवारी (दि.१२) संध्याकाळी रोहिणी घुले यांनी जिल्हाधिकारी अहिल्यानगर यांच्या विशेष सभेच्या आदेशास उच्च न्यायालय खंडपीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्याद्वारे स्थगिती घेत आपल्या पदावर आलेल्या संकटास तूर्तास तरी पूर्णविराम लावला. त्यामुळे बुधवारी जिल्हाधिकारी यांनी बोलावलेली विशेष सभा रद्द करण्याची नामुष्की तालुका प्रशासनावर ओढवली. सदरची विशेष सभा रद्द करण्याचे आदेश अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालयाचे नपप्र सह आयुक्त डॉ प्रदिप पठारे यांनी दिले आहे. नगराध्यक्षा पदाच्या अविश्वासावर ११ जूनपर्यंत स्थगिती आदेश मिळाल्याची प्राथमिक माहिती मिळत आहे. या स्थगिती आदेशाने विधान परिषदेचे सभापती प्रा राम शिंदे आणि कर्जतचे घुले बंधू यांच्यातील सत्ता संघर्षास तूर्तास तरी ब्रेक लागला असून आगामी काळात या सत्तेच्या रस्सीखेचमध्ये कोण बाजी मारेल ? याकडे देखील मतदारसंघासह राज्याचे लक्ष लागले आहे.

### सात महिन्याच्या पदाधिकारी खुर्चीसाठी जोरदार रस्सीखेच आणि राजकीय नेत्यांची प्रतिष्ठा पणाला

कर्जत नगरपंचायतीचा काळ जानेवारी २७ मध्ये पूर्ण होईल. अवघ्या सात-आठ महिन्याच्या पदाधिकारी खुर्चीसाठी राजकीय व्यक्तीमत्वाच्या प्रतिष्ठा पणाला लागल्या आहेत. राम शिंदे यांनी सत्तांतर घडवताना आपल्या सोशल मीडियावरून उर्वरित काळासाठी दोन नगराध्यक्षा राहतील यात प्रथम रोहिणी घुले आणि दुसऱ्या टर्मसाठी छाया शेलार नाव जाहीर केले होते. मात्र पदाचा काळ पूर्ण झाल्यानंतर देखील घुले यांनी राजीनामा न दिल्याने पदाधिकाऱ्यांतील असंतोष उफाळला आणि राजकीय अस्थिरता निर्माण झाली. यात मागील आठवड्यात गटनेत्याची विकेट पडली. आणि त्याच दिवशी नगराध्यक्षावर अविश्वास प्रस्ताव दाखल करण्यात आला होता.

### आजची विशेष सभा रद्द



## वृद्ध दांपत्यावर हल्ला

# ८५ हजाराचा मुद्देमाल लंपस

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील कोळगाव येथील आठखांब मळा, गवळी वस्ती परिसरात रविवारी मध्यरात्री धक्कादायक चोरीची घटना घडली. शेतात झोपलेल्या वृद्ध दांपत्यावर दोन अज्ञात तरुणांनी लाकडी काठी व लोखंडी हत्याराने हल्ला करत सुमारे ८५ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जबरदस्तीने हिसकावून नेल्याने परिसरात खळबळ उडाली आहे.





याप्रकरणी नवनाथ दत्तात्रय गवळी (वय ३३, रा. कोळगाव, आठखांब मळा) यांनी बेलवंडी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. या फिर्यादीवरून दोन अनोळखी १८ ते २० वयोगटातील संशयितांविरोधात गुन्हा रजिस्टर क्रमांक १४३/२०२६, बीएनएस कलम ३०९(६) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, दि. १० मे रोजी रात्री ११.३० ते ११ मे रोजी पहाटे १ वाजण्याच्या दरम्यान ही घटना घडली. फिर्यादीचे आई-वडील शेतात झोपलेले असताना आरोपींनी त्यांच्यावर हल्ला करून दोन तोळे दोन ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व अन्य ऐवज असा एकूण ८५ हजारांचा मुद्देमाल लंपास केला.घटनेची माहिती मिळताच उपविभागीय पोलीस अधिकारी प्रविणकुमार लोखंडे, पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी व सहायक पोलीस निरीक्षक नंदकुमार सोनवलकर यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली.या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक गाजरे करीत असून, आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांनी पथके रवाना केली आहेत.दरम्यान, घटनेनंतर परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असले तरी परिस्थिती सध्या शांत असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

# बंधाऱ्यातील गाळ काढण्यासाठी

## शेतकऱ्यांना परवानगी द्या : ब्रिगेडांची मागणी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री





**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील स्थानिक स्तरावरील लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद बंधारे तसेच पाझर तलावांमध्ये मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पाणीसाठा क्षमता घटली आहे. त्यामुळे या साठवण बंधाऱ्यांतील गाळ काढण्यासाठी शेतकऱ्यांना तातडीने परवानगी द्यावी, अशी मागणी संभाजी ब्रिगेडने तहसीलदारांकडे निवेदनाद्वारे केली आहे.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हा उपाध्यक्ष नाना शिंदे यांनी नायब तहसीलदार, यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, तलावांमधील गाळमिश्रित माती शेतकऱ्यांना शेतीसाठी अत्यंत उपयुक्त ठरणार आहे. यामुळे एकीकडे शेतजमिनीची गुणवत्ता सुधारेल, तर दुसरीकडे तलावांचे खोलीकरण आणि रुंदीकरण होऊन पाणीसाठा क्षमता मोठ्या प्रमाणात वाढेल. शासनाच्या 'गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार' तसेच नाला खोलीकरण व रुंदीकरण योजनेंतर्गत तातडीने कार्यवाही करून शेतकऱ्यांना कुठल्याही अटी-शर्तींशिवाय गाळ काढण्यास परवानगी द्यावी, अशी मागणीही करण्यात आली आहे.पावसाळा अवघ्या पंधरा दिवसांवर येऊन ठेपला असल्याने प्रशासनाने विलंब न करता तातडीने निर्णय घ्यावा, अन्यथा भविष्यात दुष्काळी परिस्थितीचा सामना करावा लागू शकतो, असा इशाराही संभाजी ब्रिगेडने दिला आहे.तलाव अधिक खोल, पाणीसाठा अधिक मोठा आणि शेती अधिक समृद्ध हेच प्रशासनाने पुढील धोरण ठेवावे, असे मत नाना शिंदे यांनी व्यक्त केले.

## यशवंत विद्या पतसंस्थेच्या चेअरमनपदी पवार तर शेळके व्हा. चेअरमन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री





**लिंपणगाव :** श्रीगोंदा येथील श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयातील नोकरदारांची यशवंत विद्या सहकारी पतसंस्था मर्यादित श्रीगोंदा या पतसंस्थेच्या चेअरमन पदी प्रा. नंदकुमार पवार तर व्हाईस चेअरमन पदी श्री.शहाजी शेळके यांची बिनविरोध निवड करण्यात आली. सहकार महर्षी नागवडे कारखान्याचे चेअरमन आणि शिक्षण संस्थेचे अध्यक्ष . राजेंद्र दादा नागवडे यांच्या मार्गदर्शनाखाली ही निवड झाली. श्रीगोंदा तालुका सहकारी संस्थेचे सहाय्यक निबंधक . नारायण परजणे साहेब हे अध्याशी अधिकारी म्हणून उपस्थित होते, त्यांनी या दोघांची बिनविरोध निवड झाल्याचे जाहीर केले. संचालक मंडळाच्या बैठकीस महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सतीशचंद्र सूर्यवंशी,सहकार खात्याचे अधीक्षक मा मुंडे साहेब,संस्थेचे आजी-माजी पदाधिकारी व सर्व संचालक मंडळ उपस्थित होते.

या निवडीबद्दल . राजेंद्र दादा नागवडे, जिल्हा बँकेच्या संचालिका.सौ.अनुराधाताई नागवडे, मा. व्हाईस चेअरमन तथा विद्यमान संचालक सुभाष काका शिंदे,प्रा सुरेश रसाळ, प्रा सुनील माने, तसेच संस्थेचे सर्व विश्वस्त, संचालक मंडळ, नारायण परजणे,मा निलेश मुंडे, महाविद्यालयाचे सर्व प्राध्यापक,शिक्षक, सेवकवृंद यांनी अभिनंदन केले आहे.

## पॉलिटेक्निकलच्या ४७ विद्यार्थ्यांची कंपनीत निवड



प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**लिंपणगाव :** बेलवंडी (शुगर) येथे इंदिरा गांधी पॉलिटेक्निकमध्ये कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्ह मध्ये इलेक्ट्रॉनिक्स, मेकॅनिकल आणि कॉम्प्युटर इंजिनिअरिंगच्या ४७ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड झाले आहे. अशी माहिती पॉलिटेक्निकलचे प्राचार्य डॉ. प्रशांत भोईटे यांनी दिली.

यावेळी प्राचार्य डॉ. भोईटे यांनी सांगितले की, आज बेलवंडी (शुगर) येथील इंदिरा गांधी पॉलिटेक्निक महाविद्यालयात दि.११-५-२०२६ रोजी कॅम्पस प्लेसमेंट ड्राईव्हचे आयोजन करण्यात आले होते. या प्लेसमेंट ड्राईव्हसाठी सुपा येथील यूकेबी इलेक्ट्रॉनिक्स लिमिटेड कंपनीचे एच आर मॅनेजर निरंजन कुलकर्णी व सिनियर एक्झिक्यूटिव्ह पडवळकर सर यांनी उपस्थित राहून विद्यार्थ्यांची मुलाखत घेतली.

या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये विविध विभागातील अंतिम वर्षातील विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. त्यापैकी अनेक विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

तसेच टायकिशा इंजिनिअरिंग इंडिया प्रा. लि. मधील रवींद्र अशोक करवंदे, डेप्युटी मॅनेजर एच आर,ॲडमिन व अमर गोडसे प्रोडक्शन मॅनेजर हे देखील उपस्थित होते. यांनी मेकॅनिकल विभागातील विद्यार्थ्यांची निवड केली.

या यशस्वी प्लेसमेंट ड्राइव्हमुळे महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्ता, प्रशिक्षण व्यवस्था व विद्यार्थ्यांची तयारी यावर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे. प्रशिक्षण व प्लेसमेंट विभागाने विद्यार्थ्यांना उद्योगांसाठी सक्षम करण्यासाठी घेतलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे हे फलित असल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले.

श्री छत्रपती शिवाजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र दादा नागवडे सर्व संचालक मंडळ तसेच निरीक्षक सचिनराव लगड सर, प्राचार्य डॉ.प्रशांत भोईटे सर, विभाग प्रमुख हवालदार सर,नातू सर, शिंदे सर,इथापे सर, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट ऑफिसर साळवे सर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी सर्व निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले . यावेळी सहभागी कंपनीचे एचआर प्रतिनिधींचे आभार व्यक्त केले.

# जबरी चोरी करणारी सराईत टोळी जेरबंद

## सव्वाअकरा लाखांचा मुद्देमाल हस्तगत ; स्थानिक गुन्हे शाखेची कामगिरी

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** आहिल्यानगर जिल्ह्यातील जबरी चोरीच्या घटनांना आळा घालण्यात स्थानिक गुन्हे शाखेला मोठे यश मिळाले असून, सराईत आरोपींच्या टोळीला जेरबंद करत तब्बल १० गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. या कारवाईत ११ लाख १९ हजार ८०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अहिल्यानगर तालुका पोलीस ठाण्यात दाखल असलेल्या जबरी चोरीच्या गुन्ह्याचा तपास सुरू असताना, पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी यांच्या नेतृत्वाखालील स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने तांत्रिक विश्लेषण आणि गुप्त माहितीच्या आधारे आरोपींचा माग काढला. तपासादरम्यान वाकोडी येथील जुना जकात नाका परिसरात दोन मोटारसायकलवर आलेल्या संशयितांना घेराव घालण्यात आला. पोलिसांना पाहताच त्यांनी पळ काढण्याचा प्रयत्न केला; मात्र पाठलाग करून त्यांना ताब्यात घेण्यात आले. अटक करण्यात आलेले आरोपी गणेश दिवानजी काळे (रा. वाकोडी, ता. अहिल्यानगर) विनय उर्फ टकल्या योगेश काळे



(रा. वाळुंज, ता. अहिल्यानगर) रोहित लल्या भोसले (रा. सराटी वडगाव, ता. आष्टी, जि. बीड) चौकशीत आरोपींनी गुन्ह्यांची कबुली दिल्यानंतर पोलिसांनी त्यांच्या ताब्यातून ६४ ग्रॅम सोन्याचे दागिने, ४० ग्रॅम चांदीचे दागिने, तीन मोबाईल फोन आणि दोन मोटारसायकली असा ११.१९ लाखांचा मुद्देमाल हस्तगत केला.

विशेष म्हणजे, या टोळीने अहिल्यानगर, श्रीगोंदा, सुपा, बेलवंडी आणि तोफखाना पोलीस ठाण्यांच्या हद्दीत १० जबरी चोरीचे गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.या धडाकेबाज कारवाईमुळे जिल्ह्यातील गुन्हेगारांना स्पष्ट संदेश गेला आहे कायद्याच्या हातातून सुटका नाही!स्थानिक गुन्हे शाखेच्या या कामगिरीबद्दल नागरिकांकडून समाधान व्यक्त होत असून पोलिसांचे कौतुक होत आहे.सदर गुन्हे उघडकीस आणणेकरीता स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि किरणकुमार कबाडी यांचे नेतृत्वाखाली सपोनि हरिष भोये, महादेव गुट्टे पोलीस अंमलदार गणेश लोंढे, फुरकान शेख, श्यामसुंदर जाधव, बाळासाहेब खेडकर, भाऊसाहेब काळे, किशोर शिरसाठ, मनोज साखरे, सुनिल मालणकर, आकाश काळे, बाळासाहेब गुंजाळ, योगेश कर्डीले, महिला पोलीस अंमलदार भाग्यश्री भिटे, किरण ठुबे, चालक भगवान धुळे, अरुण मोरे यांचे पथकासह आदींचा समावेश होता.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

बुधवार, दि.१३ मे २०२६ | अहिल्यानगर | पान नं. ८

# संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहतीच्या पायाभूत सुविधांसाठी १० कोटींच्या निधीचा प्रस्ताव




> सहकारी औद्योगिक वसाहतीचा विकास हा संगमनेरच्या आर्थिक प्रगतीचा मजबूत पाया आहे. अनेक वर्ष प्रलंबित विकासकामांना मंजुरी मिळाल्यास संगमनेर औद्योगिक वसाहत आधुनिकतेकडे वाटचाल करत सुरक्षित आणि सुसज्ज रोजगारनिर्मितीचे नवे केंद्र बनेल असा विश्वास आहे.
> **आ. अमोल खताळ, संगमनेर विधानसभा**

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : वर्षानुवर्षे मूलभूत सुविधांच्या प्रतीक्षेत असलेल्या संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहतीच्या विकासासाठी आमदार अमोल खताळ यांनी उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडे १० कोटी रुपयांचा प्रस्तावित निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे. औद्योगिक वसाहतीची सद्यस्थिती गांभीर्याने घेत मंत्री उदय सामंत यांनी याबाबत सकारात्मक भूमिका दर्शवली असून, निधी उपलब्धतेसाठी तांत्रिक व प्रशासकीय मान्यता देण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांना आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या जाणार असल्याची ग्वाही दिली.

महाराष्ट्र राज्याचे उद्योग मंत्री तथा शिवसेना पक्षाचे संपर्क मंत्री उदय सामंत यांनी ७ मे रोजी अहिल्यानगर जिल्ह्याचा दौरा केला. यावेळी त्यांनी संगमनेर येथे आमदार अमोल खताळ यांच्या निवासस्थानी तसेच जनसंपर्क कार्यालयाला भेट दिली. दरम्यान, संगमनेर मतदारसंघातील विविध राजकीय, सामाजिक आणि विकासासंदर्भातील प्रश्नांवर चर्चा करण्यात आली.

तसेच शिवसेनेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत मंत्री सामंत यांनी त्यांना मार्गदर्शन केले. दरम्यान, आमदार अमोल खताळ यांनी संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहतीमधील पायाभूत सुविधांच्या अभावामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीकडे उद्योग मंत्री सामंत यांचे लक्ष वेधले. औद्योगिक वसाहतीचा विकास आराखडा अद्याप तयार करण्यात आला नसून पायभूत सुविधा, सुरक्षा व्यवस्था, वीजपुरवठा तसेच आपत्ती व्यवस्थापन याकडे पूर्णपणे दुर्लक्ष करण्यात आले आहे. यामुळे तेथील उद्योजक आणि कामगारांना मोठा मनस्ताप सहन करावा लागत आहे.

संगमनेर सहकारी औद्योगिक वसाहतीमध्ये अंतर्गत रस्ते, पाणी पुरवठा, जलनिस्सारण व्यवस्था आणि पथदिवे यांची गरज भासत आहे. सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करणे महत्वाचे असून उद्योजकांना मोकळ्या आणि सुरक्षित वातावरणात व्यवसाय करता यावा यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे आमदार खताळ यांनी उद्योग मंत्री सामंत यांच्या निदर्शनास आणून दिले. तसेच यासंदर्भात वर्षानुवर्ष सत्ताकेंद्र असलेल्या संचालक मंडळाकडून कोणतीही ठोस उपाययोजना झाली नसल्याचे आमदार खताळ यांनी सांगितले. संगमनेर औद्योगिक वसाहतीच्या विकास निधीसाठी यापुर्वी सातत्यपूर्ण पाठपुरावा केला असून ७ ऑक्टोबर २०२५ रोजी उद्योग केंद्र, अहिल्यानगर यांनी आवश्यक असलेल्या १० कोटी रुपयांच्या निधीचा प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ विभागीय कार्यालय, अहिल्यानगर यांच्याकडे तांत्रिक मान्यतेसाठी सादर केला आहे. या प्रस्तावाला तांत्रिक आणि प्रशासकीय मान्यता देण्याचे आश्वासन उद्योग मंत्री उदय सामंत यांच्याकडून देण्यात आले असल्याची माहिती आमदार अमोल खताळ यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.

## रात्री १० नंतर वाद्य वाजवल्यास आयोजकांसह मालकांवर गुन्हे दाखल होणार



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : शहरासह तालुक्यात रात्री १० नंतर ध्वनीक्षेपक, साऊंड सिस्टिम तसेच वाद्य वाजविणाऱ्यांविरोधात कडक कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा संजय ठेंगे यांनी दिला आहे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या साऊंड सिस्टिम मालक, चालक, मंगल कार्यालय मालक, आयोजक तसेच संबंधित ग्राहकांवर गुन्हे दाखल करण्यात येणार आहेत. अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांच्या आदेशानुसार राहुरी पोलीस स्टेशनकडून नुकतीच विशेष बैठक आयोजित करण्यात आली.

या बैठकीत राहुरी शहर व तालुक्यातील सर्व साऊंड सिस्टिम चालक, मालक, मंगल कार्यालय चालक तसेच कार्यक्रम आयोजकांना ध्वनी प्रदूषणासंदर्भातील नियमांची माहिती देण्यात आली. बैठकीत पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी स्पष्ट केले की, रात्री १० नंतर कोणत्याही प्रकारचे वाद्य, डीजे, साऊंड सिस्टिम, मोठ्या आवाजातील संगीत, तसेच फोटोग्राफी किंवा व्हिडिओग्राफीसाठी ध्वनीवर्धक साधनांचा वापर केल्यास संबंधितांवर ध्वनी प्रदूषण (नियमन व नियंत्रण) नियम २००२ अन्वये कारवाई करण्यात येईल. विशेषतः लग्नसमारंभ, वाढदिवस, मिरवणुका, सांस्कृतिक कार्यक्रम व इतर सार्वजनिक समारंभांमध्ये रात्री उशिरापर्यंत मोठ्या आवाजात संगीत वाजविण्याच्या तक्रारी वाढत असल्याने पोलिसांनी ही मोहीम हाती घेतली आहे.

नागरिकांच्या शांततेचा भंग होऊ नये, विद्यार्थ्यांना अभ्यासात अडथळा येऊ नये आणि रुग्णांना त्रास होऊ नये, या दृष्टीने ही कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. नियमांचे पालन करून कार्यक्रम पार पाडावेत, अन्यथा संबंधितांवर थेट गुन्हे दाखल करण्यात येतील, असा इशारा पोलीस निरीक्षक संजय ठेंगे यांनी दिला आहे. त्यामुळे आयोजकांनी वेळेचे बंधन पाळावे, असे आवाहन राहुरी पोलिसांकडून करण्यात आले आहे.

## राहुरी फॅक्टरीचे खेळाडू राष्ट्रीय शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : छत्रपती संभाजीनगर येथे ९ मे रोजी पार पडलेल्या १७ वर्षांखालील राज्यस्तरीय शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धेत अहिल्यानगर संघाने प्रथम मानांकन मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले. या स्पर्धेत राहुरी फॅक्टरी येथील शिवनेरी क्लबच्या खेळाडूंची ४५ व्या राष्ट्रीय शूटिंग व्हॉलीबॉल स्पर्धे साठी महाराष्ट्र संघात निवड झाली आहे.

तेलंगणा राज्यातील मेहबूबाबाद येथे १२ ते १४ मे २०२६ रोजी होणाऱ्या राष्ट्रीय स्पर्धेसाठी मुलींच्या गटातून कुमारी सानिका किरण कोबरणे, श्वेताली दत्तात्रय गोपाळे व जान्हवी सोमनाथ जाधव यांची तर मुलांच्या गटातून ऋषिकेश पिलोरे यांची महाराष्ट्र संघात निवड करण्यात आली आहे. यामध्ये विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे सानिका किरण(पिनू) कोबरणे हिची महाराष्ट्र संघाच्या कर्णधारपदी निवड झाली आहे. तिच्या निवडीमुळे राहुरी फॅक्टरी परिसरासह अहिल्यानगर जिल्ह्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. या यशस्वी खेळाडूंना अम्युचर शूटिंग व्हॉलीबॉल राज्य फेडरेशनचे सचिव सुनिल कंठाळे, राज्य फेडरेशनचे सदस्य नाना काळे, अहिल्यानगर जिल्हा शूटिंग व्हॉलीबॉल संघटनेचे अध्यक्ष मुस्ताक शेख तसेच प्रशिक्षक राजेंद्र पुजारी व संदीप निबे यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे. खेळाडूंच्या निवडीबद्दल विविध स्तरांतून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

## दै. राष्ट्र सह्याद्रीच्या वतीने जेष्ठ नेते यशवंतराव गडाख यांचा सन्मान व विशेषांकाचे प्रकाशन



जेष्ठ नेते साहित्यिक व माजी खासदार यशवंतराव गडाख यांच्या जन्मदिनाच्या निमित्ताने राष्ट्र सह्याद्री परिवाराच्या वतीने त्यांचा सन्मान करतांना तालुका प्रतिनिधी सुधीर चव्हाण,सोमनाथ कचरे,इस्माईल शेख दिसत आहे.तर दैनिक राष्ट्र सह्याद्रीने काढलेल्या अभिष्टचिंतन विशेषांकाचे प्रकाशन करतांना यशवंतराव गडाख यांच्या समवेत संत ज्ञानेश्वर महाराज देवस्थानचे महंत वेदांताचार्य हभप देविदासजी महाराज म्हस्के शास्त्री,ज्ञानेश्वर माऊली शिंदे,सुधीर चव्हाण दिसत आहे.

## खोकर सोसायटीच्या चार संचालकांना दिलासा; २६ मे रोजी सुनावणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील खोकर सोसायटीच्या संचालक मंडळातील चार संचालकांना अपात्र ठरविण्याच्या प्रकरणात मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने महत्त्वपूर्ण दिलासा दिला आहे. न्यायालयाने संबंधित आदेशांना स्थगिती कायम ठेवत प्रकरणाचा चेंडू पुन्हा नाशिक विभागीय सहनिबंधकांच्या दालनात पाठविला असून, तीन महिन्यांत अंतिम निर्णय देण्याचे निर्देश दिले आहेत. दरम्यान, संबंधित चारही संचालकांचे पद अबाधित राहणार आहे.

या प्रकरणाची पुढील सुनावणी २६ मे रोजी नाशिक येथे होणार आहे. खोकर विविध कार्यकारी सोसायटीचे संचालक पोपटराव जाधव, मथुराबाई चक्रनारायण, सुशीला गव्हाणे आणि प्रयागाबाई भंगे यांना थकबाकीदार कर्जदार ठरवत संचालक पदासाठी अपात्र घोषित करण्याची मागणी, सतिश शेरकर यांनी सहाय्यक निबंधकांकडे केली होती. त्यानुसार, श्रीरामपूर येथील सहाय्यक निबंधकांनी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी दिलेल्या आदेशात संबंधित चार संचालकांना अपात्र ठरविले होते.

या निर्णयाविरोधात संबंधित संचालकांनी आपण थकबाकीदार नसल्याचा दावा करत, विभागीय सहनिबंधक कार्यालयाकडे दाद मागितली. मात्र, तेथेही दिलासा न मिळाल्याने त्यांनी मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) खंडपीठात याचिका दाखल केली. उच्च न्यायालयाने १७ एप्रिल रोजी दिलेल्या अंतरिम आदेशात सहाय्यक निबंधक, विभागीय सहनिबंधक तसेच जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी दिलेल्या आदेशांना स्थगिती दिली आहे. तसेच अंतिम निर्णय होईपर्यंत संबंधित संचालकांना सदस्य व संचालक म्हणून कायम ठेवण्याचे निर्देश दिले आहेत. न्यायालयाने प्रकरण निकाली काढताना नाशिक विभागीय सहनिबंधकांना तीन महिन्यांत अंतिम निर्णय घेण्याचे आदेश दिले आहेत.त्यामुळे सध्या तरी चारही संचालकांचे पद सुरक्षित राहिले असून, आता या प्रकरणाकडे सहकार क्षेत्राचे लक्ष लागले आहे. या प्रकरणात याचिकाकर्त्या संचालकांतर्फे ड. अजित काळे यांनी बाजू मांडली. तर सोसायटीतर्फे ड. विजय जगताप, तक्रारदार सतीश शेरकर यांच्यावतीने ड. एस. एस. गंगाखेडकर आणि शासन पक्षातर्फे ड. एस. आर. यादवलोणीकर यांनी काम पाहिले.

## मालवाहतूक ट्रक साईड गटारीसाठी खोदलेल्या खड्ड्यात पलटी



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**कोल्हार** : कोल्हार लोणी रस्त्यावर पाचीमोऱ्या जवळ सोमवारी मालवाहतूक करणारा ट्रक उलटून चालक जखमी झाल्याची घटना घडली . याबाबत सविस्तर असे की गुजरात येथून मार्बलची फरशी घेऊन बारामती कडे जाणारा ट्रक नंबर एम एच १२ टी व्ही ३५ ७३ कोल्हार लोणी रस्त्यावर साईड गटारीसाठी खोदलेल्या खड्ड्यांमध्ये जाऊन पलटी झाला या अपघातात ट्रकचालक स्वप्निल राहणार कळस तालुका बारामती यांच्या चेहऱ्याला व बरगडीला मार लागल्याने जखमी झाला सध्या कोल्हार लोणी रोडचे दुरुस्तीचे काम सुरू असून या रस्त्यावर साईड गटारीसाठी खोदकाम केलेले आहे परंतु अत्यंत धीमे गतीने रस्त्याचे काम सुरू असल्याने या ठिकाणी अपघाताचे सत्र सुरूच आहे सोमवारी झालेल्या अपघात हा देखील साईड पट्ट्या खोदून ठेवल्याने झाल्याची तक्रार ट्रक चालकाने केली आहे.

## खुल्या कांद्याची नेवासा बाजार समितीत मोठी आवक

### १००० ते ११०० प्रति क्विंटल भाव



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**नेवासा** : नेवासा कृषी उत्पन्न बाजार समिती नेवासा येथे मंगळवार दि.१२ मे २०१६ रोजी खुल्या कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाली. बाजार समितीत एकूण १४४ शेतकऱ्यांनी कांदा विक्रीसाठी आणला असून २१५ वाहनांमधून तब्बल २ हजार ६४८.२५ क्विंटल उन्हाळी कांद्याची आवक नोंदविण्यात आली. बाजारात कांद्याला दर्जानुसार चांगला भाव मिळाला. एक नंबर कांद्याला प्रतिक्विंटल ९००ते १००० रुपये दर मिळाला, तर दोन नंबर कांद्याला ६०० ते ७००रुपये भाव मिळाला. तीन नंबर कांद्याचा दर ४०० ते ५०० रुपये राहिला. गोल्टा कांद्याला ५०० ते ६०० रुपये,गोल्टी कांद्याला ३०० ते ४०० रुपये तसेच जोड, हलका व डॅमेज कांद्याला २०० ते ३०० रुपये दर मिळाला.

अपवादात्मक दर्जाच्या कांद्याला १०००ते ११०० रुपयांपर्यंत उच्चांकी भाव मिळाल्याची माहिती बाजार समितीकडून देण्यात आली. खुल्या कांद्याची मोठ्या प्रमाणावर आवक झाल्यामुळे बाजार परिसरात दिवसभर व्यापारी व शेतकऱ्यांची मोठी गर्दी पाहायला मिळाली. यावेळी बाजार समितीच्या वतीने शेतकऱ्यांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. याबाबत बोलताना नेवासा कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नंदकुमार पाटील यांनी सांगितले की माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या नेतृत्वाखाली नेवासा कृषी उत्पन्न बाजार समिती शेतकऱ्यांच्या सेवेसाठी सदैव तत्पर असून शेतकऱ्यांना योग्य दर व सुविधा मिळाव्यात यासाठी बाजार समिती कटिबद्ध असल्याचे सांगितले.

## शेअर मार्केट ऑफिसवर गुंतवणूकदारांचा संताप; दगडफेक, चालक फरार

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील भोकर सबस्टेशन परिसरातील एका कथित शेअर मार्केट कार्यालयावर पैसे बुडाल्याच्या संतापातून गुंतवणूकदारांनी दगडफेक करत कार्यालयाच्या काचा फोडल्याची घटना समोर आली आहे. संबंधित कार्यालयाचा चालक फरार झाल्याची माहिती मिळाली असून, या प्रकरणी पोलिसांत गुन्हा दाखल झाल्याची चर्चा आहे. मिळालेल्या माहितीनुसार, संदीप बाबा या नावाने ओळखला जाणारा व्यक्ती संबंधित कार्यालयातून कमी कालावधीत जास्त व्याजदर व मोठा परतावा मिळवून देण्याचे आमिष गुंतवणूकदारांना दाखवत होता. सुरुवातीच्या काळात काही गुंतवणूकदारांना जास्त परतावा देण्यात आल्याने लोकांचा विश्वास बसला. त्यानंतर अनेकांनी मोठ्या प्रमाणावर रक्कम गुंतविल्याचे सांगितले जाते. या कार्यालयात आलिशान व्यवस्था, काचेचे आधुनिक ऑफिस, सुरक्षा रक्षक आदी थाटमाट असल्याने अधिक लोक आकर्षित झाले.

काही गुंतवणूकदार आलिशान वाहनांतून येऊन मोठ्या रकमांची गुंतवणूक करत असल्याचीही चर्चा परिसरात होती. दरम्यान, आंतरराष्ट्रीय घडामोडी, जागतिक आर्थिक चढ-उतार तसेच शेअर बाजारातील घसरण यामुळे गुंतवणूक बुडाल्याचे सांगण्यात येत आहे. अनेक गुंतवणूकदारांचे कोट्यवधी रुपये अडकले असल्याची चर्चा असून, संबंधित व्यक्ती अचानक फरार झाल्याने गुंतवणूकदारांमध्ये तीव्र संताप पसरला. दोन दिवसांपूर्वी संतप्त गुंतवणूकदारांनी कार्यालयात कोणीही नसल्याचे पाहून संतापाच्या भरात दगडफेक केली. यात कार्यालयाच्या काचा फुटल्या व परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले. या घटनेमुळे कमी वेळेत जादा परताव्याच्या आमिषाला बळी पडणाऱ्या गुंतवणूकदारांनी सावध राहण्याची गरज पुन्हा अधोरेखित झाली आहे. कष्टाने कमावलेली पुंजी गुंतवताना संबंधित संस्थेची विश्वासार्हता, नोंदणी व कायदेशीरता तपासणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त होत आहे.

## चिंचपूर - दुर्गापूर शिवारात भरदिवसा चोरी; महिलेला मारहाण करून रोकड लंपास



**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : संगमनेर तालुक्यातील चिंचपूर-दुर्गापूर शिवारात मंगळवारी (१२ मे) दुपारी ४ वाजेच्या सुमारास चोरीची एक थरारक घटना घडली आहे. अज्ञात चोरट्यांनी घरात घुसून एका महिलेला मारहाण करत कपाटातील १० हजार रुपयांची रोकड चोरून नेली. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरले असून पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे.

शिर्डी विधानसभा मतदारसंघांतर्गत येणाऱ्या चिंचपूर-दुर्गापूर शिवारात रवींद्र संपत थेटे यांच्या वस्तीशेजारी गणपत देवराम पारधे यांचे निवासस्थान आहे. मंगळवारी दुपारी पारधे कुटुंबातील बहुतांश सदस्य काही कामानिमित्त बाहेरगावी गेले होते. घरात केवळ त्यांची लहान सून आणि एक छोटे बाळ होते. हीच संधी साधून दोन पुरुष आणि दोन महिला अशा एकूण चार चोरट्यांनी घरात प्रवेश केला. या चोरट्यांनी घरातील सुनेला मारहाण केली आणि तिला जीवे मारण्याची धमकी देऊन दहशत निर्माण केली.

त्यानंतर घराची उचकापाचक करून कपाटात ठेवलेले १० हजार रुपये रोख लंपास केले. चोरट्यांनी आपली दुचाकी घरापासून काही अंतरावर लांब उभी केली होती. चोरी केल्यानंतर सर्व आरोपी दुर्गापूर गावाच्या दिशेने पसार झाले. घटनेची माहिती मिळताच शिर्डी विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी (उपअधीक्षक) डॉ. कुणाल सोनवणे यांनी तातडीने घटनास्थळी भेट दिली. त्यांच्यासोबत लोणी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक वाघ आणि आश्वी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक शिरसाठ हे आपल्या पथकासह दाखल झाले. घटनेचे गांभीर्य ओळखून तपासासाठी तातडीने श्वान पथकाला पाचारण करण्यात आले आहे. प्राथमिक तपासात १० हजार रुपये चोरीला गेल्याची माहिती समोर आली असली तरी, पोलीस अधिक सखोल चौकशी करत आहेत.

भरदिवसा झालेल्या या चोरीच्या आणि मारहाणीच्या घटनेमुळे चिंचपूर-दुर्गापूर परिसरातील नागरिक भयभीत झाले आहेत. चोरट्यांमध्ये महिलांचाही समावेश असल्याने ही टोळी नेमकी कुठली आहे, याचा शोध पोलीस घेत आहेत. याप्रकरणी लोणी आणि आश्वी पोलीस संयुक्तपणे तपास करत असून लवकरच आरोपींना जेरबंद केले जाईल, असा विश्वास पोलिसांनी व्यक्त केला आहे.